CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्रीसंतांच्या नवल कथा



Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

9,3

श्रीसंतांच्या नवलकथा

*

: लेखक :

शं. भा. गोंधळेकर एम्. ए., बी. टी.

मुलांचा औद्योगिक भारत, भारतीय बांधव,
आशियातील बांधव इ. पुस्तकाचे लेखक

*

किंमत ३० रुपये

सारथी प्रकाशन, पुणे ४११०३०.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकाशक :
एम. आर. जोरी
सारथी प्रकाशन
१००५ सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०.

✵

प्रसिध्दी :
सन २००५

✵

सर्व हक्क प्रकाशकाधीन :

✵

ऑफसेट छपाई :
रा. शं. जोरी
इंदिरा प्रिंटिंग प्रेस
१००५ सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.
फोन : ०२०-२४४७७३२९,
५६२४९१७०

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हे बंध रेशमाचे
येथे कर माझे जुळती
परोपकाराची परिसीमा गाठून
निरपेक्ष जीवन जगणारे आणि
जन्माची सार्थकता साधणारे
माझे दीर्घकालचे स्नेही
कै. रामभाऊ भिडे
यांना ही माझी छोटीशी कृति
आदरपूर्वक आणि कृतज्ञापूर्वक
समर्पण
— शं. भा. गोंधळेकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रस्तावना

गावी संतचरित्रे हो। पावन परम पवित्र हो॥

संतांच्या या वचनानुसार अनेक भक्तांनी अनेक प्रकारे चरित्रे गाइली आहेत. मलाही वाटते की, आपणसुद्धा संतांची चरित्रे 'गाऊन' त्यांची सेवा करावी, पण माझ्या या प्रयत्नाला बऱ्याच नामवंत 'गायकां'चे सहाय्य मला घ्यावे लागले आहे. तेव्हा अशा 'गायकां'च्या कृतींचा मला भरपूर उपयोग झाल्याबद्दल त्यांचा अर्थातच मी फार ऋणी आहे. वेगळ्या शब्दात म्हणजे संतश्रेष्ठ चोखोबांच्या शब्दात (पा. ७७-८२) 'आम्ही उष्ट्याचे मानकरी' आहोत. ग्रंथांच्या पत्रावळीतून जरूर तेवढा 'उष्टा अन्नांश' घेऊन तृप्त झालो. तेव्हा त्या 'अन्नदात्यां'चे ऋण मी आनंदाने मान्य करतो.

आपल्या महाराष्ट्राची संतमालिका फार मोठी आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास, इ. थोर साधुसंतांची नावे तुमच्या कानावर सतत पडतात. या सर्व साधुसंतांनी धार्मिक व नैतिक बाबतीत मार्गदर्शन करून समाजावर फार मोठे उपकार केले आहेत. त्यांनी बहुजन समाजाला भक्तीचा सोपा मार्ग दाखवून मोक्षप्राप्ती सुलभ करून ठेवली आहे.

तेव्हा आपल्या अलौकिक कर्तृत्त्वाने विशेष प्रसिद्धीस आलेल्या काही थोर संतांची योग्यता नीटपणे कळावी म्हणून त्यांच्या आयुष्यातील काही हृद्य व आश्चर्यजनक अशा अनेक प्रसंगांची चित्रे आणि शब्दचित्रे या पुस्तकात दिली आहेत, ती पहा.

या पुस्तकाची सर्व जबाबदारी संत वाङ्मयाचे पुरस्कर्ते श्री. रामभाऊ जोरी आणि बंधू व त्यांचे सहकारी यांनी आपलेपणाने पत्करल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे. पण याहीपेक्षा जास्त महत्त्वाची गोष्ट म्हणजे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्या पुस्तकात चांगलीच भरीव भर घालण्याची प्रेरणा श्री. जोरी यांची. त्यांच्याच प्रेरणेने मी हे काम करू शकलो. याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

सुप्रसिद्ध व्यंग चित्रकार हरिश्चंद्र लचके यांनी केलेल्या मदतीबद्दल, तसेच पुणे विद्यापीठाच्या मराठी-विभागाचे प्रमुख डॉ. मुकुंदराव कानडे यांनी पुस्तकाचे हस्तलिखित साद्यंत वाचून उपयुक्त सूचना केल्याबद्दल. आणि चित्रकार श्री. भारताल यांनी मुखपृष्ठावरील आकर्षक आणि प्रसंगानुरूप सुंदर चित्रे काढून दिल्याबद्दल या सर्वांचा मी आभारी आहे.

आर्थिक ऋण फेडता येते, पण निरपेक्ष प्रेमाच्या ऋणाचे तसे नाही. ते सदैव शिरी वाहण्यातच आंतरिक आनंद असतो, कृतज्ञतेची जागती जाणीव असते.

कै. रामभाऊ भिडे यांना हे पुस्तक अर्पण करण्याची संधी मला लाभली याची मला धन्यता वाटते.

संत कृपा झाली, 'इमारत' फळा आली ॥

— शं. भा. गोंधळेकर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अनुक्रमणिका

१) ज्ञानदेव — १ ते ३०

१) तडाखे रेड्याच्या पाठीवर, आणि वळ ज्ञानेश्वरांच्या पाठीवर! २) रेड्याकडून वेद वदविले! ३) पाठीचा तप्त तवा केला! ४) चला भिंतीबाई, पुढे चला! ५) ज्ञानोबांनी जिवंत समाधी घेतली! ६) ज्ञानेश्वरी एक अपूर्व ग्रंथ.

२) नामदेव — ३१ ते ५२

१) देवाचा लाडका भक्त. २) नामदेवाचे मडके कच्चे! ३) शिवपिंडीवर पाय! पायाखाली पिंडीच पिंडी!! ४) नामदेव चितेवर बसले! ५) नामदेवांची सत्वपरीक्षा. ६) 'धोंडोबा' व 'गणोबा' यांना पांघरुणे! ७) भक्तांकरिता देऊळ फिरविले!

३) जनाबाई — ५३ ते ६३

१) जनीचा आगळा हट्ट. २) देव दळू लागतो! ३) लोखंडाचा शूळ विरघळला. ४) जनाबाईचे लेखक पांडुरंग!

४) गोराकुंभार — ६४ ते ७०

१) गोरोबावर नामदेव चरफडले. २) स्वत:चे मूल तुडवितो. ३) हात तोडले पण पुन्हा फुटले!

५) चांगदेव — ७१ ते ७६

१) चौदाशे वर्षांपर्यंत कसे जगले! २) पत्र म्हणजे कोरा कागदच! ३) वाघावर बसून आळंदीस निघाले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

६) चोखोबा — ७७ ते ८२

१) आम्ही उष्ट्या पानांचे मानकरी. २) महार चोखोबा देवाच्या गाभाऱ्यात. ३) विठोबा महाराचे घरी जेवले.

७) नरहरी सोनार — ८३ ते ९०

१) नरहरीला शिव-दर्शन. २) सावकार श्रीमंत पण बेचैन. ३) नरहरी सोनार डोळे बांधून देवळात गेले.

८) परसुबा आणि सावतामाळी — ९१ ते ९९

१) कुलूप गळून पडले, दार उघडले गेले! २) अनंता नामाच्या पानात जेवला! ब्राह्मणांचा जळफळाट झाला. ३) पोट चिरून लपविले!

९) कान्होपात्रा — १०० ते १०६

१) थोर विचारांची वेश्या. २) वेश्येची मुलगी वारकरी बनली. ३) मृत्यूने लाज राखली!

१०) एकनाथ — १०७ ते १२५

१) चूक दिडकीची आणि संधी सुवर्णाची! २) एकनाथ सेनापति बनतात! ३) तरीसुद्धा एकनाथ रागावले नाहीत! ४) राग आणणाऱ्यास दोनशे रुपयांचे बक्षीस! ५) महारांना श्राद्धाचे अन्न. ६) पत्रावळीखाली पत्रावळी! नाथ महारांच्या घरी जेवले! ८) पैठणची फाल्गुन वद्यषष्ठी.

११) तुकाराम — १२६ ते १५१

१) निघाले माझे दिवाळे! झाले देवाचे वाटोळे!!! २) दिवाळे निघाले, छान झाले! दुष्काळे पीडा केली, फारच छान!! ३) खतपत्रे बुडविली! आशाबीजे नष्ट!! ४) मत्सरी मंबाजी, उपकारी तुकाराम! ५) अभंगांच्या वह्या डोहात बुडविल्या! ६) रामेश्वरभटाचा अहंकार झडला! ७) शिवाजीच शिवाजी! ८) होन अदृश्य झाला! ९) तुकोबा चालले विमानातून!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१२) रामदास— १५२ ते १७५

१) नारायण खरोखरच सावधान झाला! २) नारायण 'रामदास' कसे झाले? ३) आशीर्वाद याच जन्माचा आहे! ४) अंबाजीचा कल्याण झाला! ५) मूर्ति हलेनात! ६) समर्थांकरिता वाघिणीचे दूध! ७) समर्थांच्या झोळीत राज्याने दान! ८) तिच्या मुखी पाणी कोण घाली? ९) हिवताप छाटीत कोंडला! १०) समर्थांचे गोड करट! ११) दासबोध, एक अद्वितीय ग्रंथ.

१३) भानुदास— १७६ ते १८०

१) विठ्ठल-मूर्तीचे आकर्षण. २) पंढरपूर पोरके झाले. ३) सुळाचे वृक्षात रूपांतर!

संतांची अमृतवाणी— १८१ ते १८८

— • —

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ज्ञानाचा नंदादीप पाजळविणारे

श्री संत ज्ञानेश्वर

(त्रोटक पूर्व–वृत्तान्त – ज्ञानेश्वरांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत व आईचे नाव रुक्मिणीबाई. विठ्ठलपंतांचा लहानपणापासून ईश्वरभक्तीकडे ओढा होता. मुंजीनंतर त्यांनी तीर्थयात्रा केल्या व शेवटी आळंदीस येऊन सिद्धेश्वराच्या मंदिरात काही दिवस वास्तव्य केले. येथेच योगायोगाने त्यांचे आळंदीचे कुळकर्णी यांच्या मुलीशी लग्न झाले. लग्नानंतरही त्यांचे मन संसारात रमेना. संसारातून मुक्त होण्याची ते संधी बघत होते. काशीस जाण्यास ते आपल्या बायकोची परवानगी मागत होते. बायको परवानगी देईना. पण एके दिवशी जरा दुर्लक्षपणें तिने 'जा, जा!' असे म्हटले. पडल्या फळाची ही आज्ञा समजून विठ्ठलपंत तडक काशीस गेले व तेथे रामानंदस्वामींकडून त्यांनी संन्यासदीक्षा घेतली. ही बातमी रुक्मिणीबाईंना समजताच त्या फार कष्टी झाल्या. पण सर्व दुःख गिळून भगवत्सेवेत देह झिजविण्याचे त्यांनी ठरविले. काही दिवसांनंतर रामानंदस्वामी रामेश्वराच्या यात्रेला निघाले असतां आळंदीस थांबले. साहजिकच रुक्मिणीबाईंनी या स्वामींचे दर्शन मनोभावाने घेतले व स्वामींनी 'पुत्रवती भव!' असा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आशीर्वाद दिला. रुक्मिणीबाईंना मात्र चटकन् हसू आले. हसण्याचे कारण विचारताच तिने सर्व वृत्तान्त सांगितला. स्वामी तसेच परत काशीस गेले. आणि चैतन्यस्वामींना म्हणजे विठ्ठलपंतांना गृहस्थाश्रम स्वीकारण्याची आज्ञा त्यांनी केली. विठ्ठलपंतांनी ती शिरसावंद्य मानली. पुन्हा गृहस्थाश्रम स्वीकारल्यास त्याच्या परिणामाची कल्पना त्यांना होतीच; पण भगवत्भक्तीत सारा काळ घालवावा असे ठरवून आणि ईश्वरावर सारा भार टाकून धैर्याने गुरूची आज्ञा म्हणून गृहस्थाश्रम स्वीकारला. असे झाले तरी जननिंदा थोडीच थांबते ! पण ही सर्व निंदा व छळ या पतिपत्नींनी निमूटपणे सहन केली. ईश्वरच पाठीराखा असल्याने व पुण्यसंचयाची शिदोरी पदरी असल्याने त्यांच्या पोटी निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान व मुक्ता ही नररत्ने दोनदोन वर्षांच्या अंतराने जन्मास आली. ज्ञानेश्वरांचा जन्म शके ११९७ मध्ये झाला. मुले मोठी झाल्यावर त्यांच्या व्रतबंधांसंबंधी विठ्ठलपंतांना चिंता वाटू लागली. आळंदीच्या ब्राह्मणांनी शास्त्राधार नाही हे निक्षून सांगून विठ्ठलपंतांना देहान्त प्रायश्चित्त घेण्याची अनुज्ञा दिली. विठ्ठलपंत म्हणजे वैराग्य व रुक्मिणीबाई म्हणजे पातिव्रत्याचा आदर्श या दोघांनी आपल्या मुलांना अगदी प्रेमनिर्भराने डोळे भरून पाहून घेतले, नंतर मन अगदी घट्ट केले आणि प्रयागला जाऊन आपले देह गंगार्पण केले ! केवढी मनःशुद्धा, केवढे संयमन आणि केवढी ईश्वरनिष्ठा ! धन्य ते मातापिता. अशांच्याच पोटी ज्ञानेश्वरासारखे तेजस्वी देवांश जन्मास येतात. आईवडील निघून गेले त्या वेळी निवृत्तीचे वय अवघे दहा वर्षांचे ! दोन दोन वर्षांनी खालची भावंडे लहान. ही चारी अनाथ भावंडे काही दिवस आळंदीस व काही दिवस आपेगावास जा ये करीत होती. ना घर, ना दार अशी त्यांची स्थिति झाल्याने सारे विश्वच त्यांचे घर बनले ! हाती भिक्षापात्र आले. थोरल्या दोघा भावांनी कोरान्न मागावे आणि सोपानाने मुक्ताबाईस सांभाळावे असा क्रम सुरू झाला. अशा परिस्थितीतही या मुलांनी मनाला खिन्नता येऊ दिली नाही. शांत चित्ताने, निश्चिंत मनाने, निग्रही वृत्तीने ईश्वराच्या भजनात आणि चिंतनात काळ घालविण्याचे त्यांनी ठरविले. जगाला मार्ग दाखविण्याचा ज्यांचा अधिकार आणि योग्यता त्यांना मार्गदर्शनाची जरूरी काय ?)

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१. तडाखे रेड्याच्या पाठीवर आणि वळ ज्ञानेश्वरांच्या पाठीवर !

विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई गंगेस देह अर्पण करण्यास निघून गेल्यावर मुलांना ब्रह्मांड आठवल्यास नवल नाही. निवृत्तीचे वय त्या वेळी अवघे दहा वर्षांचे ! पाठची भावंडे अवघ्या दोन दोन वर्षांनी लहान ! ! संन्याशाची मुले म्हणून जो तो हेटाळणी करू लागला; समाजाने त्यांना वाळीत टाकले; त्यांची अवहेलना केली. फुटाळ लोकांना त्यांची चेष्टा करण्याची चांगलीच संधी मिळाली. पण बिकट परिस्थितीला तोंड देण्यातच पुरुषार्थ आहे हे त्यांनी जाणले आणि आपला नित्याचा कार्यक्रम ठरविला. तेथील ब्राह्मणांनी आपल्याला छोटेसे प्रायश्चित्त देऊन शुद्ध करून घ्यावे आणि मुंजीला परवानगी द्यावी असे त्यांच्या मनांत फार होते. गावकरी आणि ब्रह्मवृंद यांची आळंदी येथील सिद्धेश्वराच्या देवळात सभा भरली असता निवृत्तिनाथांनीं ब्राह्मणांची फार विनवणी केली आणि शेवटी काकुळतीस येऊन, ‘ आम्ही पुढे काय करावे ?’ असा प्रश्न सभेला केला. ब्राह्मणांनी सर्व धर्मग्रंथ चाळले; पण संन्याशाच्या मुलांना शुद्ध करून घेण्याला काहीच आधार सापडेना. तेव्हा त्यांनी त्या मुलांना पैठणला जाऊन तेथील ब्राह्मणांकडून शुद्धिपत्र आणण्यास सांगितले.

पैठण हे गोदावरीच्या काठी असून पूर्वी राजधानीचे शहर होते. शिवाय ते विद्येचे माहेरघर होते. अनेक पढीक व विद्वान् ब्राह्मणांची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वस्ती तेथे होती. शास्त्रार्थाच्या बाबतीत तेथील ब्रह्मवृंदाच्या शब्दाला फार मान असे. उत्तरेकडील काशीक्षेत्राइतके महत्त्व पैठणला होते.

मुले निघाली आळंदीहून पैठणला. तहानभूक मारून हालअपेष्टा सोसून मुले एकदाची पोहोचली पैठणला. गोदामाईच्या दर्शनाने त्यांचा शिणोठा नाहीसा झाला.

दुसऱ्या दिवशी एका देवळात जमलेल्या ब्रह्मवृंदांच्या पुढे या लहान मुलांनी साष्टांग दंडवत घातले. शास्त्रीमंडळींना मोठे कौतुक वाटले. या मुलांच्या चेहऱ्यावरील तेजच तसे होते. या वेळी ज्ञानेश्वराच्या मुखावरील प्रभा अधिक फाकली. ' मुलांनो, काय पाहिजे तुम्हांला ?' शास्त्रीपंडितांनी प्रश्न केला. मुलांनी आपली सारी हकीकत निवेदन केली. ज्ञानदेव नंतर म्हणाले, ' आम्ही अनाथ, शरणागत, पतित आहोत. आम्हाला शुद्ध करून घ्यावे.' आळंदीहून आणलेले पत्र धर्माधिकाऱ्यांच्या हातात दिले. पत्र वाचून त्यांना थोडा विस्मय वाटला. पत्र सर्वांना वाचून दाखविण्यांत आले. सर्व विद्वान् मंडळी बुचकळ्यात पडली. त्यांनीही खूप विचार केला. धर्मग्रंथ धुंडाळले. पण मुलांना शुद्ध करून घेण्यास आधार सापडेना. शेवटी धर्मगुरूंनी निर्णय दिला, ' मुलांनो, संन्याशाच्या मुलांची मुंज करण्यास शास्त्राधार मिळत नाही. तेव्हा तुमच्या मुंजी करण्यास आम्ही परवानगी देऊ शकत नाही, याबद्दल आम्हांस फार वाईट वाटते.'

' मग आम्ही काय करावे ? जीवन कसे जगावे ? समाजात कसे वागावे ? हे तरी सांगा.' ज्ञानदेवाने विचारले.

' तुमच्यापुढे आता एकच मार्ग. पश्चात्तापपूर्वक तुम्ही ईश्वराचे भजन, पूजन, कीर्तन करीत राहावे. सर्वांशी नम्रतेने, आदराने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वागावे आणि विरक्त वृत्तीने सर्व काळ कंठावा. यानेच तुमची पापे नष्ट होतील आणि तुम्ही शुद्ध व्हाल.'

या उत्तराने मुले खिन्न झाली काय ? मुळीच नाही. त्यांच्या मनातलेच उत्तर त्यांना मिळाले. त्यांना अतिशय संतोष वाटला, चेहेऱ्यावर प्रसन्नता पसरली आणि मूळची दिव्यकांती अधिकच खुलून दिसू लागली.

मुलांची ही समाधानी वृत्ती पाहून काहींना अचंबा वाटला, काहींच्या मनात कळवळा उत्पन्न झाला. पण काही कुटाळ लोकांनी 'संन्याशाची पोरं ही' म्हणून टवाळी करण्यास सुरुवात केली.

सभा विसर्जन होण्याच्या समयाला कोण्या एकाने त्यांची नावे सहज विचारली. सर्व मुलांनी आपली नावे व त्यांची स्पष्टीकरणे विशेष हुशारीने आणि तितक्याच लीनतेने सांगितली.

'**निवृत्ति** माझे नाव. प्रवृत्तीचा मोह मला नाही. मी आत्मानंद सतत भोगीत राहणारा.'

'मी **ज्ञानदेव** सर्व वेदांचा ज्ञाता असे म्हणण्यास हरकत नाही.'

'**सोपान** माझे नाव. अनन्यभावे ईश्वराची भक्ति करणाऱ्याला वैकुंठाचा मार्ग दाखविण्याचे माझे काम.'

'मला **मुक्ताई** म्हणतात.'

अल्पवयी बालकांच्या तोंडून वरीलप्रमाणे नावांची स्पष्टीकरणे ऐकून सर्व लोक खदखदा हसू लागले. त्यांपैकी एक टवाळखोर बोलला, 'वा रे वा ! संन्याशाची पोरं आणि नावे कशी थोरं. हल्ली वाटेल ती नावे वाटेल त्याला ठेवतात. तो समोर हल्या चालला आहे ना, त्याचे नाव म्हणे ज्ञानदेवच आहे, त्याचाच भाऊ हा !'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हे उद्गार ऐकल्यावर ज्ञानदेवांच्या चेहऱ्यावरील तेजाला तेजी चढली आणि ते म्हणाले, ' तुम्ही म्हणता ते अगदी खरे आहे. त्या रेड्यात आणि माझ्यात काही फरक नाही ! तो माझाच आत्मा आहे. सर्व देहांत एकच परमात्मा भरून राहिला आहे. रेड्याच्या आणि माझ्या चैतन्यांत किंचितही फरक नाही. '

' असं काय ? ठीक आहे.' असे म्हणून त्या टवाळखोराने रेड्याला जवळ आणले, त्याच्यावरील पखाल उतरविली आणि रेड्याच्या पाठीवर आसुडाचे तीन तडाखे तटातड उडविले.



आणि काय आश्चर्य ! तडाखे बसले रेड्याच्या पाठीवर आणि वळ उठले ज्ञानेश्वरांच्या पाठीवर !!! पाठीतून रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या !

हा अपूर्व चमत्कार पाहून प्रत्येकजण आश्चर्याने थक्क होऊन गेला. टवाळखोर मंडळी चांगलीच हादरली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चौघा भावंडांनी ब्रह्मवृंदाच्या चरणी आपली मस्तके लवविली आणि ती पुढे चालू लागली.

□ □

२. रेड्याकडून वेद वदविले !

पैठणास आपणाला शुद्धिपत्र मिळत नाही असे निश्चित झाल्यानंतर निवृत्तिनाथ आपल्या भावंडांसह आपेगावी जाण्यास निघाले. आपेगाव हा त्यांचा गाव. हा पैठणपासून अठरा मैलांवर असून गोदावरीच्या काठाकाठांने प्रवास करावयाचा. ही सर्व भावंडे गोदातटाकडे निघाली. गोदेच्या काठावर जाऊन काही काळ विश्रांतीकरिता बसली. पुष्कळशा लोकांना त्यांच्याबद्दल कौतुक वाटत होते आणि ते वाटणे स्वाभाविक होते. मुलांचे वय ते काय ? पण त्यांचे वर्तन विनयशील, चेहऱ्यांवरील तेज देवांचे, मन सतत समाधानी आणि उल्हसित. ही मुले सामान्य नाहीत अशी अनेकांची खात्री झाली. म्हणून ते लोक त्यांच्या जवळपास हिंडण्यात आणि त्यांच्या हालचालींचे अवलोकन करण्यात आनंद मानू लागले. असे जरी असले तरी काही दुष्ट छलक त्यांच्याकडे उपहासबुद्धीने पाहात होते. त्यांच्यापैकी एकजण जरा धिटाईने ज्ञानेश्वरांजवळ जाऊन म्हणाला, ‘ हे बघ तुला जर तुझ्यासह सर्व कुल पावन करून घ्यावयाचे असेल तर ह्या रेड्याच्या मुखातून वेद वदवून दाखव पाहू.’

ज्ञानेश्वरांनी ही आज्ञा ऐकताच ते तात्काळ उठून उभे राहिले. ब्राह्मणांना अभिवादन करून विनयाने ते म्हणाले, ‘ महाराज, आपण भूदेव आहात, आपणासारख्या भूदेवांची आज्ञा निष्फळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कशी होईल ? इकडची सृष्टीं तिकडे करण्याचे सामर्थ्य आपल्यामध्ये आहे. मग रेड्याकडून वेद वदविण्याची काय कथा ?' इतके बोलून ते पलीकडे चरत असलेल्या रेड्याजवळ गेले. त्याच्या मस्तकावर, ज्ञानेश्वरांनी पद्महस्त ठेविला आणि म्हणाले, 'बा ज्ञान्या, तूं वेदमंत्रोच्चार करावास अशी तुला भूदेवांची आज्ञा आहे. कर बाबा उच्चार.' सगळ्या लोकांची दृष्टी रेड्यावर खिळलेली. प्रत्येकजण उत्कंठतेने पाहात होता. इतक्यात रेड्याने



खालीवर डोके करून 'ॐ अग्निमीळे पुरोहितम्...' वेदांतील या पहिल्या ऋचेपासून स्पष्टपणे मंत्राचा घोष सुरू केला. हा कार्यक्रम एक प्रहरपर्यंत अस्खलितपणे चालू होता. सर्व लोक एकमेकांकडे टकमका पाहू लागले. ते आश्चर्यविमूढ झाले. सर्वांना वाटले की हे अद्भुत घडले ! पैठणच्या ब्राह्मणांनी लज्जित होऊन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आपली तोंडे शरमेने खाली घातली. मोठमोठे पंडित, शास्त्री गलितगर्व झाले आणि त्यांनी ज्ञानोबारायांच्या पायांवर आपली मस्तके नत केली. सज्जनांची अंतकरणे आनंदाने भरून गेली. निंदक मात्र जागच्या जागी थिजून गेले.

सर्व पैठण गाव ज्ञानेश्वरांच्या जयजयकाराने दुमदुमून गेले. लोकांना त्यांचे अलौकिकत्व पटले.' आम्ही यांना काय शुद्धिपत्र देणार ! हे प्रत्यक्ष देवच !' असे उद्‌गार काढून स्वत:च्या पांडित्याचा आणि विद्वत्तेचा ते धिक्कार करू लागले.

□□

३. पाठीचा तप्त तवा केला !

पैठणच्या चमत्कारानंतर ज्ञानेश्वरमंडळी काही दिवस आळंदीस जाऊन राहिली. आळंदीकरांना आता या भावंडांची खरी योग्यता कळून चुकली होती. भावंडांचा कार्यक्रम ठरून गेला. निवृत्ति व ज्ञानेश्वर यांनी माधुकरी मागावी किंवा कोरान्न आणावे आणि सोपानने छोट्या वहिणीस सांभाळावे. गावात आता यांच्यासंबंधी बरीच आपुलकी निर्माण झाली होती. या निराश्रित व पोरक्या पोरांकरिता दोन घास प्रेमाने मिळू लागले. त्यांची वास्तपुस्त आवर्जुन होऊ लागली. भजन, पूजन, कीर्तन, ध्यान, योगाभ्यास इत्यादी गोष्टींत निवृत्तिनाथ आणि ज्ञानदेव मग्न असत.

यांचा हा सरळ चाललेला कार्यक्रम काहींना बघवेना. ' ही मूर्तिमंत संन्याशाची कार्टी ' हे वेड तेथील लब्ध प्रतिष्ठित विद्वान

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

व कर्मठ पण दुष्ट माणूस विसोबा चाटी याच्या डोक्यातून जाईना. त्याच्या मते ही संन्याशाची मुले म्हणजे धार्मिक प्रवृत्तीच्या समाजाला कलंक आहे. त्यांना तेथून हाकलूनच लावले पाहिजे, म्हणून त्याने त्यांचा सर्व प्रकारे छळवाद मांडला.

दिवाळीच्या सणात एकदा निवृत्तिनाथ सहज मुक्ताईस म्हणाले, आज मांडे कर, सर्वांना मांडेच खाऊ घाल.' पण मुक्ताईजवळ मांडयाचे रांधणे नव्हते. म्हणून ती कुंभारवाडयाकडे मांडे करण्याकरिता लागणारे खापर आणावयास चालली. समोरून विसोबा चाटी येत होता. त्याने तिला पाहताच 'कुठे चाललीस ग पोरी?' असे दरडावून विचारले. ती बिचारी घाबरून गेली, थरथर कापू लागली आणि चाचरतच तिने आपला उद्देश सांगून टाकला.

विसोबाला छळायची चांगलीच संधी मिळाली. तो तडक कुंभारवाडयाकडे गेला व सर्व कुंभारांना धमकी दिली,' खबरदार, हिला कोणी खापरबिपर दिले, तर माझ्याशी गाठ आहे, लक्षात ठेवा !'

मुक्ताईला खापर मिळणे शक्यच नव्हते. ती घरी येऊन रडत बसली. ज्ञानेश्वराने तिला कुरवाळून प्रेमाने पोटाशी धरले आणि विचारले, 'काय झालं गं ? रडतीस कां ?' तिने सर्व हकीकत सांगितल्यावर ज्ञानोबाने तिला पीठ भिजव म्हणून सांगितले.

'पण भाजू कशावर ?'

'अगं माझ्या पाठीवर !'

त्या योगेश्वराने, परमसमर्थ ज्ञानेश्वराने योगाच्या सामर्थ्याने जठराग्नि पेटविला आणि आपली पाठ तप्त सुवर्णासारखी तापवून लाल केली ! अहाहा ! केवढा चमत्कार !!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुक्ताई त्याच्या पाठीवर मांडे भाजू लागली.



संन्याशाच्या काटर्यांची चांगली अडवणूक केल्याचे समाधान मनात बाळगून ही पोरं पुढे काय करतात म्हणून झोपडीबाहेर तो दुष्ट मनुष्य लपून उभा होता. विसोबाने जेव्हा ज्ञानदेवाने योगसामर्थ्याने आपली पाठ तापलेल्या तव्याप्रमाणे लाल केलेली पाहिली तेव्हा तो अगदी विरघळून गेला. दिङ्मूढ झाला. त्याच्या डोळ्यांत चांगले अंजन पडले. 'अरेरे ! ह्याला आपण काच-मणी समजलो' म्हणून त्याला अतिशय वाईट वाटले, पश्चात्तापाने तो खरा होरपळून गेला. अहंकार झडून गेला. तसाच तो झोपडीत घुसला, त्याने ज्ञानदेवांपुढे लोटांगण घातले आणि त्या महान् सिद्ध पुरुषाच्या ताटातील मांड्याची उच्छिष्टे प्रसाद म्हणून ग्रहण करू लागला !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुक्ताई हसून म्हणाली, ‘खेचरा, परता सर!’ ज्ञानेश्वरांनीहि तेच म्हटले. ‘परता सर, खेचरा’ असे म्हटल्याबरोबर हा ज्ञानेश्वरांचा उपदेश समजून विसोबा खरोखरच बाजूला सरला, संसारातून बाजूला सरला!! ज्ञानेश्वरांच्या कृपेने पुढे तो मोठ्या योग्यतेस चढला.

□ □

४. चला, भिंतीबाई पुढे चला

चांगदेव नावाचा एक महान् योगी तापी नदीच्या काठीं राहात असत. चौदाशे वर्षांच्या दीर्घ तपाने त्यांच्या तोंडावर तेज दिसे. ते योगी असून सिद्धि त्यांना सहज प्रसन्न होई. पण त्यांच्या ठिकाणी अहंकाराचा वास होता.

आळंदीच्या ज्ञानेश्वरांच्या दिव्यत्वाची आणि अलौकिकत्वाची ख्याती सर्वत्र पसरली होती. ‘रेड्याकडून वेद बोलविल्याचा प्रसंग मी डोळ्यांनी पाहिला, ‘न भूतो न भविष्यति’ अशांपैकी तो होता.’ असे एकाने सांगितले. चांगदेवांच्या शिष्याचा यावर विश्वास बसेना. खुद्द चांगदेवांनाहि याचा विस्मय वाटला. त्यांनी लगेच खरे काय ते जाणून घेण्याकरिता समाधी लावली. ‘तेव्हा त्यांना ब्रह्मा, विष्णू व महेश आळंदीस अवतरले आहेत असे दृश्य दिसले. त्यांना आनंद झाला आणि त्यांची भेट घेण्याची उत्कंठा त्यांनी दर्शविली. पण चांगदेव महाराजांनी कमीपणा पत्करून आपण होऊन भेटीस जाणे योग्य नाही असा सल्ला त्यांच्या काही शिष्यांनी दिला. लगेच अहंकारी चांगदेव बिथरले, त्यांच्या मनात चलबिचल सुरू झाली. अखेरीस त्यांनी जाण्याचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बेत फिरवून आधी पत्र पाठविण्याचे ठरविले. पत्र लिहिण्यास शिष्य बसला.

'महाराज मायना काय लिहू ?' शिष्याने विचारले.

'लिही. चिरंजीव ज्ञानेश्वर यास... पण थांब जरा.' चांगदेव बोलले.

'का ?'

'अरे, तो आपल्या कर्तृत्वाने आणि दिव्यत्वाने मोठा आहे नां ?'

'मग काय लिहू ?'

'लिही. तीर्थरूप ज्ञानेश्वर यांस...' महाराजांनी सांगितले.

यावर ज्ञानेश्वर वयाने खूपच लहान, अवघा चौदा वर्षांचा पोर ! त्याला तीर्थरूप कसे लिहावे अशी शंका शिष्याने प्रदर्शित केली.

'बरोबर आहे तुझें म्हणणे' चांगदेव म्हणाले. पण लिहावे काय हे काही त्यांना सुचेना. मग शेवटी त्यांनी कोरा कागदच ज्ञानोबाकडे पाठविण्याचे ठरविले !

'कोरा कागद ?' शिष्याने प्रश्न केला.

'होय, कोरा कागदच! पाहू या तो काय समजतो ते अहंकारी चांगदेवांनी उत्तर दिले.

कोऱ्या कागदाचे पत्र घेऊन चांगदेवाचे शिश्य आळंदीस येऊन पोहोचले आणि आणलेले पत्र ज्ञानेश्वरांना देणार इतक्यातच ज्ञानेश्वरांनी प्रश्न केला, 'काय ? चांगदेवांनी कोराच कागद पाठविला ?

पत्र न बघतांच ज्ञानेश्वरांनी काढलेले उद्‌गार ऐकून शिष्य अगदी चकित होऊन गेले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुक्ताबाईने ते पत्र पाहिल्यावर ती हसूच लागली.

'कोणाला हसतेस गऽऽ? आणि का? ज्ञानोबांनी विचारले.

'चांगदेवाला, दुसरे कोणाला? हसू नको तर काय करू? चौदाशे वर्षे तपश्चर्या करून पुन्हा हा कोराच्या कोराच!' यावर सर्वांनी स्मितहास्य केले.

निवृत्तिनाथांच्या सांगण्यावरून ज्ञानदेवांनी चांगदेवांना उत्तर लिहिले. हे उत्तर पासष्ट ओव्यांत आहे, म्हणून त्याला 'चांगदेव पासष्टी' असे म्हणतात.

हे उत्तर घेऊन शिष्य परत निघाले. एकंदर प्रकार पाहून त्यांना मोठा अचंबा वाटला. इकडे चांगदेव अगदी अस्वस्थ झाले होते. व्याकूळ होऊन शिष्यांची ते वाट पहात होते. इतक्यात शिष्य आले. त्यांनी आपल्या चांगदेव महाराजांच्या हातात ज्ञानेश्वरांनी लिहिलेले उत्तर दिले. चांगदेवांनी पत्र वाचले. पत्रातील नुसती अक्षरे वाचली. पण अर्थबोध काही होईना? त्या ओव्यांतून ज्ञानदेवांनी आत्मबोधाचे विवरण केले होते. चांगदेव या विषयात अज्ञच, मग त्यांना अर्थबोध कसा होणार? थोडा विचार करून ज्ञानेश्वरांची प्रत्यक्ष गाठ घेण्याचे त्यांनी ठरविले. चांगदेवांचा अहंकार अद्याप कायम होता. आपले ऐश्वर्य, आपली योग्यता, आपले सामर्थ्य याचा दिमाख दाखविण्याकरिता चांगदेव. महाराज मोठ्या समारंभाने निघाले. कसे? तो देखावा असा –

एका अक्राळविक्राळ अशा वाघावर सहज बसलेली चांगदेव महाराजांची भव्य व उग्र मूर्ती! मस्तकावर जाडजूड अशा जटा, लाल डोळे, एका हातात त्रिशूळ व दुसऱ्या हातात पिवळ्या धमक सापाचा लांबसडक चाबूक! आणि चौदाशे शिष्यांचा बरोबर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तांडा ! शेकडो शंखांच्या निनादात ही मिरवणूक आगेकूच करीत होती.

आळंदी जवळ येताच चांगदेव महाराजांच्या आगमनाचीं वार्ता ज्ञानेश्वरांस देण्याकरिता काही शिष्य पुढे धावले. वेळ सकाळची होती. घराच्या एका भिंतीवर ज्ञानेश्वर आणि निवृत्तिनाथ यांच्यात सुखसंवाद चालला होता. सोपाना व मुक्ताई तेथेच त्यांच्या-जवळ ऊन खात बसली होती. चांगदेव महाराज मोठे अधिकारी, योगी व तपस्वी आपल्या भेटीस येंत आहेत हे कळताच आपणहि काही अंतर त्यांना सामोरे गेले पाहिजे असे निवृत्तिनाथांनी

सुचविले. मुक्ताई म्हणाली, 'पण आपण कसं जायचं ?' यावर ज्ञानोबा उद्‌गारले, 'अगं तुला का काळजी ? हीं भिंतच नेईल की आपल्याला.' असे म्हणून त्यांनी भिंतीला सुचविले, 'चला, भिंतीबाई, पुढे सरा !' असे म्हणताच भिंत चालू लागली ! जड भिंत, निर्जीव भिंत सजीव प्राण्यासारखी भरभर पुढे सरू लागली !!!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चांगदेव मोठे योगी, वाघ, सर्प इत्यादी प्राण्यांवर त्यांना हुकमत चालविता येत होती, पण निर्जीव व जड अशा दगड–मातीच्या भिंतीवर सत्ता चालविलेली पाहून चांगदेव आश्चर्यचकित झाले. त्यांचा अहंकार पार गळाला. वाघावरून त्यांनी तात्काळ उडी मारली आणि धावत जाऊन ज्ञानेश्वरांचे पाय धरले !! ज्ञानेश्वरांची योग्यता ओळखून त्यांच्या चरणी ते लीन झाले. चांगदेवांचा गर्वज्वर खाडकन् उतरला आणि ज्ञानदेवांच्या संगतीत त्यांनी आत्मानंदाचे सुख मिळविले.

□ □

५. ज्ञानेश्वरी – एक अपूर्व ग्रंथ

ज्ञानेश्वरांची योग्यता समाजाला पूर्ण पटल्यानंतर त्यांच्या हालअपेष्टांचा काळ संपला. मनाला निश्चितपणा प्राप्त झाला. पैठणहून ही तेजाची बाळे पुढील प्रवासास निघाली. प्रवासांत भजन, कीर्तन सतत चालू असे. त्यांचा भक्तगण वाढत चालला. शेवटी ही मंडळी प्रवरा नदीवरील नेवासे या गावी येऊन पोहोचली. गावाबाहेरील महादेवाच्या देवळात त्यांनी मुक्काम ठोकला. एके सकाळी निवृत्तिनाथ ज्ञानदेवांना म्हणाले, ‘ ज्ञानोबा, तू आता एक काम कर. दुसऱ्यास ते साधणार नाही. तुलाच करावे लागेल. ’

‘ आपण सांगाल ते मी आनंदाने करीन. कोणते काम ?’ ज्ञानेश्वरांनी विचारले.

सामान्य लोकांना संस्कृतचे ज्ञान नसते आणि वेदांताचे सारे ज्ञान संस्कृत भाषेतच सांगितलेले आहे. महाभारत, रामायण,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पुराणे इ. संस्कृतमध्यें, सामान्य लोकांना कसे समजणार ? त्यांना मोक्षाचा मार्ग दिसावा म्हणून प्राकृत भाषेत ज्ञानज्योत पेटव. म्हणजे तिच्या शांत आणि अखंड प्रकाशात भोळीभापडी माणसे सुखाने वाटचाल करतील. परमार्थाचे सारे ज्ञान मराठी भाषेत आण. या ज्ञानाच्या पाणपोईवर तृषार्त लोकांना यथेच्छ ज्ञानामृत पिऊ दे, गीतार्थाचे विरवण सर्वांना समजेल अशा सोप्या मराठीत कर.'

ज्ञानोबांनी आपल्या थोरल्या बंधूंची आज्ञा शिरसावंद्य मानून त्यांच्या चरणांवर आपले मस्तक ठेविले आणि त्यांनाच गुरुस्थानी मानिले. गुरूंचा आशीर्वाद घेऊन त्यांनी ग्रंथरचनेला सुरुवात केली व शके १२१२ मध्ये तो पुरा केला.



हा ग्रंथ म्हणजेच ज्ञानेश्वरी. हा एक चमत्कार ज्ञानेश्वरांनी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करून दाखविला आहे. या वेळीं ज्ञानेश्वरांचे वय अवघे पंधरा ! या वयांत एवढा महान् ग्रंथ निर्माण करणे म्हणजे एक आश्चर्यच नव्हे का? हा ग्रंथ हल्लीचीहि विद्वान् मंडळी शिरोधार्य मानतात. केवढी ही ग्रंथाची अपूर्वता !

आपल्या गुरूंना म्हणजे निवृत्तिनाथांना सन्मुख बसवून त्यांच्या-कडून मिळालेल्या स्फूर्तीने ज्ञानेश्वरांच्या मुखातून वेदवाणीचा ओघ सुरू व्हावयाचा. ज्ञानामृताचा हा झरा अखंडपणे पाझरू लागला म्हणजे श्रोते लोक डोलू लागत. तहानभूक विसरून जात. केवढे हे हृद्य दृश्य !

ग्रंथ लिहून घेण्याचे काम सच्चिदानंद बाबा यांनी केले. ज्ञानेश्वरांच्याच कृपेने यांची मृतावस्था संपून त्यांना जागेपण आले होते. या अलौकिक ग्रंथाची परिसमाप्ति झाल्यानंतर ज्ञानेश्वर आपल्या सद्गुरूंना म्हणजे निवृत्तिनाथांना म्हणतात – ' एक वेळ कल्पतरूंची उद्याने लावता येतील; पृथ्वीचा गोल सुवर्णाचा करता येईल, आकाशालाहि अंगरखा शिवता येईल. ही कामे कठीण नाहीत. पण गीतार्थ स्पष्ट करणे हे काम खरोखरीच कठीण आणि तो मराठीतून करणे त्याहून कठीण ! पण आपल्या कृपेने हा ग्रंथ माझ्याकडून पुरा होऊ शकला. खरोखर हे ग्रंथ-कर्तृत्व माझे नाही. ' परि हें म्यां केलें । की हें माझेनि जाले...॥' असे म्हणून ग्रंथकर्तृत्वाचे सारे श्रेय ज्ञानेश्वरांनी सद्गुरूंनाच दिले. ' आज मी कृतार्थ झालो –' असे सहज उद्गार त्यांच्या मुखातून बाहेर पडले.

□ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

६. ज्ञानदेवांनी जिवंत समाधी घेतली !

ज्ञानदेवांची योग्यता सर्व संतांनी ओळखली होती. त्यांचे अलौकिकत्व सर्वांना पटलेले होते. काही विशेष चमत्कार करून लोकांना दिपवावे ही बुद्धी त्यांच्या ठिकाणी कधीच नव्हती. प्रसंगानुरूप तशा काही गोष्टी त्यांना कराव्या लागल्या. ज्ञानदेव अत्यंत नम्रशील व निगर्वी होते. समाधी घेतेवेळी त्यांचे वय अवघे बावीस वर्षांचे ! पण सर्व संतमंडळींत ते अग्रस्थानी होते. सर्वांना अतिशय वंदनीय. ते विष्णूचा अवतार होत अशी सर्वांची मनोमन खात्री होती. मोरोपंत कवींनी तर त्यांना विष्णूचा '–अकरावा अवतार–' म्हणून संबोधिले आहे. नामदेव, विसोबा खेचर, चांगदेव आणि कित्येक श्रेष्ठ संत त्यांना आपला आत्मा मानीत. सर्वांच्या उत्साहाचा, स्फूर्तीचा, आनंदाचा ते ठेवा होते. सर्वांचे सुखनिधान म्हणजे ज्ञानेश्वर. ' सखा माझा ज्ञानेश्वर । संत जनांचें माहेर ' असे परोपरीने आळविणाऱ्या श्रेष्ठ संतांची मालिका पाहिल्यानंतर ज्ञानेश्वरांच्या अंगी झळाळणारे दिव्यत्वाचे तेज पाहून कोणाचेहि डोळे दिपून जातील आणि आदराने मस्तक आपोआप नत होईल.

ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी इत्यादी ग्रंथरचना केल्यानंतर त्यांचे मन या जगात रमेनासे झाले. त्यांना आत्मानंदात सतत मग्न असावेसे वाटू लागले. शिवाय इतर लोकांची उपाधीहि वाढू लागली. तेव्हा समाधीच घेणे बरे असे वाटून पंढरीस तेथे जमलेल्या सर्व संत मंडळींच्या समक्ष श्री विठ्ठलापुढे त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. हा दिवस कार्तिक शुद्ध दशमीचा असल्यामुळे ठिकठिकाणाहून अनेक संत आणि भक्त अनायासे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जमलेले होते. सर्वांच्या गाठीभेटी झाल्या. पण ज्ञानदेवांचा समाधीचा विचार ऐकताच सर्वांचे डोळे चटकन् पाणावले.

ज्ञानदेवांची दिव्य मूर्ति कायमची दृष्टिआड होणार म्हणून लोकांची अंत.करणे कासावीस झाली. त्यांचा जीव खालीवर होऊ लागला. पण खुद्द विठ्ठलानेच ज्ञानेश्वरांना अनुज्ञा दिली होती. त्यामुळे काही बोलता येईना.

ज्ञानदेवांसह निवृत्तिनाथ, सोपानदेव व मुक्ताबाई आणि नामदेवादि संत पंढरीहून आळंदीस आले. विशेष गोष्ट म्हणजे प्रत्यक्ष पांडुरंगही आले ! धन्य ज्ञानेश्वर ! आणि धन्य त्यांचे मातापिता ! असंख्य संत, महंत आणि भक्त समाधीचा प्रशांत सोहळा प्रत्यक्ष पाहण्याचे पुण्य लाभावे म्हणून आळंदीस जमले होते.

आळंदी हे फार जुने तीर्थक्षेत्र आहे. 'नव्हती पंढरी तेव्हा होती आळंदी,' इतके माहात्म्य आळंदीचे आहे. हजारो तपस्व्यांची ही तपोभूमी होती. येथील पुरातन सिद्धेश्वराच्या सान्निध्यात असंख्य साधकांनी सिद्धी मिळविली होती. अशी ही पुण्यभू ज्ञानेश्वरांनी समाधीकरिता निवडली यात आश्चर्य कसले ? ज्ञानेश्वरांच्या चिरशांतीची जागा सिद्धेश्वराच्या जवळच अजान वृक्षाच्या छायेखाली आहे. नामदेवांनी आपल्या मुलांकडून हे समाधिस्थान स्वच्छ करून घेतले. नंतर ती जागा शृंगारण्यात आली. धुवट वस्त्राची दाट घडी पसरून ज्ञानेश्वरांचे आसन तयार करण्यात आले. त्यावर तुळशीची व बेलाची पाने पसरली. समाधीची सर्व सिद्धता झाली.

कार्तिक वद्य एकादशीस (शके १२१८) सर्वांनी हरिजागर केला. द्वादशीला पारणे झाले. सर्वांची भोजने उरकल्यानंतर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ज्ञानदेवांनी पारणे सोडले, प्रत्यक्ष पांडुरंगांनी ज्ञानेश्वरांना वाढले! त्रयोदशीचा दिवस उगवला. तो गुरुवार होता. जसजसा दिवस वर येऊ लागला तसतशी सर्वांची अंत:करणे हेलावू लागली. एकंदर वातावरण विषण्ण बनले. पण ज्ञानेश्वर मात्र स्थिरवृत्ति होते. शांतीचे सागरच ते. त्यांच्या मुखावर सात्त्विक समाधान विलसत होते. अपार आत्मानंदाचे सुख ते भोगीत होते. ते अगदी नि:शब्द बनले होते. दोन प्रहर होऊन गेले. पांडुरंग ज्ञानदेवाजवळ जाऊन म्हणाले,' ज्ञानोबा, वेळ होत आली. चलायचं ना ?'

ज्ञानोबा उठले, सोपानला त्यांनी प्रेमाने आलिंगन दिलें, लडिवाळ मुक्ताईला पोटाशी धरले. नंतर ते निवृत्तिनाथांजवळ गेले. त्यांना वंदन करून ते म्हणाले, ' दादा, गुरुमाउली ! आतापर्यंत आपण माझे पालनपोषण केलेत, माझे लाड पुरवलेत. आपल्या कृपेने ही मायानदी मी ओलांडत आहे आणि माझ्या मूळच्या स्वरूपात मी विलीन होत आहे.' निवृत्तिनाथ गहिवरून बोलले, ' माझ्या ज्ञानराजा ! तुझ्यासारखा भाऊ आणि तुझ्यासारखा शिष्य कधीही मिळणार नाही. उणाअधिक शब्द तू कधी बोलला नाहीस. गुरु-शिष्याच्या नात्याची तू कड लावलीस. गीतार्थाचा सोहळा करून आमच्या नेत्रांची पारणी फेडलीस. धन्य तुझा अवतार.'

ज्ञानेश्वरांनी सर्वांना मोठ्या प्रेमाने अभिवादन करून त्यांचा निरोप घेतला. जनसंमर्दाने त्यांना अखेरचे वंदन करून त्यांच्या नावाचा गगनभेदी असा प्रचंड जयजयकार केला. ज्ञानदेव नंतर समाधिस्थानाकडे वळले. श्रीविठ्ठलांनी त्यांच्या कपाळी गंध लावून गळयात पुष्पहार घातला. या वेळी ज्ञानेश्वरांच्या मुखा-वरील तेजोवलय अधिकच तेजाळले ! त्यांचा एक हात निवृत्ति-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाथांनी धरलेला आणि दुसरा प्रत्यक्ष पांडुरंगांनी ! ज्ञानेश्वरांनी समाधिस्थानाला प्रदक्षिणा घालून ते आत शिरू लागले. सगळी

सभा चित्रासारखी तटस्थ ! कंठांतून शब्द फुटेना, अंतःकरणे गहिवरली. सगळे लोक त्या कैवल्याच्या पुतळ्याचे डोळे भरून शेवटचे दर्शन घेत होते.

एक, दोन, तीन पायऱ्या उतरून ज्ञानोबा आत शिरले ! तुळशीबेलाच्या आसनावर अधिष्ठित झाले !! प्रसन्न चित्ताने विठ्ठलाकडे दृष्टिक्षेप करून ज्ञानदेव म्हणाले,

'...सुखी केलें देवा ।
पादपद्मीं ठेवा निरंतर ।।

□ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भक्तीचा मळा फुलविणारे

श्री संत नामदेव

(त्रोटक कौटुंबिक वृत्तान्त – नामदेव हे दामाशेटी नावाच्या एका शिंपी जातीच्या भगवद्भक्ताचे चिरंजीव. याचा जन्म परभणी जिल्ह्यातील नरसी ब्राह्मणी या गावी शके ११९२ मध्ये झाला. त्यांच्या आईचे नाव गोणाबाई. जुन्या वहिवाटीनुसार नामदेवांचे लग्न बालवयातच झाले. त्यांच्या बायकोचे नाव राजाई. लहानपणापासून नामदेवांचा ओढा परमेश्वरभक्ती-कडे होता. औंढ्या नागनाथाचे दर्शन घेतल्याशिवाय ते अन्नग्रहण करीत नसत. पुढे मग नामदेव पंढरपूरला येऊन राहिले. नामदेवांचे लक्ष सतत विठ्ठलाकडे लागून ते विठ्ठलाचे परमभक्त बनले. विठ्ठलाचेही या भक्ता-वर फार लोभ व प्रेम असे. अनेक बिकट प्रसंगी नामदेवांनी विठ्ठलाचा धावा करावा आणि देवाने त्यांच्याकडे सहाय्यार्थ धावून जावे असा ऋणा-नुबंध नामदेवांचा जन्मभर टिकला. नामदेवांचे संसारात लक्ष लागेना. त्यांच्या कुटुंबातील सर्व माणसांनी त्यांचे संसारात लक्ष लागावे म्हणून परोपरीने पुष्कळ प्रयत्न केले. नामदेवांचे कुटुंब जरा मोठे होते. खुद्द नाम-देवाना चार मुलगे व एक मुलगी अशी अपत्ये होती. पण नामदेवांचा सगळा काळ–भजन–कीर्तनात जाई. त्यातच ते दंग असत. नामदेवांच्या संसाराची सर्व चिंता विठ्ठलानेच केली असे म्हणण्यास हरकत नाही. शके १२७२ मध्ये नामदेव समाधिस्थ झाले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पंढरपूर क्षेत्राचे व विठ्ठलाचे माहात्म्य वाढविण्यात नामदेवांची कामगिरी विशेष उल्लेखनीय आहे. भागवतधर्माचा प्रसार लोकांच्या सर्व थरांत आणि देशाच्या सर्व भागांत नामदेव महाराजांनी आपल्या आयुष्यभर केला. विठ्ठलाची भक्ति करून जीविताची सफलता साधता येते ही शिकवणूक बहुजनसमाजाला त्यांनी दिली. नामाचा दीपस्तंभ उभारून सामान्य जनतेला दिलासा देण्याचे महान् कार्य नामदेवांनी केले.

नामदेवांची अभंग–रचना फार मोठी आहे. शतकोटी अभंग करण्याची त्यांची प्रतिज्ञा होती. विशेष गोष्ट म्हणजे नामदेवांच्या कुटुंबातील सर्वांनीच अभंगरचना केली आहे. इतकेच नव्हे तर, त्यांच्या घरची दासी जनी हिनेही पुष्कळ रसाळ अभंग रचले आहेत.)

१. देवाचा लाडका भक्त

छोट्या नामदेवाला बोलता येऊ लागल्यापासूनच त्याच्या तोंडातून ‘ विठ्ठल विठ्ठल ’ असे बोबडे बोल बाहेर पडू लागले. आई–वडिलांना मोठे कौतुक वाटे. पाषाणाचे टाळ करून विठ्ठल-मंदिरात तासन् तास भजन करण्यात हा छोटा नामदेव अगदी तल्लीन होऊन जाई. श्रीविठ्ठलालाही या बालकाच्या भजनाची मोठी मौज वाटली. त्यांचा त्याच्यावर फार लोभ जडला, इतका की देवाने या बालभक्ताचे सारे हट्ट पुरवावेत !

नामदेवाचे वडील दामाशेट यांचा विठ्ठलाला दररोज नैवेद्य दाखवावयाचा नेम असे. एकदा धंद्यानिमित्त त्यांना गावी जावयाचे होते म्हणून त्यांनी नामदेवास सांगितले. ‘ नामा, तू आज देवाला नैवेद्य घेऊन जा आणि नंतर भोजन कर.’ वडिलांच्या आज्ञे-प्रमाणे नाम्याने नैवेद्याचे ताट विठ्ठलापुढे ठेविले आणि म्हणाला ‘ देवा ! आता आपण भोजन करावे.’ पण देवाने त्यातील

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काहीच पदार्थ खाल्लें नाहीत. त्यावर बालबुद्धीला अनुसरून नामा म्हणाला, ' देवा, जेवत का नाही ? मला उशीर झाला म्हणून ? आज माझे वडील आले नाहीत म्हणून भोजन करणार नाही ? ते गावाला गेले आहेत म्हणून आईने मला पाठविले. तुम्ही जेवला नाहीत तर आई माझ्यावर रागावेल.' असे म्हणून नामा स्फुंदून रडू लागला. ती पाषाणाची मूर्ति जेवेल कशी ही कल्पना-सुद्धा त्याच्या बालमनाला शिवली नाही. नाम्याने देवाची खूप आळवणी केली, परोपरीने देवास जेवणाबद्दल विनविले. अजूनही देव जेवत नाही असे पाहून त्याने निर्वाणीचे शब्द उच्चारले, ' देवा ! पहा आता, तुम्ही अजून जेवला नाहीत तर मी या पायावर डोके आपटून प्राण देईन !'

आपल्या बालभक्ताची ही शुद्ध भक्ती आणि प्रेम पाहून पंढरी-नाथ प्रसन्न झाले ! त्यांनी बालभक्ताला प्रेमातिशयाने आलिंगन दिले, त्याची समजूत घातली आणि नैवेद्याचे ताट रिकामे केले! !

नामदेवाला अतिशय आनंद झाला आणि धावत धावतच तो घरी गेला. रिकामे ताट पाहून आईनें विचारलें, ' नैवेद्य कोणाला दिलास ?'

' अगऽऽ, कोणाला म्हणजें काय ? विठ्ठलाला ! माझ्यादेखत त्याने तो खाल्ला ! !' आईला हे खरे वाटेना. इतक्यात दामाशेटी परत आले. दामाशेटींना सर्व वृत्तांत कळल्यावर ते म्हणाले, ' देवानें कसे भोजन केलें ते तू आम्हांला उद्या दाखीव. उद्या तूच नैवेद्य घेऊन जा.'

दुसऱ्या दिवशी नित्याप्रमाणे नैवेद्याचे ताट घेऊन नामदेव राउळात गेला आणि ताट त्याने विठ्ठलापुढे ठेविले देव म्हणाले,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'आज तू दामाशेटीस बरोबर आणले आहेस. त्यांच्यादेखत नाही मी जेवणार.'

हे बोलणे नामदेवास न आवडून तो देवास म्हणाला, 'देवा. तुम्ही कपटी आहात. तुम्ही मला भेट देता आणि माझ्या वडिलांना का भेट देत नाही ?'

यावर देव मनापासून हसलें. दामाशेटीस भेट देऊन देवांनी भोजन केले !! दामाशेटीस खूप आनंद झाला. आपल्याला नामदेवामुळे आज विठ्ठलाचे प्रत्यक्ष दर्शन घडले याबद्दल त्यांना अतिशय धन्यता वाटली, कृतार्थ झालो असे त्यांना वाटले. विठ्ठलाला मनोभावे साष्टांग प्रणिपात करून दामाशेटी नामदेवास हाती धरून घरी परतले.

□ □

२. नामदेवाचे मडके कच्चे !

ज्ञानेश्वरमहाराज तीर्थयात्रेला निघाले तेव्हा त्यांच्याबरोबर त्यांची बहिण–भावंडे तर होतीच, शिवाय चोखामेळा, सावता माळी, भानुदास इ. अनेक संत होते. यावेळेपावेतो विठ्ठलाचे श्रेष्ठ असे एकमेव भक्त म्हणून नामदेवमहाराजांची ख्याती पसरली होती. नामदेवांनाही बरोबर चलण्याचा आग्रह केला. ज्ञानदेवांचा सहवास घडणार म्हणूत नामदेव आनंदित झाले. तरी पंढरी सोडून बाहेर जाण्यास ते तितके उत्सुक नव्हते. ते म्हणायचे, ' स्वर्गसुख मज आहे पांडुरंगी। जाणे कवण्यालागीं कवण्या ठाया ?' पण खुद्द विठ्ठलांनीच जेव्हा नामदेवास ज्ञानेश्वरांच्या सहवासाचा लाभ घेण्यास सांगितलं तेव्हा ते कबूल झाले. ज्ञानदेवांना

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामदेवांची उत्कट भक्ती पाहून अतिशय आनंद होई. पण त्यांची भक्ती ही एकांगी होती, त्यांना आत्मज्ञानाचा अनुभव आलेला नव्हता. ही गोष्ट ज्ञानदेवांनी मोठ्या खुबीने नामदेवांना पटविण्याचा प्रयत्न केला.

तीर्थे हिंडता हिंडता सर्व संतमंडळी गोरोबा कुंभार यांच्या गावाला आली आणि गोरोबाकडेच सर्वांनी मुक्काम ठोकला. गोरोबाला अर्थातच खूप धन्यता वाटली. गोरोबाच्या हातातील थापटणे पाहून मुक्ताईने सहज विचारले, 'गोरोबाकाका हे काय आहे हो?'

'ताई, हे थापटणे आहे. मडकी कच्ची आहेत की पक्की आहेत हे या थापटण्यामुळे मला कळते.' गोरोबांनी उत्तर दिले.

निर्गुण, निराकार, परमेश्वराच्या सत्य स्वरूपाची ओळख नामदेवांना झाली नव्हती. शिवाय देव आपल्याशी बोलतो, चालतो याबद्दल त्यांच्या मनांत थोडा सात्त्विक अभिमान निर्माण झाला होता. वस्तुतः भक्ती हे सर्वस्व नसून आत्मज्ञानाचे ते एक साधन आहे आणि आत्मज्ञान गुरुकृपेवाचून होत नाही, हा सिद्धांत नामदेवांना अद्याप पटावयाचा होता. ही गोष्ट पटविण्याकरिता मुक्ताईला नामदेवांची मौज करावीशी वाटली आणि तिने गोरोबाकाकांना सांगितले, 'काका, ही सर्व माणसे म्हणजे ईश्वर-निर्मित मडकीच आहेत, त्यांतील कच्ची कोणती व पक्की कोणती हे सांगाल का?'

ज्ञानदेवांच्याही मनात गोरोबाने परीक्षा करावी असे होते. गोरोबा तेथे जमलेल्या सर्व लोकांत वयाने व अनुभवाने मोठे होते तरी ते म्हणाले, 'महाराज मी जातीचा कुंभार खरा, पण या मडक्यांसंबंधी मी कसे सांगू? मला काय अधिकार?' 'त्यात

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काय आहे ? तुम्ही जशी मडक्यांची परीक्षा करता तसेच करा म्हणजे झाले.' ज्ञानोबांनी सुचविले.

ज्ञानदेवांची आज्ञा घेऊन गोरोबांनी हातातील थापटणे प्रत्येकाच्या डोक्यावर चालविले. कोणीहि हूं की चूं केले नाही. सर्वांनी सोशिकपणा दाखविला. पुढे नामदेवावर पाळी आली. गोरोबांनी त्यांच्या डोक्यावरही थापटणे चालविले तोच नामदेव 'आई ग ?' करून ओरडले 'काका ! हा काय पोरकटपणा चालविला आहे ? कोणत्या गावचा हा आदरसत्कार ?'

गोरोबांनी निर्णय दिला,' हे मडके अजून कच्चे आहे !'

मुक्ताबाई त्यावर तावडतोब उद्गारली, 'असं होय. मग ते अजून चांगले भाजले पाहिजे ! होय की नाही गोरोबाकाका ?'

यावर सर्व मंडळी हसू लागली. नामदेव मनात खजील झाले, पण ज्ञानदेवांनी त्यांची समजूत घालून —

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सद्‌गुरुवाचोनी सापडेना सोय ।
धरावे ते पाय आधीं त्याचे ।।

गुरुकृपेवाचून सद्‌गति नाही, असे मोठ्या प्रेमाने आणि आग्रहाने त्यांना सांगितले. पुढे पांडुरंगानेही आपल्या प्रेमळ भक्ताला तेच सुचविले.

□ □

३. शिवपिंडीवर पाय !
पायांखाली पिंडीच पिंडी ! !

नामदेवांना गुरु करण्यासंबंधी ज्ञानेश्वरांनी व पंढरीनाथांनी अनेक दृष्टांत देऊन गुरूखेरीज तरणोपाय नाही असे विनवून सांगितले. परमात्मस्वरूपाचे पूर्ण ज्ञान घेण्यास गुरूपदेश घेणे आवश्यक आहे. सद्‌गुरुकृपेवाचून ज्ञानप्राप्ती होणार नाही अशी नामदेवांची खात्री झाल्यानंतर त्यांनी देवाला विचारलें, 'देवा, तुम्ही म्हणता ते मला पटले. कोणता गुरु करू ते आता सांगा.'

'गोदावरीचे तीरी औंढ्या नागनाथ म्हणून एक क्षेत्र आहे. तेथे विसोबा खेचर या नावाचे एक परमभक्त राहातात. त्यांची अनन्यभावे सेवा कर म्हणजे ते तुला उपदेश करतील.'

नामदेवबुवा निघाले. काही दिवसांच्या प्रवासानंतर ते औंढ्या नागनाथ येथे येऊन पोहोचले. दुसरा दिवस गुरुवारचा होता, शिवाय त्या दिवशी अमृतसिद्धि योग होता. विसोबाबुवा देवळात आहे असे कळल्यावर हा सुयोग जाणून नामदेव नागनाथाच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मंदिरात गेले. नामदेवांनी देवळात पाऊल ठेवताच त्यांना अगदी ओंगळ दृश्य दिसले. त्यांना शिसारी आली. एक मनुष्य कुष्ठरोगाने पछाडलेला दिसला. पायांतून रक्त व पू वाहात होता, अंगावर माशा घोंघावत होत्या. चहूंकडे दुर्गंधी पसरलेली आणि विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे हा मनुष्य खुशाल तेलाने लडबडलेल्या पादत्राणासह आपले पाय नागनाथाच्या पिंडीवर ठेवून पहुडला आहे! शिवपिंडीवर पाय!! यामुळे तर नामदेवाला अधिकच संताप आला. ते त्याला दूषणे देऊन म्हणाले, 'अरे बाबा, तुला कसे समजत नाही ? ही शिवाची पिंड ! आणि त्यावर तू खुशाल पाय टाकून पडला आहेस ! तू आहेस तरी कोण ?'

'अरे मुला, तू कोण आहेस ?' विसोबांनी विचारले.

'मी नामदेव आहे. विठ्ठलाचा परमभक्त आहे. मला देवाचे दर्शन घ्यावयाचे आहे. तू पिंडीवरील पाय काढ. पण तू कोण आहेस ?'

'अरे पोरा, मी तर अगदी म्हातारा झालो आहे. फार थकलो आहे. तूच माझे पाय बाजूला कर ना. देवावर उपकार होतील आणि माझ्यावरही.'

नामदेवांनी मोठ्या कष्टाने त्याच्या पायाला स्पर्श करून ते पिंडीवरून उचलून बाजूला ठेविले. पण काय चमत्कार! त्याच्या पायाखाली पुन्हा शिवपिंड !! अनेक वेळा त्याचे पाय नामदेवांनी फिरविले तरी प्रत्येक खेपेस त्याच्या पायाखाली शिवलिंग तयार. त्याच्या पायाखालचे शिवलिंग काही हलेना !

नामदेवांना मोठे आश्चर्य वाटले आणि त्यांनी हेच विसोबा खेचर असावेत असा तर्क केला. पण देवाला दूषण देऊन, 'काय हा माझा गुरु ? देवाला म्हणावे तरी काय ?' असे विचार मनात

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येतात तोच विसोबाबुवांनी नामदेवास डोळे मिटण्यास सांगून थोडया वेळाने ते उघडण्यास सांगितले. नामदेवांनी डोळे उघडून



पाहिले तो त्यांना गुरुनाथाची तेज:पुंज मूर्ती दिसली. नामदेवांना धन्य झालो असे वाटले आणि त्यांनी त्यांच्या चरणी लोटांगण घातले.

विसोबा खेचरांनी नंतर 'देवावीण ठाव रिता कोठे आहे। विचारोनि पाहे नामदेवा ॥' असे म्हणून परमेश्वराच्या सर्वसाक्षित्वाचा उपदेश केला. जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी, थोडक्यात सर्व ब्रह्मांडी परमेश्वर भरलेला आहे याचे दिव्य ज्ञान त्यांना दिले.

नामदेव सद्गुरूपदेशाने पूर्ण समाधानी होऊन पंढरपूरला परतले आणि सर्व वृत्तान्त त्यांनी विठोबाला निवेदन केला.

□ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४. नामदेव चितेवर बसले !

एकादशीचे व्रत पाळण्यासंबंधी नामदेवांचा विशेष कटाक्ष असे. या दिवशी अन्नग्रहण करणे म्हणजे महाभयंकर पाप करणे असे ते समजत.

एकदा विठ्ठलांनी नामदेवाची परीक्षा पाहण्याचे ठरविले. एका वृद्ध माणसाचे रूप घेऊन एकादशीचे दिवशी ते नामदेवाकडे गेले आणि म्हणाले, 'नामदेवा, मी भुकेने व्याकुळ झालो आहे. मला अन्न वाढ, तुझ्या औदार्याची कीर्ती मी ऐकली. अतिथीला तू कधीच विन्मुख पाठवीत नाहीस असे कळले. तेव्हा तुझ्याकडेच येऊन क्षुधाशांती करावी म्हणून आलो आहे. भुकेने माझे प्राण अगदी कंठाशी आले आहेत. कसेही कर आणि मला अन्न वाढ.'

'महाराज, आज एकादशी आहे. एकादशीला अन्नग्रहण करू नये हे मी सांगायला पाहिजे का ? आपणास मी दूध, फळे, फराळाचे पदार्थ खायला देतो, ते सेवन करून आपली क्षुधा अगदी आनंदाने भागवावी.'

'नाही रे बाबा, माझ्या अंगात अगदी त्राण उरला नाही. मला अन्नच दे. नाही दिलेस तर माझा प्राण जाईल. आणि तुला मात्र ब्रह्महत्येचे पाप लागेल.'

'अरे, मी पुण्याचा विचार करीत नाही तर पापाचा कशाला विचार करतो ? तुझी जी अवस्था होईल ती माझीही !' नामदेव इतके बोलत आहेत तोंच त्या ब्राह्मणाने डोळे फिरवले आणि प्राण सोडला ! नामदेवांनी जवळ जाऊन पाहिले तर तो खरोखरीच गतप्राण झालेला त्यांच्या दृष्टीस पडला ! नामदेवांना अतिशय

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दुःख झाले. आपणच त्याच्या मृत्यूस कारणीभूत झालो आहोत,

म्हणून त्यांना अधिकच वाईट वाटले. पण करणार काय ? आपला हेतु काही वाईट नव्हता. तरीसुद्धा मनाने ठरविल्याप्रमाणे त्याच्या प्रमाणेच आपली स्थिती झाली पाहिजे. असे म्हणून नामदेवांनी ब्राह्मणाचे प्रेत चंद्रभागेच्या काठावर नेले. त्याची चिता रचली, त्यावर त्याला निजवले आणि आपणही त्याच्या जवळ बसून चिता पेटविली ! अग्नि भडकला ! !

नामदेवाचा दृढ निश्चय व भक्ति पाहून देव संतुष्ट झाले आणि प्रेमाने त्यांनी नामदेवाला आलिंगन दिले !

□ □

५. नामदेवांची सत्त्वपरीक्षा

बेदर येथील एका भगवद्भक्ताच्या अत्याग्रहामुळे विठोबारायाच्या आज्ञेनुसार नामदेवमहाराज त्या ब्राह्मणाबरोबर बेदर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येथे जाण्यास निघाले. त्यांच्याबरोबर वरीच भक्त मंडळी होती. सबंध वाटेवर टाळ–मृदंगांच्या घोषांत विठ्ठलनामाचा जयजयकार होई आणि मुक्कामाला कीर्तने होत. असा कार्यक्रम करीत सर्व मंडळी बेदरच्या वेशीजवळ आली.

बेदरच्या बादशहाने हे सर्व दृश्य पाहिल्यावर त्याला एखादे सैन्यच येत आहे की काय असे वाटले. त्यांनी काशीपंतांना म्हणजे आपल्या प्रधानजीला ताबडतोब पायदळाची एक तुकडी पाठवून चौकशी करण्यास सांगितले. खरी स्थिति कळल्यावर काशीपंतांनी राजास सांगितले, 'आम्हा हिंदूंचा देव विठोबा. त्याचा परमभक्त नामदेव आपल्या भक्तमंडळींसह भजन करीत येत आहे. ते सैन्य वगैरे काही नाही. काळजी करण्याचे मुळीच कारण नाही.' पण त्या राजास हे काहीच पटले नाही. तो म्हणाला, 'कसला दास आणि कसला भक्त. जोराने गर्जना करीत मोठ्या दिमाखाने आमच्या राज्यात त्याने प्रवेश करावा हा आमचा अपमान आहे. त्याच्या ह्या उद्धटपणाबद्दल त्याला शिक्षा झालीच पाहिजे.' असे बोलून त्याने गारद्यांना बोलावून आणून सांगितले–

'जा, आत्ताच्या आत्ता जा आणि त्या नामदेवाला आणि त्याच्या बरोबरच्या लोकांना गिरफदार करून माझ्यापुढे घेऊन या.'

त्या गारद्यांनी सर्वांना पकडून आणून मेंढराप्रमाणे बादशहापुढे उभे केले. सर्व मंडळी घाबरून गेली. आता काय अनर्थ ओढवतो आहे या विचाराने काशीपंतांचा जीव खालवर होऊ लागला.

बादशहाने एक गाय आणवून खाटकाकडून सर्वांच्या देखत तिची कत्तल करविली ! नंतर नामदेवांस उद्देशून तो म्हणाला,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'तू खरा भक्त असशील तर ही गाय जिवंत कर, मग तुला आम्ही सोडून देऊ; नाहीतर तुम्हा सर्वांना बाटवून मुसलमान करून टाकू.'

नामदेव दिङ्मूढ झाले. त्यांच्या सत्त्वपरीक्षेचीच वेळ येऊन ठेपली. सर्वांची तोंडे म्लान झाली. नामदेवांना भडभडून आले. त्यांनी उमाळा आवरला, गायीचे डोके आपल्या मांडीवर घेतले आणि पंढरीरायाचा अनन्यभावे धावा करण्यास सुरुवात केली.

आपल्या लाडक्या भक्ताची आर्त हाक येताच वायूच्या वेगाने पंढरीनाथ नामदेवाजवळ जाऊन गुप्तपणे उभे राहिले. दिव्य दृष्टीने विठ्ठलाची श्यामसुंदर मूर्ति पाठीशी उभी असलेली पाहून नामदेवांच्या डोळ्यांत विलक्षण तेज भरले. त्याने अगदी शांत चित्ताने गायीच्या मृतदेहावरून प्रेमळ पद्महस्त फिरवताच बाजूला पडलेले ते शीर आपोआप धडाला जाऊन भिडले!! आणि आश्चर्य असे की, गाय पूर्ववत् पायावर उभी राहिली!!!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तत्काळ सर्वांनी ‘ पुंडलीक वर दे हरि विठ्ठल ’ या मंत्राचा गगन-भेदी गजर केला. प्रेतकळा पसरलेल्या दृश्यावर चैतन्य पसरले. सर्वांच्या तोंडून धन्योद्गार बाहेर पडले. नामदेवापुढे सर्वांनी लोटांगणे घातली. काशीपंतांचा आनंद मनात मावेना. त्यांनीही बादशहादेखत नामदेवांना साष्टांग प्रणिपात केला. आर्त हाकेला ओ देऊन भक्ताची लाज विठ्ठलाने राखली म्हणून नामदेवांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहू लागल्या.

हा सर्व देखावा पाहून यवनराजा जागच्या जागी थिजून गेला. त्यालाही कमालीचे आश्चर्य वाटले.

भक्तजनांचे निष्कारण हाल केल्याबद्दल राजाला आणखी एक धक्का बसला. श्रीपांडुरंगानी मायेच्या योगाने एकाएकी इतके सर्प निर्माण केले की, सगळा राजवाडा व भोवतालचा भाग काळ्या, पिवळ्या, तांबड्या सर्पांनी व्यापून टाकला ! शेकडो लोकांना त्यांनी दंश केले. प्रजाजन पटापट मरू लागले ! चहूंकडे हाहा:कार उडाला !

बेदरचा बादशहा या भयंकर दृश्याने चांगलाच गांगरून गेला. त्याच्यां तोंडचे पाणी पळाले. शेवटी त्याने काशीपंतास बोलावून आणून सांगितले, ‘ नामदेवांशिवाय आपण संकटमुक्त होऊ शकणार नाही. तेव्हा त्यांच्याकडे जाऊन हा अनर्थ थांबविण्याची आमच्यातर्फे त्यांना प्रार्थना करा.’

नामदेवमहाराजांपुढे काशीपंतांनी साष्टांग नमस्कार घातला आणि विनविले, ‘ महाराज, आम्हाला या अनर्थातून वाचविण्यास आपणाशिवाय दुसरा कोण समर्थ आहे ? आपणच आमचे त्राते.’

चहूंकडे हाहा:कार उडालेला पाहून नामदेवांचे अंत:करण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

द्रवले, त्यांनी मग प्रेतांकडे कृपादृष्टि टाकून सर्वांना जिवंत केले. सगळे सापहि जागच्या जागी अदृश्य झाले.

बेदरचा बादशहा नामदेवांचे सामर्थ्य पाहून अगदी थक्क होऊन गेला, पण त्याचबरोबर संकटातून मुक्त झाल्याबद्दल त्याला अतिशय आनंद झाला. त्याने नामदेवांना दरबारात बोलावून त्यांचा मोठा गौरव केला आणि पश्चात्ताप पावून क्षमेची याचना केली.

□ □

६. धोंडोबा व गणोबा यांना पांघरुणे

नामदेवाचे वडील त्याला म्हणाले, 'नामा, आम्ही म्हातारे झालो, तू आता कापड घेऊन बाजारात जात जा. प्रपंचाची जबाबदारी आता तू संभाळ.'

नामदेव कापडाचे गाठोडे घेऊन बाजारात गेले. तेथे पुष्कळ व्यापारी आले होते. त्यांनी आपापली दुकाने थाटली व मालाची विक्री सुरू केली. नामदेवाचे धंद्याकडे लक्षच नसल्याने त्याच्या कापडाची विक्री कशी होणार ? त्याचे सारे लक्ष ईश्वरचिंतनात आणि नामजपात. संध्याकाळपर्यंत इतर व्यापाऱ्यांनी बराच माल खपवून पैसा जमा केला होता. अंधार पडताच सर्वांनी दुकाने बंद केली. नामदेवांनीहि आपले सर्व कापड बांधून ते धर्मशाळेत गेले. तेथे फराळ उरकल्यानंतर त्यांनी तेथे भजनास सुरुवात केली. नाम-कीर्तन झाल्यानंतर ते स्वस्थपणे झोपी गेले. शांतपणे त्यांना झोप लागली !

प्रात:काळ होताच नामदेवांनी स्नान वगैरे करून गाठोडे पाठीवर टाकून घरचा रस्ता सुधारला. वाट चालता चालता त्यांची दृष्टि एका शेताकडे गेली. तेथे पुष्कळच लहानमोठे धोंडे इकडे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तिकडे पडलेले त्यांना दिसले. दिवस कडक थंडीचे होते. उघडे पडलेले दगड पाहून 'बिचारे धोंडे ! थंडीने काकडत पडले आहेत. त्यांना आपण पांघरुणे घातली तर... ?' असा विचार मनात येताच त्यांनी आपले गाठोडे सोडले आणि प्रत्येक धोंड्याला त्यांनी पांघरूण घातले ! ! सर्व कापड खलास ! पण पैशाचा प्रश्न कसा सोडवायचा ? वडिलांना काय सांगणार ?

पण त्यांना एक युक्ति सुचली. सर्वांत मोठ्या धोंड्याजवळ

जाऊन त्याला नामदेव म्हणाले, 'अहो गणोबा , आम्ही तुम्हांला सर्व कापड विकले आहे. पण पैशाचे काय ? ते केव्हा देणार ?'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दगडच तो. तो काय बोलणार ?

नामदेवांनीच त्याच्यातर्फे उत्तर दिले, ' आज आमच्या जवळ पैसे नाहीत. पुढल्या आठवडयात जेव्हा बाजाराला याल तेव्हा सारे पैसे चुकते करू. '

नामदेव विचारतात, ' पण आम्ही खात्री कशी बाळगावी ?'

या दगडाजवळ आणखी एक मोठा दगड होता. त्याच्यासमोर जाऊन त्याला नामदेव म्हणाले, ' अहो धोंडोबा, तुम्ही गणोबाला जामीन राहात असाल तर ठीक आहे. तुमची जामिनकी मी मान्य करतो. '

धोंडोबाचे उत्तर नामदेवच बोलले, ' हो, हो. पैशाची काही काळजी करू नका. '

स्वतःच हा सर्व संवाद करून नामदेव आपल्या गावी परतले आणि तडक राऊळात जाऊन पंढरीनाथाला त्यांनी सर्व वृत्तान्त सांगितला.

आपल्या मुलाने कापड सगळे विकून टाकले पण पैसे न घेता तो तसाच परत आला आहे असे दामाशेटीस समजले.

मुलगा घरी परत आल्यावर त्यास दामाशेटीने विचारले, ' कापड विकून पैसे काही आणले नाहीस. कोणाशी व्यवहार केला आहेस ते आम्हाला सांग तरी. पैसे केव्हा मिळणार आहेत ?'

गणोबा नाईकास मी सर्व कापड उधारीवर दिले आहे. तो आठवडयानंतर पैसे देणार आहे. शिवाय धोंडोबा त्यास जामीन राहिला आहे. पैशाची काळजी करण्याचे कारण नाही. ' नामदेवांनी उत्तर दिले.

आठ दिवसांनंतर नामदेव त्या ' गणोबा ' कडे गेले आणि,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

' गणोबा, वायद्याची मुदत संपून गेली. आमचे पैसे आता देऊन टाकून आम्हांला मोकळे करा ना. '

नामदेवांनी असे दोनदा विचारले. ' गणोबा ' पडले दगड ! ते काय बोलणार ? ते बोलत नाहीत असे समजून नामदेव त्यांचे जामीनदार ' धोंडोबा ' त्यांचेकडे गेले व म्हणाले, ' गणोबा आमचे पैसे काही देत नाहीत, तुम्ही जामीन आहात. तेव्हा तुम्ही पैसे देऊन टाका. '

धोंडोबा काही बोलेनात. ते कसले बोलतात ?

तेव्हा नामदेव म्हणाले, ' तुम्ही पैसे देत नाही तर चला आमच्या वडिलांकडे, तुम्ही जामीन आहात ! ' असे म्हणून धोंडोबांना लोटीत नामदेवांनी त्यांना घरी आणले आणि तळघरात कोंडून ठेविले !

या वेळी दामाशेटी घरी नव्हते. पण थोड्या वेळाने ते घरी आल्यावर नामदेवाने एक मोठा दगड घरात आणून ठेविला आहे असे त्यांना कळले. नामदेव या वेळी देवळात विठोबाकडे गेले होते.

दामाशेटीने एका मुलाला देवळात पाठवून नामदेवाला घेऊन येण्यास सांगितले. बोलावणे आलेले पाहाताच नामदेव मनात चरकले आणि काकुळतीस येऊन विठोबाकडे ते टक लावून बघू लागले.

विठ्ठलाने आश्वासन दिले, ' जा, तू घरी जा. काही काळजी करू नकोस. जाताना माझे चिंतन कर म्हणजे झाले. '

नामदेव घरी आल्यावर वडील उद्गारले, ' नाम्या, हे काय केलेस ? भांडवल सारे गमावलेस. असाच का व्यापार करणार तू ? आणि दगड कशाला घरात आणून ठेवला आहेस ? '

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामदेव शान्त चित्ताने म्हणाले, 'बाबा, मी सर्व कापड विकले. पैशाबद्दल जामीन राहिलेल्या 'धोंडोबा' ला मी घरी आणले आहे. त्याच्याकडून पैसे घ्या.' असे म्हणून नामदेवांनी 'धोंडोबा' ला आपल्या वडिलांपुढे आणून उभे केले. धोंडा पाहताच सर्व आश्चर्यचकित होऊन गेले ! धोडा कसला तो ? दिव्य सुवर्णाचा ! ! नामदेव म्हणाले, 'याच्याकडून कापडाचे सगळे पैसे वसूल करा आणि बाकीचे गण्णोबाकडे परत करावयाचे आहेत.'

ही बातमी सर्वत्र पसरली. जवळपासचे पुष्कळ लोक हा चमत्कार पाहण्यास जमले. विशेष गोष्ट म्हणजे हा धोंडा ज्या शेतातील होता त्या शेताचा मालक आपला धोंडा मागण्यास धावत धावत आला.

'हा धोंडा माझा आहे. मला तो परत मिळाला पाहिजे.' मालक उद्गारला.

'कापडाचे सगळे पैसे चुकते करा आणि दगड खुशाल घेऊन जा.' नामदेव बोलले.

मालकाने हर्षभरित होऊन सर्व पैसे देऊन टाकले आणि धोंडा घरी नेला.

घरी जाताच सुवर्णाच्या धोंड्याने आपले मूळ रूप धारण केले ! मालक खिन्न झाला. त्याने तो धोंडा उचलून नामदेवाच्या घरी आणून टाकला.

या धोंड्याची पूजा अद्याप होत असते

□ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

७. भक्ताकरिता देवाने देऊळ फिरविले !

एकदा नामदेव, ज्ञानदेव, इ. अनेक संतांचा मुक्काम औंढ्या नागनाथ येथे पडला. तो दिवस महाशिवरात्रीचा असल्याने सर्वांनी सकाळी स्नानसंध्या वगैरे उरकून नागनाथाच्या मंदिरात नामसंकीर्तनाला सुरुवात केली. नामदेव निरूपण करण्याकरिता नागनाथासमोर उभे राहिले.

ती वेळ सकाळची असल्यामुळे ब्राह्मण वगैरे मंडळी नागनाथाच्या दर्शनाला व अभिषेकाला येऊ लागली. कीर्तनाला खूप गर्दी जमल्याने सोवळे नेसून आलेल्या ब्राह्मणांना मोकळी वाट मिळणे कठीण झाले. वाट मिळण्याकरिता ब्राह्मण वाद घालू लागले आणि या टाळकऱ्यांना नावे ठेवू लागले. काही लोक नामदेवांच्या अंगावर खेकसले. तर काही 'त्याला धक्के मारून घालवून देऊ.' असे बोलू लागले. शिंपी जातीच्या एका टाळकऱ्याने शंकराच्या देवळात येऊन टाळ कुटाव्यात आणि शेकडो लोकांनी भाविकपणे त्याला साथ द्यावी हे दृश्य पाहून काही सोवळ्या व कर्मठ ब्राह्मणांच्या पायाची आग मस्तकापर्यंत गेली. वाद काही थांबेना व वाट काही मिळेना. त्यांच्यापैकी एकाने सुचविले, 'अहो शिंपीबुवा, तुमचे हे भजन–कीर्तन देवळाच्या मागे खुशाल चालू द्या. आमची त्याला हरकत नाही. आम्हांलाहि सोवळ्याने जा–ये करण्यास वाट मोकळी होईल.'

नामदेवांनी सूचना मान्य केली. पण ऐन रंगात आलेल्या कीर्तनात व्यत्यय आल्याने लोकांचा विरस झाला. श्रोत्यांना वाईट वाटले. पण नामदेव देवळाच्या मागे जाऊ लागले तसे मग श्रोतेहि जाऊ लागले. कीर्तनात पण तितकासा रंग भरेना. नामदेवांनी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'पुंडलीक वरदे हरि विठ्ठल !' असा हरिनामाचा जयजयकार करण्यास सुरवात केली. कीर्तनात रंग भरण्याकरिता परमेश्वर धावून आले. चमत्कार असा कीं, स्वर्गातून नऊ लक्ष पताकाधारी वारकरी खाली उतरले ! आणि कीर्तनात येऊन बसले !!

हा चमत्कार पाहून श्रोत्यांना परमावधीचा आनंद झाला. मंत्रमुग्ध होऊन ते चोहोकडे टकमका पाहू लागले. टाळचांचा गजर थांबेना. नामदेवांच्या डोळचांतून तर धारा वाहू लागल्या !



पण नामदेवांच्या मनाला एक गोष्ट मात्र खटकत होती. सर्व काही व्यवस्थित आहे. पण नागनाथ पाठमोरे झालेले. नामदेवांनी सद्गदित होऊन नागनाथाचा आर्तस्वराने धावा सुरू केला. नागनाथाचे ध्यान करून त्याच्या रूपावर लक्ष एकाग्र करून आणि कळवळून शंकराचा धावा सुरू केला. शंकर दूर थोडेच होते ? नामदेवांचे भाग्य थोर. नागनाथांनी नंदीस मागे टाकून देवळाचे तोंडच फिरविले !! आणि कीर्तन श्रवण करू

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लागले. नागनाथाचे सामोरे दर्शन होताच नामदेवांचे आणि श्रोत्यांची अंतःकरणे आनंदाने फुलून गेली. टाळचांचा कडकडाट वाढला आणि कीर्तनाला कमालीचा रंग चढला.

देवळांत पिंडीवर पाणी ओतणाऱ्या ब्राह्मणांना याची दादहि नव्हती. ब्राह्मण देवळातून बाहेर पडतात तो नामदेव त्यांच्या सन्मुख ! त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. नामदेवांची उत्कट भक्ति पाहून देवाने देऊळच फिरवले, ही गोष्ट लक्षात आल्यावर त्यांनी नामदेवांचे पाय धरिले आणि दुरुत्तराबद्दल क्षमेची याचना केली.

नागनाथांनी फिरवलेले देऊळ अद्यापही त्याच स्थितीत पाहावयास मिळते.

□ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देवाला अंकित करणारी नामयाची दासी

श्री संत जनाबाई

(त्रोटक जीवनवृत्तांत — मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात गंगाखेड नावाचे एक गाव आहे. तेथे दमा या नावाचा एक शूद्र राहात असे तो भगवत-भक्त असून पंढरीची वारी अनेक वर्षे करीत असे. त्याची बायको करुंड ही पतिव्रता स्त्री असून तीही नवऱ्याबरोबर पंढरपूरची यात्रा करी. या दांपत्याला मूलबाळ नसल्याने ते मनातून खिन्न असे. एक साल त्यांनी पंढरपूरला गेल्यावर विठ्ठलाला नवस केला. विठ्ठलानेही दम्याची नि:सीम आणि उत्कट भक्ती पाहून त्याला दृष्टांत दिला. 'तुला एक कन्यारत्न होऊन ती तुझ्या कुळाचा उद्धार करील.' परमेश्वराच्या दृष्टान्तानुसार त्यांना एक मुलगी झाली. तिचे नाव जनाबाई. परमेश्वर पावल्यामुळे आपल्या छोट्या जनीला घेऊन ते दांपत्य पंढरपूरला विठ्ठलाच्या पाया पडण्यास गेले. देवाचे भक्ति-भावाने दर्शन घेतल्यावर गावी परत जाण्यास निघाले. पण जना तेथून काही हलेना. तिने तिथेच राहाण्याचा हट्ट घेतला. आणि ती एकटी राहिली ! पुढे नामदेवाचे वडील दामाशेटी यांनी या पोरक्या मुलीला घरी आणले आणि तिचे पालन–पोषण केले.

नामदेवाचे घरी जनाबाई घरची सर्व कामे करी. नामदेवाची भक्ति पाहून तीही विठ्ठलाची भक्ती करी, नामदेवाबद्दल तिच्या मनात नितान्त आदर उत्पन्न झाला होता. आणि 'नामयाची दासी' असे स्वतःला म्हणवून घेण्यात ती धन्यता मानी.

'जनी म्हणे जोड झाली विठोबाची । दासी नामयाची म्हणोनिया ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जनाबाईने दोनशेच्या वर अभंगरचना केली. 'मराठी साहित्यात संत जनाबाई इतकी लोकप्रिय कवियित्री दुसरी कोणी झाली नाही,' अंतरीचे उमाळे अभंगांच्याद्वारे तिने शब्दांकित केले.)

१. जनीचा आगळा हट्ट

जनीचे वडील आपल्या झोपडीत एके संध्याकाळी विठ्ठलाचे उत्कट भक्तीने नामस्मरण करीत होते. पांडुरंगाशी अगदी एकरूप होऊन गेले. एकाएकी त्यांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू वाहू लागले. समोर पांडुरंगच उभा आहे असे पाहून 'पांडुरंग... पांडुरंग' असा त्यांनी टाहो फोडला.

डोळे उघडून पहातात तो तेथे कोणीच दिसेना. पण पांडुरंगाने त्याची आर्तता पाहून दम्याला सांगितले, 'दमा, तुला कुळाचा उद्धार करणारी एक सुकन्या होणार आहे. दमा अतिशय आनंदित झाला. त्याने ही घटना आपल्या बायकोला सांगितली. दोघेही आनंदी मनाने प्रसन्न राहिले. कालांतराने जनाबाई या भूतलावर अवतरली. देवाने आपला शब्द खरा केला. जनाबाई थोडी मोठी होताच तिच्या आईवडिलांबरोबर ती पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनाला गेली.

देवळात टाळ–मृदुंगांचा आवाज घुमू लागला, विठ्ठलाच्या नावाचा गजर सुरू झाला. 'अवघी दुमदुमली पंढरी.'

दम्याने जनीला विठ्ठलाला मनोभावे नमस्कार करण्यास सांगितले. जनीने विठ्ठलास हात जोडून अनन्यभावे नमस्कार केला आणि ती त्याचेकडे एकटक पाहू लागली; क्षणात तिची तेथे समाधी लागली. तेथून ती हलेनाच. मनोमन अंतर्यामीची खूणगांठ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पटली की काय? वडील एकसारखे तिला 'चला जाऊ या' म्हणून म्हणत होते.

पण तिचे आपले एकच, 'तुम्ही जा, मी येत नाही.'

'अगं, असं काय करतेस? आपण पुन्हा येऊ, आता घरी गेले पाहिजे.' मुलीचा हा आगळा हट्ट पाहून आईला रडू कोसळले. 'अगं, तुला एकटीला सोडून कसे जाऊ? तुझ्याकडे कोण बघणार?'

जनी उत्तरली, 'विठ्ठल बघेल की!'

जनीचा हा अगदी आगळा हट्ट पाहून नाइलाजाने आई-वडील जड अंत:करणाने परत फिरले. विठ्ठलाचे ध्यान करीत जनीने देवळातच रात्र काढली. नंतर आई–वडिलांच्या नावाने तिने काकुळतीने पुकारा केला. पण तिथं कोण होतं? शेवटी पहाटेच्या सुमारास ती देवळाच्या कडेला रडवेली होऊन एकटी उभी राहिली!

नित्य नियमाप्रमाणे नामदेवाचे वडील दामाशेट पहाटे देव-दर्शनाला आले. एकटीच उभी असलेली ती पोर पाहून त्यांनी विचारले,

'कोण गं तू? आणि एकटीच कशी?'

जनीचे डोळे पाण्याने भरून आले आणि म्हणाली, 'मीच आई–वडिलांना जा, म्हणून सांगितलं, मी येत नाही, मी इथेच राहीन. पण आता मला वाईट वाटतं, मी चुकलेच.' आणि तिला रडू कोसळले. दामाशेटींना दया येऊन ते म्हणाले, अगं, तू रात्री कोठे होतीस?'

ती म्हणाली, 'इथेच पांडुरंगाजवळ!'

दामाशेटी मनात चरकले आणि चमकले! ते तिला म्हणाले, 'बाळ, रडू नकोस, तू चल माझ्याबरोबर आमच्या घरी' ती दामाशेटीबरोबर घरी गेली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घरी आल्यावर नामदेवाने विचारले, ‘ ही कोण ?’

दामाशेटीने सर्व हकीकत सांगितली. ‘ हिचे नाव जनाबाई. सबंध रात्र हिने पांडुरंगाच्या देवळात काढली ! हिला आपल्याकडेच राहावयास आणली आहे.’

नामदेवाने तिच्याकडे एक दृष्टिक्षेप टाकला आणि तो निघून गेला. त्याच्या आईच्या–गोणाईच्या कपाळाला मात्र आठ्या पडल्या. ती म्हणाली, ‘ आपली गरिबी, घरात चौदा तोंडे आणि हे पंधरावे ! यांना खायला काय घालू ?’

दामाशेटी शांतपणे उद्गारले, ‘ अग हे देवाघरचे लेकरू, आपण जे खातो तेच ती खाईल. शिवाय हिची कामाला मदत होईल.’

जनाबाई घाबरून गेली, पण लक्ष देवळातल्या पांडुरंगाकडे.

जनी म्हणाली,‘ आई, मी तुम्हाला जड होणार नाही. तुमच्या सर्व कामात तुम्हाला मी मदत करीन दोन घास कमी खाईन, घरातला केरवारा करीन, भांडी घासीन, धुणे धुईन, दळण-कांडण करीन ’ आणि ती कामाला लागली. पण काम करताना तोंडाने विठ्ठलाचे नाव.

अशा रीतीने जनाबाई आता नामदेवाच्या कुटुंबात सामावून गेली. नामदेवाबरोबर ती नित्यनियमाने देवळात जाई, भक्तियुक्त अंत:करणाने देवाचे भजन करी, नामस्मरण करी. देव मनातून संतुष्ट होई. ‘ देव भावाचा भुकेला, दुरी नाही देव त्याला–’ या उक्तीचा अनुभव जनाबाईला पावलोपावली येऊ लागला.

झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ।।
राना गेली शेणीसाठी । मागे विठ्ठल धावे पाठी ।।

□ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२. देव दळू लागले !

नामदेवाचे कुटुंब मोठे, पण सुखासमाधानाने कुटुंबातील मंडळी ईश्वरभजनात दंग होऊन कालक्रमणा करीत होती. जनाबाई तर कुटुंबात समरस होऊन गेलेली. नामदेवाची बहीण लाडाई व बायको राजाई हिच्याबरोबर प्रेमाने वागत. त्याची आई गोणाई मात्र कुटुंब मोठे असल्याने वैतागून जाई.

जनाबाई दिवसभराच्या कष्टाने दमून जाई. एके दिवशी रात्री सहज पडल्या पडल्या तिला झोप लागली. पण थोडी जागी होताच तिला कोणीतरी हाक मारल्याचा भास झाला.

'जना, जना, दार उघड' आवाज तर ओळखीचा वाटला, पण अशा वेळी कोण येणार? जनाच्या मनात थोडी चलबिचल झाली.

इतक्यात 'अगं, मी आलो आहे. तुझा पांडुरंग, दळण दळायचं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आहे ना ? तुला मदत करायला आलो आहे.' असा आवाज तिच्या कानी पडला. पूर्ण जागी होऊन तीं दरवाजाकडे पाहात राहिली. प्रत्यक्ष परमेश्वर !

शेजारी धान्याचे तुडुंब भरलेले भांडे पाहून तिलाही आनंद झाला आणि ती दळायला बसली. पांडुरंगानेही तिच्या जात्याच्या खुंट्याला हात लावला. जाते फार हलके लागत असून ते भराभर फिरत होते. जनाबाई गोड गळ्याने ओव्या म्हणत होती. या गोड आवाजात पांडुरंगही सुखावत होते.

पण या गाण्याच्या आवाजाने गोणाईला जाग आली. तावातावाने ती जनाबाईजवळ येऊन ठेपली, जात्यातून पडलेला पिठाचा ढिगारा पाहिला. भांडेही काठोकाठ भरलेले पाहिले. जनाबाई शांत. गोणाईनें हे सगळे पाहिल्यावर तिला त्वेष चढला आणि कडाडली, 'हे काय गऽऽ? या वेळी दळण दळतात ? लोकांची झोपायची वेळ, कोठून येवढे धान्य आणलेस, चोरी-बिरी केलीस की काय ? आणि जोडीला हा कोण गऽऽ?' जनाबाई काहीच बोलत नाही असे पाहून तिच्या रागाचा पारा चढला. कोपऱ्यातील काठी घेऊन ती तिने जनाबाईकडे भिरकावली. तिचा नेम चुकला आणि जनाला ती न लागता देवाच्या कपाळाचा अबीर-बुक्का त्या काठीने खाली पाडला आणि आश्चर्य घडले. त्या झोपडीतील सगळे वातावरण त्या सुवासाच्या घमघमाटाने भरून गेले !

'मी विठाई, विठाई' असा आवाज दुमदुमला.

गोणाई मात्र या अकल्पित घटनेने बावरून गेली, गांगरून गेली आणि मागच्या मागे पसार झाली.

जनाबाईकडे पाहून देव मात्र हसत होते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

 CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्रमल्यामूळे जनाबाई तेथेच पहुडली. देवालाही तेथेच पडावेसे वाटले. अंगावर एक वाकळ घेऊन ते तेथेच पडले व त्यांना झोप लागली.

पहाट झाली. जनाबाई जागी झाली, उठली, आणखी येथे कोण झोपले आहे म्हणून विचार करू लागली. झोपलेल्याच्या अंगावरची वाकळ बाजूला केली आणि आश्चर्यचकित झाली. प्रत्यक्ष पांडुरंग तेथे झोपलेले तिने पाहिले! ती घाबरली, गांगरली. लोक काय म्हणतील ? रुक्मिणीदेवीला काय वाटेल ? या विचारांनी ती गडबडली.

काकडआरतीची वेळ झाली आणि देव तर इथेच. तिने विठ्ठलाला गदगदा हलवून उठविले.

देव घाईघाईने निघून गेले.त्यांनी अंगावर घेतलेली वाकळ तशीच.

□ □

३. लोखंडाचा शूळ विरघळला !

पहाटेच्या काकडआरतीची वेळ झाली. घंटा घणघणू लागल्या. लोक जागे झाले. भक्तमंडळी देवळाकडे येऊ लागली. हार, फुले व इतर साहित्य घेऊन पुजारी देवळाजवळ आले. त्यांनी दरवाजाचे कुलूप काढले आणि ते आत शिरले. काकडआरतीची सर्व सिद्धता झाली. देवाला हार घालण्याच्या तयारीतच पुजारी असता तो एकदम दचकला, मागे सरला, थक्क झाला. त्याला बोलवेना, भीतीने गांगरून गेला. हा काय प्रकार? देवाच्या अंगावर साधी वाकळ? कोणी घातली? अंगावरचे भारी वस्त्र कुठे आहे? गळ्यातले रत्नपदक तर दिसतच नाही; हारही नाही. या चमत्काराचा अर्थ काय? कोणी चोरले? अशा विस्मयकारक विचारांनी पुजारी आणि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भक्तगण गांगरून गेले. शेवटी ही वाकळ कोणाची याचा ते विचार करू लागले. नाना कुतर्क सुरू झाले आणि शेवटी ती वाकळ जनीची ठरली ! पण ती देवाजवळ कशी गेली, रात्रभर दरवाजा तर बंद. हा चमत्कार घडला तरी कसा ? सगळेजण आश्चर्यचकित झाले. वाकळ जनाची म्हणून ती दोषी ठरली. तिच्यावर चोरीचा आळ आला.

हा सगळा गोंधळ चमत्कार ऐकून जनावाई हतबुद्ध झाली. तिला काही बोलवेना, सुचेना, ती स्तब्ध बसून राहिली.

लोक जनाबाईच्या घरी गेले. तिला बाहेर बोलावले आणि तिच्यावर देवाचा हार आणि रत्नपदक चोरल्याचा आरोप ठेवण्यात आला.

जनाबाईच्या अंत:करणात कालवाकालव सुरू झाली. अंत:करण फुटते की काय अशी तिला भीती वाटली. दु:खाच्या भरात ती देवाला दोष देऊ लागली.' अरे विठ्या, अरे विठ्या, मूळ मायेच्या कारट्या,' असा आक्रोश तिने सुरू केला. 'पांडुरंगा, हे काय झाले, मी काय करू आता ? खरंच मीं पदक चोरले नाही,' असे ती पुन: पुन्हा म्हणू लागली. अशा कांगाव्याला लोक थोडीच भीक घालणार ? नामदेवावरोबर ती देवळात गेली. पांडुरंगाचे पाय भिजवले, त्याचेकडे एकटक बघत राहिली, काही सुचेना, काही कळेना. देवाच्या पायावर डोके आपटून तिला जीव द्यावासा वाटला. आईबाप सोडताना ' पांडुरंग पाहील.' असे विश्वासाने तिने त्यांना सांगितले होते. आता तर आईबाप नाहीत. काय करू ? मरण पत्करले, पण हा चोरीचा आळ माझ्यावर नको. मरणापेक्षा दुष्कीर्ती तिला जाचू लागली. अंत:करण फुटायची वेळ आली. तिने पांडुरंगाचा धावा सुरू केला. 'पांडुरंग, पांडुरंग...

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लोकांनी जनाबाईला फाशी देण्याचे ठरविले. अपराधच भयंकर होता. देवाच्या अंगावरचे दागिने चोरले ! लोकांनी तिला देवापुढून ओढून बाहेर काढले.

चंद्रभागेच्या तीरावर तिच्या फाशीचा सूळ ठोकण्यात आला होता. तिथे जनाला फरफटत नेण्यात आलं.

जनाबाई स्तब्ध उभी राहिली. पुढे काय काय होत आहे हे मन घट्ट करून बघत राहिली.

पण देव काही झोपले नव्हते. ते तियेच होते, तिच्या पाठीशी उभे होते.

इतक्यात मोठा चमत्कार घडला. सगळे वातावरण अबीर-बुक्क्याच्या सुगंधाने भारून गेले. इतका घमघमाट सुटला की, लोक आश्चर्याने इकडे तिकडे बघू लागले आणि कमालीचे आश्चर्य म्हणजे समोरचा लोखंडाचा सूळ वितळू लागला ! तेथे अबीर—बुक्का सांडलेला होता.

लोक अगदी थक्क होऊन गेले. भांबावून गेले. जनाबाईकडे बघत राहिले. जनाबाई मात्र इतका वेळ डोळे घट्ट मिटून बसली होती. मनात मात्र ध्यान पांडुरंगाचे.

जमलेल्या समुदायाने जनाईचा जयजयकार केला. यामुळे ती इतकी गुदमरून गेली की, ती काही काळ बेशुद्ध पडली. नामदेवाने तिला कशी तरी घरी आणली. तिची पुण्याई, तिची भक्ती परमोच्च कोटीची होती याबद्दल लोकांची खात्री पटली.

या सर्व घटनेने जनाबाई अगदी थकून गेली. कष्टी झाली; फार बोलवेना. पण ‘ पांडुरंग माझा, मी पांडुरंगाची ’ याची तिला मनोमन खात्री पटली.

पांडुरंग या पोरीला फार जपत होते. त्याचे बारकाव्याने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हिच्याकडे आणि हिच्या कामाकडे लक्ष होते. हिने केर काढला की, जमलेल्या केराचा ढीग व्हायचा, धुणी धुतली की ती पिळून निघायची, इतकेच काय पण 'हाती घेऊन तेल—फणी केस विचरूनी घाली वेणी.'

'इतके तुम्ही जनाईचे करता तेव्हा' रुक्मिणीने विचारले, 'ही कोण तुमची ?'

पांडुरंग उत्तरले, 'अगदी पंढरीची माहेरवाशीण ! निराधार पण गोड पोरगी, माझ्या आश्रयाला आलेली.'

४. जनाबाईचे लेखक पांडुरंग !

जनाबाईचा पाठीराखा पांडुरंगच. सगळी कामे उरकून एकटी बसली असता पांडुरंगाचे चिंतन करता करता तिला स्फुरण येई. अंतःकरणातील परमेश्वराच्या स्तवनाचे उमाळे बाहेर पडत. ते काव्यरूपात शब्दांकित होत. हृदयातील विचारांचे कल्लोळ ओठातून बाहेर पडत.

कल्लोळाचे विषय विविध — नाममाहात्म्य, विठ्ठलमहिमा, भक्तिस्वरूप, आत्मस्वरूप निश्चिती, संतस्तुती, परमार्थजीवन, हितोपदेश इ. भावनांच्या पद्यरूपातील आविष्कार इतका गोड, इतका आकर्षक, भावमधुर की प्रत्यक्ष पांडुरंगाला त्यांनी मोहिनी घातली आणि म्हणून प्रत्यक्ष पांडुरंगांनी तिच्या हृदयातील खळबळीचे आविष्कार टिपण्याकरिता हातात लेखणी घेतली !

पांडुरंगाच्या दर्शनाला संत ज्ञानेश्वर आले असता पांडुरंगाच्या हातात लेखणी पाहून ते आश्चर्यचकित झाले. ते म्हणाले, 'परमेश्वराचे पद्यमय स्तवन आम्ही रचावयाचे, आम्ही गावयाचे, यातच आमच्या जीविताची सार्थकता. तुम्ही हे काय लिहीत आहात ?'

पांडुरंग म्हणाले, 'जनीच्या अभंगांची गोडी अवीट आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यातील आशय मोठा आहे. त्यांत भावमधुरता, आर्तता आहे. अर्थगांभीर्य आहे......म्हणून मला ते टिपावेसे वाटले.'

या अभिप्रायाने ज्ञानेश्वर आनंदित झाले आणि नामदेवाकडे धावले. ' नामदेवा, आज मी एक नवल पाहिले. जनाबाईचे अभंग प्रत्यक्ष पांडुरंग लिहीत आहेत,' ही गोष्ट मी प्रत्यक्ष पाहिली.

जनाबाईकडे पाहून ते म्हणाले, 'जना, तू खरोखर धन्य आहेस, किती थोर तुझे भाग्य ! प्रत्यक्ष पांडुरंग तुझे अभंग लिहीतआहेत!'

जनाबाईला खूप आनंद झाला, जीविताची सफलता झाली असे तिला वाटले. हाच परमोच्च भाग्याचा क्षण !

एका शूद्र कुळात जन्मलेली, अल्पवयात माता–पित्यांच्या सुखाला आंचवलेली, विशेष कर्तृत्वाने कुळाचा उद्धार करणारी ही तेजस्वी ज्योत पांडुरंगाच्या शीतल ज्योतीत विलीन झाली.

काही अभंग पाहा –

(१) विठो माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा ।।
निवृत्ती हा खांद्यावरी । सोपानाचा हात धरी ।।
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर ।।
गोरा कुंभार मांडियेवरी । चोखा जीवा बरोबरी ।।
बंका कडियेवरी । नामा करांगुळी धरी ।।
जनी म्हणे गोपाळा । करी भक्तांचा सोहळा ।।

(२) माय मेली बाप मेला । आता सांभाळी विठ्ठला ।।
मी तुझे गा लेकरू । नको मजशी अव्हेरू ।।

(३) येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ।।
भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणीच्या गंगा ।।

'मराठी साहित्यात संत जनाबाईंच्या इतक्या लोकप्रिय कवयित्री दुसऱ्या कोणी झाल्या नाहीत.' □ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मडक्यांची परीक्षा घेणारे

श्री संत गोराकुंभार

(त्रोटक जीवनवृत्तात -- हे महान् भगवद्भक्त तेरढोकी या गावचे. हा गाव पंढरपुरापासून २५-३० कोसांवर आहे. आपला कामधंदा सांभाळून पांडुरंगाचे नामस्मरण करावयाचे हा त्यांचा नित्यक्रम. हे ज्ञानदेव. नामदेव यांचे समकालीन. यांच्या पहिल्या बायकोचे नांव संती व संतान प्राप्तीसाठी दुसरे लग्न केले तिचे नाव रामी. काही कारणांनी दोन्ही स्त्रिया असंतुष्टच. गोरोबाला या गोष्टीचे वाईट वाटले. आषाढी एकादशीला गोरोबा दोन्ही बायकांसह पंढरपूरला आले आणि त्यांनी विठ्ठलाला आपली मन:स्थिती सांगितली. रुक्मिणीने सर्व हकीकत ऐकून गोरोबाला दोन्ही स्त्रियांचा अंगिकार करून सुखाने संसार करण्याची आज्ञा केली. उस्मानाबाद जिल्ह्यातील तेरढोकी या गावी गोरोबांची समाधी आहे. त्यांचा मृत्युशक उपलब्ध नाही, पण जन्मशक ११८९.)

१. गोरोबावर नामदेव चरफडले

ज्ञानेश्वर-नामदेव इ. संतांचा गोराकुंभार समकालीन. त्याला एकदा वाटले की आपल्या संत मंडळींना आपल्या घरी बोलवावे. म्हणून त्याने प्रत्येक संताकडे जाऊन आग्रहपूर्वक आपल्या घरी पायधूळ झाडण्याची विनंती केली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गोरोबाच्या विनंतीस मान देऊन बहुतेक सर्व साधुसंत त्यांच्या घरी जमले. गोरोबाला खूप आनंद झाला. 'साधुसंत येती घरा। तोचि दिवाळी दसरा।' त्याने सर्वांची षोडशोपचारे पूजा केली, त्यांना पंचपक्वान्नांचे जेवण दिले. भोजनोत्तर सर्व मंडळी गप्पा-गोष्टी करीत बसली. त्यात आत्मज्ञान; गुरुपरंपरा; साक्षात्कार इ. विषयांवर चर्चा सुरू झाली. या मंडळीत निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सावतामाळी, नामदेव हे प्रमुख संत होते. गोरोबा सर्वांपेक्षा वयाने अधिक, म्हणून वडिलकीचा मान त्यांचेकडे जातो. सर्व त्यांना गोरोबाकाका असेच संबोधित. ज्ञानदेवांच्या मनात काय आले कोणास ठाऊक? ते गोरोबाला म्हणाले, 'गोरोबाकाका, ही सर्व मंडळी म्हणजे तुमच्या दृष्टीने एकेक घटच. यांत पक्के घट कोणते व कच्चे घट कोणते याची नीट परीक्षा करवून तुमचा निर्णय द्या. आम्हाला तो मान्य.' ज्ञानदेवांच्या या आज्ञेचा गर्भितार्थ चोखोबाने तात्काळ जाणला. गोरोबाने मडके कच्चे की पक्के हे बघण्याचे साधन जे थापटणे ते हातात घेतले आणि हे तर आमचे रोजचे काम, म्हणून हासत हासत कामाला सुरुवात केली. प्रथम त्याने निवृत्तिनाथांचे डोके घेतले. त्यावर त्याने थापटण्याने आवाज केला. नुसत्या आवाजावरून त्याला अंदाज येऊ लागला. नंतर ज्ञानदेवांच्या डोक्यावर थापटणे मारले. ही दोन्ही मडकी पक्की दिसतात असा आपला निर्णय दिला. नंतर नामदेवाजवळ गेले. त्याच्या डोक्यावर थापटणे मारणार तोच नामदेव गरजले, 'काका, हा काय उद्योग चालविला आहे? लोकांना घरी बोलावून त्यांची डोकी फोडावी, हा कोणत्या गावचा आदर-सत्कार?' मुक्ताबाई जरा फटकळ तोंडाची. ती म्हणाली, 'काका, तुमची परीक्षा बरोबर आहे. मडक्यांना जसे भाजतात तसे या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घटाला तयार केले पाहिजे. यांनी अजून गुरूपदेश घेतला नाही. 'अखंड जगाला देवाचा शेजार। त्याचा अहंकार का नाही गेला ।।' अहंकार गेल्याशिवाय ज्ञान नाही.' मुक्ताबाईचे हे सडेतोड बोलणे ऐकून संत मंडळी चकित झाली.

२. स्वतःचे मूल तुडविले

गोरोबा आपला व्यवसाय नेकीने करीत असे. केवळ पैसा मिळविणे हे त्याचे ध्येय कधीच नव्हते. कुटुंब पोषणापुरता पैसा मिळाला की तो अत्यंत समाधानी असे. परमेश्वराची मनोभावे उपासना करून नामसंकीर्तनात तो एकचित्त असे.

'.अहो येता जाता उठत बसता कार्य करिता ।
सदा देता घेता वदनि वदता ग्रास गिळिता ।।
घरीदारी शय्येवर रति सुखाचे अवसरी ।
समस्तांची लज्जा त्यजुनि भगवच्चिंतन करी ।।

असे गोरोबांचे वर्तन असे.

कामधंदा करीत असतानाही मुखाने पांडुरंगाचे नामस्मरण हा त्याचा नित्याचा क्रम. मडक्यांना लागणाऱ्या ओल्या मातीत पाणी घालून त्याने चिखल बनविला. त्याचा एकजीव करण्या-करिता त्याने तो पायांनी तुडविण्यास सुरुवात केली. तोंडाने तल्लीन होऊन अभंगाचे गायन सुरू झाले.

इकडे त्याची बायको संती छोटया बाळाला तेथे ठेवून पाणी आणण्याकरिता निघाली, गोरोबाला बाळाकडे लक्ष ठेवण्यास सांगितले. आई निघून गेल्यावर बाळ खेळता खेळता गोरोबाच्या चिखलाशी आले आणि त्यातच ते शिरले, गोरोबा माती

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुडविण्याच्या कामात अगदी मग्न होऊन अभंगांच्या ओळी

तितक्याच तन्मयतेने तो उच्चारू लागला. ब्रह्मानंदी टाळी लागलेल्या गोरोबाला मुलाचेध्यान कुठले ?' त्याने ते मातीबरोबर तुडविले ! ! मातीचा सगळा चिखल रक्ताने लाल होऊन गेला ! संती येऊन पाहाते तो मूल कोठेच दिसेना. मग तिचे लक्ष लाल झालेल्या चिखलाकडे गेले. ती मनात उमजली आणि तिने हंबरडाच फोडला. किंचाळून ती ओरडली, 'मूल मारलेत, जळो तुमचे ते भजन' तिने आक्रांत केला.

भजनात विक्षेप आणला, पांडुरंगाचे आनंदमय स्थितीतील दर्शन दुरावले म्हणून ते संतीवर संतापले आणि तिला मारण्याकरिता ते पुढे सरसावले. पुत्रवियोगाने दुःखी झालेली संती ओरडली, 'थांबा, माझ्या अंगाला हात लावाल तर तुम्हाला विठोबाची शपथ आहे.'

विठोबाची शपथ घातल्यावर गोरोबा जरा थंडावले आणि एकंदर परिस्थिती पाहून तेही गहिवरले. त्यांच्या डोळ्यांत पाणी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तरारले. ‘ विठ्ठला, काय झाले हे ?’ म्हणून तेही आक्रोश करू लागले. पण विवेक करून मनाची समजूत घालण्याकरिता ते म्हणाले, ‘यातहीं पांडुरंगाचा काहीं हेतू असेल! ’ धन्य ते गोरोबा ! ’

३. हात तोडले पण पुन्हा फुटले !!

पुत्र-विरहाच्या दु:खाने होरपळलेली संती नित्याचे कार्यक्रम करू लागली. पण संसारात लक्ष लागेना. यंत्रवत जीवन झाले तिचे. त्यात भर म्हणून गोरोबाचे मौन ! आणखी त्यात भर म्हणजे संतीने घातलेली विठोबाचीं शपथ. गोरोबा संतीच्या अंगाला स्पर्श करण्याचेही टाळींत. संती कष्टी झाली. संसारात मन रमेना, रमणे शक्यहीं नव्हते. म्हणून ती काही दिवस वडिलां-कडे रहावयास गेली. वडील थकलेले, शिवाय दुसरी मुलगी रामी हिच्या लग्नाची काळजी.

संतीने विचार केला की आपण आता केवळ नावाची वायको. वंशाच्या दिव्याचे काय ? हाहीं प्रश्न तिने सोडवला. ती वडिलांना म्हणाली, ‘ रामी मोठी झाली आहे. तिचे लग्न ह्यांच्याशीच करावे. तुमची काळजी फिटेल आणि वंशाचा प्रश्नही सुटेल.’

मुलीच्या या विचाराचा वडिलांना अचंबा वाटला. तरी पण यातून मार्ग काढला पाहिजे म्हणून त्यांनी गोरोबाला आपल्या घरी बोलावून घेतले. त्याला चार समजुतीच्या गोष्टी सांगितल्या.

गोरोबानेही विचार केला. संतीला सुख देण्याच्या दृष्टीने हा मार्ग वाईट नाही. आपल्याला घातलेल्या शपथेचे पालन होईल आणि वंशाचा प्रश्नही सुटेल. विठ्ठलाची तशीच इच्छा असेल असे समजून त्याने लग्नाला होकार दिला. रामी गोरोबाची बायको झाली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुलीच्या वडिलांनीं गोरोबाला निरोप देताना सांगितले, 'जावईबापू, तुम्ही देवमाणूस आहात, तुम्हाला मी काय शिकविणार? दोघींना प्रेमाने वागवा, विठ्ठलाची आण समजून दोघींकडे सारखेपणाने पाहा.'

सर्व मंडळी तेरढोकीला परतली. नित्याचे व्यवहार सुरू झाले. गोरोबा आपल्या भजनात दंग.

काही दिवस गेल्यानंतर संतीला रामी जरा कष्टी असल्यासारखी वाटली. गोरोबाने दोघींना सारखेपणाने वागविले ! यातून मार्ग काढण्याकरिता दोघींनी काहीतरी विचार केला.

रात्री शांतपणे गोरोबा झोपी गेल्यावर दोघीही त्याच्या शेजारी जाऊन निजल्या. मोठ्या धीराने दोघींनी गोरोबाचे हात आपापल्या उरावर ठेविले ! गोरोबा जागे झाले. त्यांनी हात बाजूला केले आणि खिन्न मनाने विचार करू लागले. आपल्या हातांनी हे पाप केले, आपली शपथ मोडली गेली ! वैतागून त्यांनी लाकडे तोडण्याचा कोयता जवळ केला आणि धारेच्या बाजूवर हात ठेवून कचाकच दोन्ही हात तोडून घेतले ! ! !

गोरोबाने किंकाळी मारली. दोन्ही बायका बाहेर येताच हे दृश्य पाहून त्या बेशुद्ध झाल्या. लोक जमा झाले. त्यांनी सर्व उपचार केले.

आणि आता पुढे काय? गोरोबा शांत होऊन म्हणाला, 'आपण आता पंढरीला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेऊ. तोच तारणारा आणि तोच मारणारा' तिघेही पंढरपूरला गेले आणि त्यांनी विठ्ठलापुढे लोटांगण घातले. 'विठ्ठला विठ्ठला' अशी गर्जना केली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शेजारी पारावर नामदेवाचे कीर्तन सुरू होते. तेथे ही मंडळी गेली. कीर्तनात रंगून गेली. काही क्षण ते आपले दु:ख विसरले.

कीर्तनात विठ्ठलाच्या नावाचा गजर होई. लोक टाळ्या वाजवीत. गोरोबाही बेभान होऊन टाळी वाजविण्याकरिता आपले थोटे हात वर करी. टाळी कशी वाजणार ? मन थोडे खट्टू होई, पण विठ्ठल त्याच्या पाठीशी उभा होता. गोरोबाची केविलवाणी स्थिती पाहून उंचावलेल्या थोटच्या हातांना पूर्ण हात फुटले ! ! गोरोबाचा आनंद गगनात मावेना ! त्याने जोरजोराने टाळ्या वाजविल्या. हात पूर्ववत झाल्याची खात्री करून घेतली.

सर्वांना या चमत्काराने स्तिमित करून सोडले. जमलेले सगळे लोक आनंदाने नाचू लागले. विठ्ठलाच्या नावाचा गजर सुरू झाला. या गजराने 'अवघी दुमदुमली पंढरी.'

गोरोबाची भक्ती फळाला आली. त्याचा अधिकार लोकांना समजला. ज्ञानदेव, नामदेव तेथे होतेच. त्यांनी प्रेमभराने गोरोबाला अलिंगन दिले. गोरोबाच्या जन्माचे सार्थक झाले.

संतीला उपरती झाली, आपले अपराध पोटात घालण्याबद्दल तिने विठ्ठलाची कळवळून प्रार्थना केली. रुक्मिणीला संतीची दया आली आणि आश्चर्याचा दुसरा धक्का म्हणजे तिचे बाळ तिच्याकडे धावत आले ! तिने विठ्ठल-रखुमाईला साष्टांग नमस्कार घातला.

□ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अहंकार झडण्याचा प्रत्यय घेणारे

श्री संत चांगदेव

(त्रोटक जीवनवृत्तांत – यांच्यासंबंधी सुसंबद्ध अशी माहिती मिळत नाही. योगसामर्थ्याच्या जोरावर हे चौदाशे वर्षे जगले! प्रथम योगमार्गी असून नंतर ते भक्तिमार्गात शिरले. वटेश्वर हे यांचे गुरु. यावरून यांना चांगावटेश्वर असे म्हणत. यांचे ग्रंथ फारसे उपलब्ध नाहीत. 'योगेंद्रचिंतामणी' हा त्यांचा संस्कृतमधील ग्रंथ आहे असे म्हणतात. मराठीत 'उत्तरपंचविशी' एक आरती व पांच–पंचवीस अभंग एवढीच त्यांची वाङ्मयीन कृती. यांची गोदावरीच्या तीरी पुणतांबे येथे समाधी आहे. समाधीचा काल शके १२२७. यांनी ज्ञानेश्वर, मुक्ताबाई यांच्याबरोबर काही काळ काढलेला आहे.)

१. चौदाशे वर्षांपर्यंत कसे जगले?

हे अत्यंत हठयोगी. असे सांगतात की, दर शंभर वर्षांनी योग सामर्थ्याच्या जोरावर समाधिस्थ होऊन मृत्युकाळ टाळीत! आणि जुना देह टाकून नवा देह धारण करीत! म्हणून १४०० वर्षे जगले. एदलाबादजवळ चांगदेव या नावाचे एक गाव आहे तेथे यांचा जन्म झाला. यांची चौदा समाधीस्थळे आहेत! आणि नामान्तर केलेली चौदा नावे आहेत. त्यांपैकी चांगा वटेश्वर, चांगा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

केशवदास, चांगा मरुद्‌गुण ही होत. मरुद्‌गुण हे आडनाव असून प्रचलित आहे. तसेच चक्रपाणी हेही त्यांचे नाव आढळते. इतकी वर्षे जगणारा संत किंवा साधू ज्ञात नाही. निवृत्तिनाथ व मुक्ताबाई यांच्या अभंगांत चांगदेवाचा उल्लेख अनेक ठिकाणी आला आहे. कवी म्हणून यांची फारशी प्रसिद्धी नाही.

२. पत्र म्हणजे कोरा कागदच !

चांगदेव त्रिकालदर्शी असून त्यांनी अनेक आश्चर्यकारक चमत्कार घडवून आणले. तसेच पशु, पक्षी सर्प इ० प्राण्यांना ते वश करू शकतात अशी त्यांची कीर्ती चहूकडें पसरली. अशा साधूची भेट होऊन त्यांचे दर्शन घडावे ही उत्कंठा लागून राही. त्यामुळे त्यांचा शिष्यगण वाढत गेला.

एकदा पैठणचा एक कुटुंबवत्सल ब्राह्मण कौटुंबिक परिस्थितीने गांजलेला, चांगदेवाच्या दर्शनाला आला. या साधूच्या दर्शनाने आणि त्याच्या मार्गदर्शनाने आपण दुःखमुक्त होऊ ही त्याची मनातील इच्छा.

बोलता बोलता त्या ब्राह्मणाने पैठणचा उल्लेख केला.

'पैठण हे तर प्रसिद्ध क्षेत्र आहे.'

'होय महाराज, पैठण हे विद्येचे माहेरघर असून तेथे कित्येक ज्ञानी पुरुषांची वस्ती आहे. ब्रह्मवृंदांच्या सभेत न्यायनिवाडे येथे होत असतात. यांचे निर्णय सर्वत्र मानलें जातात, पण चमत्कार असा की, ज्ञानेश्वराने आपल्या दैनिक सामर्थ्याच्या जोरावर येथील महापंडितांना आपली माथी नम्र करावयास लावले.'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'कोण हा ज्ञानेश्वर ?' अशी पृच्छा चांगदेवाने केली.

यावर त्या ब्राह्मणाने ज्ञानेश्वरांचे अलौकिकत्व, त्याने केलेल्या चमत्काराचे रसभरित वर्णन केले.

त्रिकालज्ञानी चांगदेवाला 'हा निश्चित विष्णूंचा अवतार' अशी खूण पटली.

'सध्या ज्ञानेश्वर कुठे आहे ?'

'ज्ञानेश्वर सध्या आळंदीला आहे.'

हे ऐकल्यावर त्याला भेटण्याची उत्कंठा चांगदेवाला लागली. त्याने लगेच आपल्या शिष्यांना लेखनसाहित्य आणण्याचो आज्ञा केली. पूर्वसूचना म्हणून अगोदर एक पत्र लिहावे असे चांगदेवाने ठरविले.

शिष्य लिहिण्याच्या तयारीत बसला. पण गुरुजी अजून मजकूर सांगेनात. चांगदेव मायना कसा लिहावा या विचारात पडले.

आपल्यापेक्षा वयाने लहान म्हणून 'चिरंजीव' अशी सुरुवात करावी. पण, छे. वयाने लहान असला तरी तो मोठा योगी, ज्ञानी असा महापुरुष आहे, तेव्हा तो मायना बरोबर होणार नाही. चांगदेवांना काही सुचेना. शिष्य त्यांच्या तोंडाकडे मजकुराकरिता पाहात बसले.

नंतर त्यांनी शिष्यांना आज्ञा केली. 'कागदाची घडी घाला आणि हे पत्र (म्हणजे कोराच कागद) आळंदीस घेऊन जा आणि ज्ञानेश्वरांना द्या. त्यांच्या संबंधी अधिक माहिती मिळवून ठेवा.'

३. वाघावर बसून आळंदीस निघाले !

चांगदेवाचे 'पत्र' घेऊन ते शिष्य आळंदीस जाण्यास निघाले. आपल्या गुरूच्या योगसामर्थ्यामुळे लांबचा प्रवास जवळचा झाला !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कसा झाला हे त्यांनाही समजेना. त्यांच्या सिद्धीचा प्रताप, धन्य त्यांची सिद्धी.

आळंदीस पोहोचल्यावर त्या शिष्यांनी इंद्रायणीवर स्नान करून ते ज्ञानेश्वरांच्या पर्णकुटीकडे निघाले.

ज्ञानेश्वरादि भावंडे पर्णकुटीच्या बाहेर आपापसांत काही चर्चा व विचार-विनिमय करीत होती. इतक्यात पर्णकुटीजवळ पोहोचलेल्या त्या शिष्यांनी ज्ञानेश्वरादि भावंडांचे तेज पाहून त्यांना नम्रतापूर्वक दंडवत घातले आणि तसेच उभे राहिले.

' आपण चांगावटेश्वराकडून आलात ना ? त्यांनी दिलेले पत्र कुठे आहे ?' अशी पृच्छा ज्ञानेश्वराने केली.

ही गोष्ट ज्ञानेश्वरांना कशी समजली, आपण तर अजून काहीच बोललो नाही. शिष्य मनात चमकले आणि त्यांना आश्चर्य वाटले. त्यांनी ज्ञानेश्वरांना नम्रतापूर्वक अभिवादन करून आणलेलें पत्र त्यांना दिले.

पत्र म्हणजे एक कोरा कागदच !

या कोऱ्या पत्राचा उलगडा निवृत्तिनाथांनी केला. चांगदेवांनी आपल्या तपश्चर्येच्या सामर्थ्यावर अनेक सिद्धी प्राप्त करून घेतल्या ही गोष्ट खरी, पण आत्मज्ञानाची प्राप्ति अजून त्याना झालेली नाही.'

इतक्यात, मुक्ताबाई फटकळपणे बोलली, ' चौदाशे वर्षे तपश्चर्या करून हे कोरेच ?'

निवृत्तिनाथ ज्ञानेश्वराकडे वळून म्हणाले, ' अहंकार हा आत्मज्ञानाला बाधक असतो. त्यांना अजून आत्मज्ञानाचे महत्त्व समजले नाही. स्वतःच्या मोठेपणामुळे पत्राचा मायना कसा लिहावा हे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याना नीट उमजले नाही, म्हणून हे पत्र कोरे ! या कोऱ्या पत्रा-वरून त्यांचे धोरण लक्षात घे आणि त्यांना जरा सविस्तर उत्तर लिहून दे.'

ज्ञानेश्वरांनी आपल्या गुरूकडे दृष्टिक्षेप करून चांगदेवांच्या पत्राचे उत्तर तयार करून त्या शिष्यांजवळ दिले आणि त्याना निरोप दिला.

हे उत्तर म्हणजे चांगदेवांना केलेला उपदेश आहे. त्यात पासष्ट ओव्या आहेत, म्हणून याला 'चागदेव पासष्टी' म्हणतात.

हे शिष्य परत निघाले आणि जणू काही वायुवेगाने ते तापी-तीरावर आले. या शिष्यांना ज्ञानेश्वरांच्या सामर्थ्याचा प्रत्यय आला.

चांगदेव पत्राचे उत्तर वाचीत असता त्यांच्या मनात गलबला सुरू झाला. अनेक विचारचक्रे फिरू लागली. लागलीच त्यांनी ज्ञानेश्वरांची भेट घेण्याचे ठरविले. सर्व शिष्यांना प्रयाणाची तयारी करण्यास सुचविले.

चांगदेव स्वतः दारी उभा असलेल्या वाघावर आरूढ झाले ! हातात सर्पाचा चाबूक घेतला ! आणि सर्वांना चलण्याचा इशारा दिला. चांगदेव स्वतः सिद्ध पुरुष असल्याने ते सर्व लवाजम्यासह अंतराळातून पुढे सरकू लागले ! थोड्याच अवधीत ही सर्व मंडळी आळंदीच्या परिसरात पोहोचली.

चांगदेवाने चहूकडे दृष्टी फेकली आणि ते भूतलावर उतरले ! सर्व शिष्यांनी चांगदेवांचा जयजयकार केला. शंखनाद झाले आणि तेथेच सगळे स्थिर झाले. आपल्या वैभवाचे आणि सामर्थ्याचे दर्शन घडवावे असाही त्यांच्या मनात विचार आला असावा.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

इकडे ज्ञानेश्वरादि भावंडे भिंतीवर बसून समोरचे दृश्य पाहात होती. इतक्यात निवृत्तिनाथांनी 'एवढा मोठा तपस्वी आपल्याकडे

येत आहे, त्याचे यथोचित स्वागत झाले पाहिजे, त्यांना सामोरे गेले पाहिजे' असे म्हणून त्यांनी ज्ञानेश्वरांना पुढे चलण्याची सूचना केली. भिंतीवर बसलेली ही भावंडे भिंतीसह पुढे सरकू लागली !

एका शिष्याने आपल्या गुरूचे लक्ष पुढे पुढे सरकत येणाऱ्या भिंतीकडे वेधले. चांगदेव दिङ्मूढ झाले. ज्ञानदेवाच्या विलक्षण सामर्थ्याचा त्यांना प्रत्यय आला. ते मनात म्हणाले, 'मी सिद्धीच्या जोरावर व्याघ्रादि क्रूर प्राण्यांना अंकित केले, अंतराळातून प्रवास केला, सर्पाचा चाबूक केला, जीवसृष्टीवर प्रभुत्व मिळविले. पण ज्ञानेश्वर ? अचेतन अशा भिंतीवर त्यांनी प्रभुत्व दाखविले ! 'धन्य, धन्य' म्हणून चांगदेवांनी ज्ञानेश्वरांपुढे साष्टांग नमस्कार घातला. मनातला सारा अहंकार झडून गेला. निवृत्तिनाथांनी चांगदेवाला दोन गोष्टी सांगितल्या आणि पुढील मार्गदर्शनाची जबाबदारी मुक्ताबाईवर सोपविली.

मुक्ताबाई चांगदेवाची गुरु झाली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

महार असून संतपदी

श्री संत चोखोबा

(त्रोटक जीवनवृत्तांत – चोखोबा हा मंगळवेढयाचा, जातीने महार असल्याने प्रत्येक ठिकाणी त्याचा उपहास होई. पण विठ्ठलावर त्याची गाढ श्रद्धा होती. तो मनाने पवित्र आणि देहाने शुद्ध होता. त्याची बायको सोयराबाई, ही विठ्ठलाची उपासना करी. बायकोही त्याच्याच विचाराची असल्यामुळे मंगळवेढयास तो काही दिवस राही. ओढ मात्र पंढरपूराची. देवळात जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेण्याची. सामाजिकदृष्टया परवानगी नसल्याने तो मनाने कष्टी राही. अशा तळमळीच्या भक्तांचा विठ्ठलाला कसा विसर पडेल ? विठ्ठल त्याच्या पाठीशी उभा होता. मरणोत्तर त्याच्या अस्थी नामदेवाने पंढरपूरला नेल्या आणि महाद्वारापाशी एक खड्डा खणून त्यात त्या पुरण्यात आल्या.)

१. आम्ही उष्टया पानांचे मानकरी !

प्रत्यक्ष विठ्ठलाचे दर्शन मिळण्याची आशा नसल्याने चोखोबा 'उष्टयावर' च समाधानी राही. उष्टया पत्रावळीतील अन्न मिळविण्यात खालच्या जमातीत आनंद मानीत. तसे भाग्यवान भक्तांच्या तोंडातून बाहेर पडणारे विठ्ठलाचे गुणवर्णनपर शब्द ऐकावयाचे आणि या वर्णनपर शब्दांच्या उष्टयातून 'उच्छिष्ट

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शीते' घ्यावयाची आणि त्यात आनंद मानावयाचा. भजन असो, नामसंकीर्तन असो, रस्त्याच्या कडेला बसून ऐकावयाचे.

'पंगतीचे शेष उच्छिष्ट प्रसाद' काही सज्जन भक्त आस्थेने चोखोबाची चौकशी करीत, विचारपूस करीत. त्यांच्या सर्व प्रश्नांना चोखोबा विनयशील उत्तर देत.

'जोहार मायबाप जोहार। तुमच्या महाराचा मी महार।
बहु भुकेला जाहलो। तुमच्या उष्टयासाठी आलो ॥'

२. महार चोखोबा देवाच्या गाभाऱ्यात

चोखोबा देवळाच्या महाद्वारासमोर नेहमी बसत असे. पण देवाजवळ जाऊन त्याचे दर्शन घ्यावे ही त्याची उत्कंठा. ही त्याची उत्कंठा इतकी वाढली की, तो आपल्या जागेवरून उठून पुढे सरकू लागला. इतक्यात एका पुजाऱ्याने चोखोबाला हटकले 'कुठे चाललास ?' असे दरडावून विचारले आणि त्याच्या अंगावर धावून गेला. बिचारा चोखोबा घाबरला आणि चार पावले मागे सरकला. देवाला नैवेद्य घेऊन येणारा पुजारीही लांबून ओरडला, 'समजत नाही का तुला ? या नैवेद्यावर तुझी सावली पडली तर नैवेद्य विटाळणार नाही का ? विटाळलेला नैवेद्य देवाला दाखवायचा ? हो बाजूला.' पहिल्या पुजाऱ्याने त्याला गचांडी मारून दूर फेकला. गरीब चोखोबा रस्त्याच्या कडेला जाऊन पडला. मार जोराचा आणि वर्मी लागल्याने तेथेच तो निपचित पडला ! विव्हळत होता, पण तोंडातून 'विठ्ठल' अशी अस्पष्ट अक्षरे बाहेर पडत होती. हालचाल करता येत नव्हती म्हणून रात्रीही तो तेथेच पडून राहिला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पण मध्यरात्री 'चोखोबा ऊठ ना' अशी कोणीतरी साद घातल्याचा त्याला भास झाला. पुन्हा एकदा 'अरे, तुला विठ्ठलाचे दर्शन घ्यावयाचे आहे ना? चल माझ्याबरोबर, मी तुला आत घेऊन जातो.' दिव्य स्पर्शाने चोखोबा गांगरून गेला आणि अत्यानंदाने देवाचे स्मरण करून देवाबरोबरच गाभाऱ्यात पोहोचला.

मनोमन साक्ष पटली. देवांनी त्याला आपल्या जवळ बसविले. 'झाली तुझी इच्छा पूर्ण? पण आपल्याला फार वेळ बसता येणार नाही. काकड-आरतीच्या वेळेपूर्वी तुला बाहेर गेले पाहिजे.' चोखोबाने दोन्ही हात जोडून देवाच्या पायावर अश्रूंचा अभिषेक केला! स्वत:ला धन्य मानले, जीविताची सफलता झाली, 'देवा, कसा मी उतराई होऊ? केवढे विशाल तुझे अंत:करण! एका महाराला दिव्य दर्शन दिलेस. धन्य धन्य मी!' जाताना चोखोबाला देवांनी आपल्या गळ्यातील रत्नहार, बुक्का, तुळशी प्रसाद म्हणून दिला! मोठ्याने उच्चारलेले शब्द ऐकताच बाहेर झोपलेला गुरव जागा झाला आणि त्याने गाभाऱ्यात दृष्टिक्षेप केला, पण डोळ्यावर त्याचा विश्वासच बसेना. बाहेर बसणारा महार आणि देव जवळ जवळ! काय आश्चर्य हे! 'देवाला तू बाटविलेस, निर्लज्जा' अशी दूषणे गुरव व पुजारी देत राहिले. चोखोबा मात्र शांत! परत फिरताना तो एवढेच म्हणाला,

'कोण तो सांवळा कोण तो ओवळा।
दुहीच्या आगळा विठू माझा॥

दुसरे दिवशी देवाच्या गळ्यातील रत्नहार चोरीस गेल्याचे आढळले. अर्थात् चोखोबाने तो चोरला असे जाणून बडव्यांनी त्याला यथेच्छ मारहाण केली. चोखोबा बिचारा काय करणार? त्याने देवाचा धावा सुरू केला.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

‘घाव घाली विठू आता चालू नको मंद ॥
बडवे मज मारिती ऐसा काय तरी अपराध ॥

३. विठोबा महाराचे घरी जेवले !

पंढरपूरहून निघून चोखोबा आपल्या गावी मंगळवेढ्यास परतले. इथे त्यांना चैन पडेना. ओढ होती पंढरीची. चंद्रभागेच्या तीरावर दूरच्या भागात त्याने झोपडी उभारली आणि तेथे तो राहू लागला. आपली कर्तव्यकर्मे करीत विठोबाच्या चिंतनात, भजनात कालक्रमणा करी.

चोखोबाची बायको सोयरा हिला उपरती होऊन तीही आपली नवऱ्याबरोबर विठ्ठलाची भक्ती करू लागली. मनोभावे, निष्ठापूर्वक देवाचे नाव घेण्यात, नामसंकीर्तन करण्यात ती मग्न होऊन जाई. पण विठ्ठल तिला दिसेना. आपल्या नवऱ्याला तो दिसतो, त्याच्याशी बोलतो. तेव्हा तिच्या मनात विचार आला आणि ती म्हणाली, ‘धनी, आपल्या घरी तुमच्या पांडुरंगाला घेऊन या को.’

‘अगं, हो. पण तो आल्यावर त्याला आपण काय देणार ?’

ती उद्गारली, ‘असं का बोलता ? देवाचे प्रेम तुमच्यावर आहे, आपण वाढू ते तो आनंदाने खाईल. सुदाम्याच्या कण्या देवाने आवडीने नाही का खाल्लया ?’ तिनेही देवाला बोलवण्याचा हट्टच धरला. अत्यंत तळमळीने, काकुळतीला येऊन देवाची आळवणी सुरू केली.

‘येई येई गरुडध्वजा। विटेसहित करीन पूजा ॥
पुढं ठेवोनिया ताट। वाढी कुटुंबी ते अन्न ॥
तुम्हा योग्य नव्हे देवा। गोड करूनिया जेवा ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दोघांच्या मनातील तळमळ पाहून चोखोबाला एके रात्री दर्शन देऊन पांडुरंगाने 'उद्या येतो जेवायला' असे आश्वासिले.

सोयरा अतिशय उत्साहित झाली. महाराच्या घरी पांडुरंग जेवायला येणार म्हणून तिचा आनंद गगनात मावेना. ही वार्ता कर्णोपकर्णी पसरली. लोकांचा या वार्तेवर विश्वासच बसेना आणि सहाजीकच गोष्ट आहे. पांडुरंग कुठला येथे यायला ? तर्क–कुतर्क चालू होते, पण काही लोकांना औत्सुक्य वाटत होते. एक–दोन लोक चोखोबाच्या झोपडीकडे दबत दबत येत होते. शेवटी त्यांनी खिडकीतून आत पाहिले. त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. चोखोबाच्या अंधाऱ्या खोपटात पुरेसा उजेडही नव्हता, पण चोखोबा आणि देव जवळ जवळ बसलेले त्यांनी पाहिले ! सोयराहि तेथे होतीच. काय आणि कसे बोलावे हेच तिला सुचेना. तिचे चित्त कावरेबावरे झाले, पण अंत:करण भरून आले होते. आनंदाची परिसीमा ती उपभोगीत होती.

देव म्हणाले, 'तुम्ही दोघेही मला प्रिय आहात. तुम्हाला भेटण्याची मीही उत्सुकतेने वाट पाहात असतो. आता इच्छा झाली ना पुरी ?'

'नाही उरली वासना। तुम्हा नारायणा पाहता॥ उद्गारली चोख्याचीं महारीण. सोयराने मनोभावे देवाची पूजा केली. त्याच्या कपाळी कुंकू रेखिले, गळ्यात हार घातला, नीरांजन ओवाळले. तेवढ्या प्रकाशात देवाच्या तेज:पुंज चेहऱ्याकडे एकटक ती पहात राहिली.

'देवाला भूक लागली, आता वाढ ना.'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सोवराची धांदल उडाली. वाढता वाढता देवाच्या पीतांबरावर ताक सांडले ? जेवणे झाली, पांडुरंग समाधान पावले आणि अदृश्य

झाले ! खिडकीतून बघणाऱ्या लोकांची खात्री पटली. ते प्रत्येकाला या घटनेची हकीकत सांगत सुटले, आम्ही प्रत्यक्ष पांडुरंगाला चोखोबाच्या झोपडीत पाहिले. पुजाऱ्याने देवळात जाऊन विटेवर उभा असलेला विठ्ठल पाहिला, पण त्याच्या पीतांबरावर सांडलेले ताकही पाहिले ! तेव्हा सगळ्यांचीच खात्री पटली.

पुजाऱ्यासह बरेच लोक चोखोबाच्या झोपडीत शिरले आणि त्याच्यापुढे साष्टांग नमस्कार घालू लागले. चोखोबा नम्रपणे म्हणाला,

' अहो, हे काय करता ? मी तर तुमचा दास !'

चोखोबाची गणना संतमंडळीत होऊ लागली !'

□□□

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अद्वैताचा साक्षात्कार करणारे

श्री संत नरहरि सोनार

(त्रोटक जीवनवृत्तांत – नरहरीच्या वडिलांचे नाव अच्युत आणि आईचे नाव सावित्रीबाई. अच्युत हा शिवभक्त. पंढरपूरला येऊन तेथील मल्लिकार्जुनाचे देवळात दुकान मांडून राहिला. देवाकडे तोंड करून काम करी. एकदा काम करीत असता त्याचे हातून हातोडा निसटून देवाच्या पिंडीवर पडला. तेव्हा पिंडीला मिठी मारून अच्युत दुःख करू लागला. महादेव प्रसन्न होऊन त्यांनी त्याला एक महाभगवद्भक्त पुत्र होईल असा वर दिला.

याच पुत्राचे नाव नरहरी सोनार. याचे सातव्या वर्षी मौजीबंधन झाले. पुढे लग्न झाले. त्याच्या पत्नीचे नांव गंगा. नरहरी सोनार हे कडक शिवभक्त होते. नरहरी देवाची मूर्ती घडवत असता त्याचा हातोडा मूर्तीचे पोटात लागल्यामुळे तो फार दु.खी झाला. 'मी फार पापी आहे. मला हे काम नको' म्हणून त्याने आपली सोनारकीची सर्व हत्यारे चंद्रभागेत टाकून दिली. त्यानंतर तो फक्त वागीश्वरीचीच पूजा करी. देवाने वागीश्वरीपासून सुवर्ण प्रसवण्यास आरंभ केला! रोज सव्वा तोळा सुवर्ण निघे. नरहरीची वागीश्वरी मल्लिकार्जुनाच्या देवळात अद्याप आहे.)

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१. नरहरीला शिवदर्शन

नरहरि हा कट्टर शिवभक्त. शिवाशिवाय कोणत्याही देवाचे दर्शन न घेणारा. पंढरीस राहून पांडुरंगाचेही दर्शन न घेणारा! 'पांडुरंगाचे तोंडही पाहणार नाही!' ही त्याची प्रतिज्ञा.

तेथील मल्लिकार्जुनाचे देवळात ध्यानस्थ बसण्यात त्याला धन्यता वाटे. शंकराची मनोभावे पूजा करून त्याची स्तुतिस्तोत्रे गायल्याशिवाय त्याला चैन पडत नसे. अभंग गाण्यात गुंग. त्याचा स्वरचित अभंग पहा –

पाहा पाहा तुम्ही डोळा । माझा भोळा शंकर ॥
भावे तोषे कर्पुरगौर । हर हर वदता ॥
ध्यान धरूनी स्मशानी । जपे रामनाम मनी ॥
शंभूचे चरणावरी । लोळे सोनार नरहरी ॥

कारागिरीच्या कामाची कितीही गर्दी असो, देवाची पूजा चिंतन केल्याशिवाय तो कामाला हात लावीत नसे.

एके दिवशी त्याने कळवळून हात जोडून आपल्या आराध्य देवाला वंदन केले आणि प्रार्थना केली, 'हे कर्पूरगौरा उमापते, हे शंकरा, हे महादेवा, हे विश्वनाथा! मी अत्यंत अपराधी आहे, पापी आहे, माझे अपराध पोटात घालून मला निश्चित करा. तुझ्या प्रत्यक्ष दर्शनाची मला फार ओढ लागली आहे. काय करू मी? प्रत्येक क्षण मला युगासारखा भासत आहे. हे त्रिपुरांतका, हे महादेवा, मला आता धीर धरवत नाही, दर्शन देऊन माझे मन शांत करा.'

अत्यंत कळवळ्याने केलेला धावा ऐकून देवही संतुष्ट झाले. त्याच्या इच्छेप्रमाणे शंकरांनी नरहरीला रात्री स्वप्नात दर्शन दिले

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आणि म्हणाले, ' भक्ता, मी तुझी आर्तता ओळखून प्रसन्न झालो आहे. तू निश्चित रहा, कशाचीही काळजी करू नकोस.'

स्वप्नातून बाहेर पडताच नरहरी जागा झाला.'जय शंकर' म्हणून ओरडला आणि स्वप्न पुन: पुन्हा आठवून गहिवरून येत होता. आनंदातिशयाने तो थोडा गडबडूनही गेला. अनेक वर्षांची तपश्चर्या फळास आली, स्वत:ला धन्यता वाटली. मल्लिकार्जुनाचे हर्षोत्फुल्ल मनाने चिंतन करीत तो पुढील कामाला लागला.

२. सावकार श्रीमान पण बेचैन !

सुख हे पैशावर अवलंबून नसते. कितीही पैसा असला तरी काही सुखे विकत घेता येत नाहीत. संतति-सुख हे त्यांपैकीच एक आहे.

दौलताबादचा हरिशेट सावकार अतिशय श्रीमंत. घरात गजांत लक्ष्मीचा वास. सर्व प्रकारची सुखे हात जोडून उभी, पण त्यांत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एका सुखाची उणीव. या सुखाच्या अभावामुळे हरिशेट व त्याची बायको मनामध्ये खिन्न. वरकरणी दोघे आनंदित दिसायची, पण संतती नसल्यामुळे मनाला खंत वाटे. एखादे तरी मूल हवेच. मुलाशिवाय कौटुंबिक जीवन निरर्थक. पुष्कळ उपाय झाले. दान-धर्म केले, अनेक व्रते केली. नवससायासही झाले. पण व्यर्थ.

हरिशेटची बायको रमाबाई हिने एक उपाय सुचवला. त्याच गावात गोपाळशास्त्री या नावाचे एक कर्मनिष्ठ, पांडुरंगाचे निस्सीम उपासक राहात होते. ते लोकांच्या उपयोगी पडणारे आणि त्यांची दुःखे दूर करणारे असा लौकिक त्यांनी संपादन केलेला होता. रमाबाईने आपल्या पतीला त्यांना एकदा भेटण्याचे सुचविले. हरिशेठने त्यांना भेटण्याचे ठरविले. त्यांच्या मनात एक उत्स्फूर्त आशा अंकूर निर्माण झाला. ते पतिपत्नी गोपाळशास्त्री यांचेकडे गेले. एवढे श्रीमान सावकार आपल्याकडे आलेले पहाताच शास्त्रीबुवांना आश्चर्य वाटले. ' यांना कशाची चिंता ? लक्ष्मीचा वरद हस्त. सर्व सुखे पायाशी लोळण घेत आहेत. यांचे माझेकडे आज काय काम असावे ?' असा मनात विचार करीत हरिशेटनी मनातील व्यथा व्यक्त केली. ' कितीही पैसा लागला तरी मी तो खर्च करण्यास तयार आहे.' शास्त्रीबुवा म्हणाले, ' येथे पैशाचा प्रश्न नाही, भावनेचा आहे. पांडुरंगावर पूर्ण विश्वास पाहिजे.'

हरिशेट म्हणाले,' तुम्ही म्हणता ही गोष्ट खरी आहे. पांडुरंगाची सेवा मी मनोभावे करण्यास तयार आहे. काही मार्ग दाखवा.'

शास्त्रीबुवा नेहमीच्या पद्धतीनुसार काही काळ ध्यानस्थ बसले. नंतर त्यांनी डोळे उघडले आणि म्हणाले.' शेटजी, देवाला एक नवस करा. मला पुत्रप्राप्ती होताच पांडुरंगा, तुला सोन्याचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करगोटा बांधीन.' दोघांनी हा नवस मनापासून उच्चारला आणि शांत चित्ताने घरी परतले.

देव पावला, नवस फळास आला. रमाबाईंना पुत्ररत्न प्राप्त झाले. ही आनंदाची वार्ता सांगण्यास उल्हसित मनाने हरिशेट शास्त्रीबुवांकडे गेले. त्यांच्या घरातील पांडुरंगापुढे एक मोठा केशरी पेढ्यांचा पुडा ठेवला आणि मनोभावे देवाला नमस्कार केला.

आता नवस पुरा करण्याचा प्रश्न.

हरिशेट म्हणाला, 'हा सोन्याचा करगोटा कौशल्याने तयार करणारा कोण मिळेल ?' 'अहो विचारात कशाला पडता. तुम्हीं पंढरपूरला जा आणि नरहरि सोनाराला भेटा. तो उत्तम कारागीर आहे. एकदम मनपसंत असा करगोटा तो तयार करील.

३. नरहरि सोनार डोळे बांधून देवळांत गेले

नरहरीने रत्नजडीत करगोटा तयार करण्याचे मान्य केले, पण त्याला पांडुरंगाच्या कमरेचे माप हवे होते.

'तुम्ही, माप आणलेत का ?'

'नाही. आपण देवळात जाऊ आणि तेथेच माप घेऊ. चला माझ्या बरोबर माझ्या गाडीतून.'

'छे हो, ही गोष्ट जमणार नाही. मी पांडुरंगाच्या देवळात कधीच जात नाही. त्याचे दर्शन कधीच घेत नाही, माझा मल्लिकार्जुन. 'नमःशिवाय; नमःशिवाय शिवाशिवाय मी कोणत्याच देवाची भक्ती करीत नाही. नमःशिवाय नमःशिवाय.' 'पांडुरंगाचे मी तोंड देखील बघणार नाही !'

हरिशेटना आश्चर्य वाटले. पंढरपुरात पांडुरंगाचे तोंड न पाहणारा मनुष्य विरळाच !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ते म्हणाले, 'नरहरिबुवा काही हरकत नाही तुमचा निश्चय कसा मोडू ? मी माप घेऊन येतो.'

माप मिळाल्यावर नरहरी सोनाराने आपले कौशल्य पणास लावून रत्नजडीत करगोटा तयार केला. तो चकाकणारा जिन्नस त्याने हरिशेठला दिला. दुसरे दिवशी हरिशेट आणि त्यांची पत्नी चंद्रभागेवर गेली. तेथे ते स्नान करून शुचिर्भूत झाले. उल्हसित अंत:करणाने ते पांडुरंगाच्या दर्शनाला गेले. जाताना त्यांच्या मनात अनेक विचारांची गर्दी झाली होती. 'पांडुरंगा, तू आमची मनोकामना पूर्ण केलीस, घरात बाळलीला सुरू झाल्या, वंशाचा दिवा आमच्या दृष्टीस पाडलास, केवढे भाग्य आम्हाला दाखविलेस, घर आनंदाने भरून गेले.'

हरिशेट देवळात गेले आणि नवसाचा लखलखणारा करगोटा पुजाऱ्याच्या हातात दिला. पुजारीही त्या चकचणाऱ्या करगोटच्याकडे पाहून आनंदित झाला आणि म्हणाला, 'हा जिन्नस नरहरी सोनाराने बनविला असणार. त्याच्या इतका उत्तम कारागीर उभ्या महाराष्ट्रात भेटणार नाही !' असे बोलून पुजाऱ्याने तो करगोटा देवाच्या कमरेस लावला, 'अरेरे, काय करावे ? करगोटा आखूड झाला.'

हरिशेट मनाने खट्टू झाले, पण म्हणाले, 'आणा इकडे, मी तो थोडा वाढवून आणतो.' ते तडक सोनाराकडे गेले आणि थोडा वाढवून देण्यास त्यांनी सांगितले.

दुसरे दिवशी तो वाढविलेला करगोटा घेऊन हरिशेठ देवळात गेले. पुजाऱ्याने तो देवाच्या कमरेला लावताच तो फार मोठा झालेला आढळला, कमरेतून सहज गळून पडणारा.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

 CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हरिशेट बुचकाळ्यात पडले 'आता काय करावे ?' म्हणून ते सचिंत झाले, अस्वस्थ झाले !

पुजारी म्हणाले, 'करगोटा तयार करणाऱ्यानेच माप घेतले असते म्हणजे बरे झाले असते. हरिशेट खिन्न मनाने पुन्हा सोनाराकडे गेले आणि सर्व हकीकत सांगितली. त्यालाच आता उपाय विचारू लागले.

सोनार म्हणाला, 'खरे म्हणजे मीच माप घेणे इष्ट. पण मी देवळात जात नाही. यावर हरिशेटने एक उपाय सुचवला. ते म्हणाले, 'तुम्हाला पांडुरंगाचे तोंड पहायचे नाही. मी तुमचे डोळे बांधतो आणि तुम्हाला तुमचा हात धरून देवळात नेतो, तुम्हीच माप घ्या म्हणजे झाले.'

नरहरी विचारात पडला, पण लगेच त्याने होकार देताच तो हरिशेटच्या गाडीत बसून देवळात गेला. डोळे बांधून आलेल्या नरहरीकडे पाहून लोक चकित झाले. काहींना आश्चर्य वाटले. काहींनी त्याचा उपहासस केला. तर काही कुचेष्टेने हसले सुद्धा !

देवळात गेल्यावर नरहरीपुढे नवीनच समस्या निर्माण झाली. माप घेण्याचा प्रयत्न करताना ती विठ्ठलमूर्ती तो हातांनी चाचपू लागला. त्याला शंकराचीच मूर्ती हाती लागल्यासारखे वाटले ! मस्तकी जटाजूट, गळ्यात सर्पांचे अलंकार, असा शंकराचा थाट त्याच्या हातास लागला ! तो म्हणाला, 'हे तर माझेच आराध्य दैवत,' म्हणून त्याने बांधलेले डोळे सोडले व मूर्तीकडे पाहिले, तो ती शंकराची नसून विठ्ठलाची मूर्ती त्याच्या दृष्टीस पडली. त्याने पुन्हा डोळे झाकले व मूर्तीस चाचपून पाहिले तो पुन्हा शिवमूर्ती

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ते म्हणाले, 'नरहरिबुवा काही हरकत नाही तुमचा निश्चय कसा मोडू ? मी माप घेऊन येतो.'

माप मिळाल्यावर नरहरी सोनाराने आपले कौशल्य पणास लावून रत्नजडीत करगोटा तयार केला. तो चकाकणारा जिन्नस त्याने हरिशेठला दिला. दुसरे दिवशी हरिशेट आणि त्यांची पत्नी चंद्रभागेवर गेली. तेथे ते स्नान करून शुचिर्भूत झाले. उल्हसित अंतःकरणाने ते पांडुरंगाच्या दर्शनाला गेले. जाताना त्यांच्या मनात अनेक विचारांची गर्दी झाली होती. 'पांडुरंगा, तू आमची मनोकामना पूर्ण केलीस, घरात बाळलीला सुरू झाल्या, वंशाचा दिवा आमच्या दृष्टीस पाडलास, केवढे भाग्य आम्हाला दाखविलेस, घर आनंदाने भरून गेले.'

हरिशेट देवळात गेले आणि नवसाचा लखलखणारा करगोटा पुजाऱ्याच्या हातात दिला. पुजारीही त्या चकचणाऱ्या करगोटया-कडे पाहून आनंदित झाला आणि म्हणाला, 'हा जिन्नस नरहरी सोनाराने बनविला असणार. त्याच्या इतका उत्तम कारागीर उभ्या महाराष्ट्रात भेटणार नाही !' असे बोलून पुजाऱ्याने तो करगोटा देवाच्या कमरेस लावला, 'अरेरे, काय करावे ? करगोटा आखूड झाला.'

हरिशेट मनाने खट्टू झाले, पण म्हणाले, 'आणा इकडे, मी तो थोडा वाढवून आणतो.' ते तडक सोनाराकडे गेले आणि थोडा वाढवून देण्यास त्यांनी सांगितले.

दुसरे दिवशी तो वाढविलेला करगोटा घेऊन हरिशेठ देवळात गेले. पुजाऱ्याने तो देवाच्या कमरेला लावताच तो फार मोठा झालेला आढळला, कमरेतून सहज गळून पडणारा.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हरिशेट बुचकाळचात पडले 'आता काय करावे ?' म्हणून ते सचिंत झाले, अस्वस्थ झाले !

पुजारी म्हणाले, 'करगोटा तयार करणाऱ्यानेच माप घेतले असते म्हणजे बरे झाले असते. हरिशेट खिन्न मनाने पुन्हा सोनाराकडे गेले आणि सर्व हकीकत सांगितली. त्यालाच आता उपाय विचारू लागले.

सोनार म्हणाला, 'खरे म्हणजे मीच माप घेणे इष्ट. पण मी देवळात जात नाही. यावर हरिशेटने एक उपाय सुचवला. ते म्हणाले, 'तुम्हाला पांडुरंगाचे तोंड पहायचे नाही. मी तुमचे डोळे बांधतो आणि तुम्हाला तुमचा हात धरून देवळात नेतो, तुम्हीच माप घ्या म्हणजे झाले.'

नरहरी विचारात पडला, पण लगेच त्याने होकार देताच तो हरिशेटच्या गाडीत बसून देवळात गेला. डोळे बांधून आलेल्या नरहरीकडे पाहून लोक चकित झाले. काहींना आश्चर्य वाटले. काहींनी त्याचा उपहासस केला. तर काही कुचेष्टेने हसले सुद्धा !

देवळात गेल्यावर नरहरीपुढे नवीनच समस्या निर्माण झाली. माप घेण्याचा प्रयत्न करताना ती विठ्ठलमूर्ती तो हातांनी चाचपू लागला. त्याला शंकराचीच मूर्ती हाती लागल्यासारखे वाटले ! मस्तकी जटाजूट, गळचात सर्पांचे अलंकार, असा शंकराचा थाट त्याच्या हातास लागला ! तो म्हणाला, 'हे तर माझेच आराध्य दैवत,' म्हणून त्याने बांधलेले डोळे सोडले व मूर्तीकडे पाहिले, तो ती शंकराची नसून विठ्ठलाची मूर्ती त्याच्या दृष्टीस पडली. त्याने पुन्हा डोळे झाकले व मूर्तीस चाचपून पाहिले तो पुन्हा शिवमूर्ती

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याच्या हातास लागली. 'नमः शिवाय, नमः शिवाय' म्हणून तो गरजला, त्याला आश्चर्याचा धक्का बसला.

'अहो, ही पांडुरंगाची मूर्ती आहे, डोळे उघडून पहा.' शेवटी डोळ्यावरचे फडके बाजूला केले आणि काय आश्चर्य? समोर विठ्ठलाची हसरी प्रतिमा त्याने निरखून पाहिली. पण मग आपल्याला शंकर कसे भासले?

एवढ्यात, त्याला पुढील उद्‌गार ऐकू आले, 'नरहरी, शंकर काय किंवा विठ्ठल काय ही एकाच देवाची स्वरूपे आहेत. अज्ञानाने तू द्वैतभाव मनात धरला होतास. देव एकच आहे. अद्वैत लक्षात घे.'

हे शब्द ऐकताच नरहरी सोनाराला पुढील उद्‌गार स्फुरले—

'शिव आणि विष्णु एकचि प्रतिमा।
ऐसा ज्याचा प्रेमा सदोदित।
धन्य ते संसारी नर आणि नारी।
वाचे हर हरी उच्चारीत।
सोनार नरहरी न देखे द्वैत।
अवघा मूर्तिमंत एक रूप॥'

□ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भावभक्तीचा फुलोरा फुलविणारे पिता–पुत्र

श्री संत परसुबा आणि सावता माळी

(त्रोटक जीवनवृत्तांत–परसुबा हा अरणभेंडी या गावचा एक गरीब माळी. एका झोपडीत जीवन जगत होता. मिळेल तेव्हा काम, नाही तर स्वस्थ. परमेश्वरावर त्यांचा विश्वास. विठ्ठलाचे नाव सतत तोंडी, भजनात सतत गुंग. विठ्ठलाच्या ओढीने तो पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनाला गेला. देव त्याला प्रसन्न झाला आणि त्याच्याच कृपेने त्याला मुलगा झाला. त्याचे नाव सावता. हा मुलगा लहानपणापासूनच बापाप्रमाणे ईश्वरभजनात रम-लेला राही. शेजारच्या शेतात काम करी. फुलं आणि भाजी त्यातून काढी, पण तोंडी सतत देवाचे नाव. त्याच्या आईचे नाव नोगिता व बायकोचे नाव जना. हे छोटे कुटुंब, गरीब पण नेहमी प्रसन्न. सावता मळ्यात काम करी आणि मिळेल त्यावर उदरनिर्वाह करी. ज्ञानेश्वर, नामदेव यांचे बरोबर काशीयात्रेला जाऊन आला. या संतांच्या सान्निध्यात तो एकनिष्ठ भगवद्-भक्त बनला. विठ्ठलाचाही त्याच्यावर जीव जडला. विठ्ठलाला त्याची परीक्षा पाहण्याची लहर आली. या परीक्षेत तो शंभर टक्के उतरला त्याने आपला शेवटचा दिवस निश्चित केला, आषाढ वद्य चतुर्दशी. बायकोची त्याने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

समजूत घातली. ' पंढरीला तू माझी तयारी करीत असत. पंढरीच्या यात्रे-सारखीच ही एक यात्रा आहे ! ठरलेल्या दिवशी सावता आनंदात विलीन झाला.)

कुलुप गळून पडले, दार उघडले गेले !

भगवद्भक्त सावता हा एक गरीब माळ्याचा मुलगा. ह्याच्या वडिलांचे नाव परसू. परसूबाबा पांडुरंगाच्या भजनात सतत गुंग असत. आपल्या परसात भाजी पिकवी. भाजी विकून जो पैसा मिळे त्यावर उदरनिर्वाह चाले. गरिबीने तो कधीच गांजला नाही. वैतागला नाही. पांडुरंगाच्या भजनात मग्न होऊन जाई. भजनातल्या गोडीने मुलेही त्याच्याभोवती जमत, नाचत, बागडत, भजन करीत. मुले विचारीत, ' हा पांडुरंग कोण ?'

' बाळांनो, चला माझे' बरोबर देवळात. पाहा तो विठ्ठल. तुम्ही पाहिलात, मीही पाहिला पण याच्या दर्शनाने मी अगदी वेडा होऊन जातो.'

' पांडुरंग...पांडुरंग...' असा गजर करून त्यात मी गुंग होऊन जातो. आनंदाने नाचतो. त्याची ओढ मला विव्हळ करते. पंढरीचा पांडुरंग मला प्रत्यक्ष पाहाण्याची ओढ लागली आहे. केव्हा योग येईल तेव्हा येईल.

परसू जरा मोठा झाल्यावर त्याच्या जीवनात नोगिता ही त्याची जीवनसाथी म्हणून आली. त्याचे घर म्हणजे एक झोप-डीच. त्यात होती फक्त गाडगी–मडकी, पांघरायला एखादे घोंगडे, नोगिता एवढ्यावर संतुष्ट होती. तिचे प्रेम, तिची भक्ती, गरीब पण शांत स्वभावाच्या परसूवर. हे गरीब कुटुंब आपल्या झोपडीत विठ्ठलाच्या भजनात विठ्ठलाशी अगदी एकरूप होऊन जाई.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परसूच्या मनाने एकदा पंढरपूरला जाण्याचे ठरविले. त्याने ह्या विचार नोगिताला सांगितला. तिने फडक्यात भाकरी बांधून दिली, आणि परसू निघाला. वाटचालीने थोडा थकला की ओढचा-काठी भाकरीचा तुकडा खाऊन व पाणी पिऊन ताजातवाना होई. ओढ होती विठ्ठलाच्या दर्शनाची. तोंडाने 'विठ्ठल...विठ्ठल' असा नामोच्चार करीत वाट चाले. शेवटी आला पांडुरंगाच्या देवळात. पण वेळ होती रात्रीची. चहूकडे अंधार, देवळाचे दार बंद. परसू मनात खिन्न झाला, मनात निराशा दाटली, वेडापिसा होऊन जाण्याची वेळ आली. पण करायचे काय ? तो मनात म्हणाला, ' देवा, एवढ्या लांबून मी तुझ्या भेटीला आलो पण मीच कमनशिबी. आर्त स्वराने त्याने देवाला आळविले,' विठ्ठल' विठ्ठल ' असा टाहो फोडला.

देव भावाचा भुकेला. त्याने परसूची उत्कटता ओळखली, केविलवाणी स्थिती जाणली आणि त्याची मनीषा पूर्ण करण्याचे ठरविले. देवाने एक मोठा चमत्कार घडवून आणला. देवळाच्या दरवाजाचे भले मोठे कुलूप गळून पडले ! दरवाजा आपोआप सताड उघडला ! आतील भाग तेजस्वी प्रकाशाने भरून गेला ! परसू आनंदित झाला. पांडुरंग...पांडुरंग म्हणून त्याने देवाच्या पायाला मिठी घातली. या अवस्थेत त्याला एक वेगळीच जाणीव झाली, समाधी लागल्यासारखे झाले.

विठ्ठलाने त्याला जागे केले. डोक्यावर वरदहस्त ठेवला. मंदस्मित करून तो म्हणाला, ' परसोबा, दर्शनाची तुझी आर्तता आता पुरी झाली आहे. मी प्रसन्न झालो आहे. तुझ्यासारखे भक्त मला फार प्रिय असतात. तुझी आकांक्षा मी पूर्ण करीन. माग, तुला हवे असेल ते माग. '

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'देवा, तू भेटलास, दर्शन दिलेस; मी कृतार्थ झालो, धन्य झालो. माझी एवढीच इच्छा आहे की, माझ्या मागे माझ्या संसारात ही तुझी भक्ती अखंड चालावी, एवढ्याकरिता मला एक पुत्र हवा. या परते मला आता खरोखर काही नको.'

देवांनी 'तथास्तु' म्हणून त्याचे डोक्यावर वरदहस्त ठेविला.

परसू आनंदमय स्थितीतून जागा झाला. मिटलेले डोळे उघडले, पाहातो तो देव अदृश्य. प्रकाश निमाला, दरवाजाला आपोआप कुलूप लागले.

मनाच्या आनंदमय स्थितीत परसू घरी परतला. पाय जलद चालू लागले. बायकोला ही घटना सांगण्याची उत्कंठा त्याला लागली.

२. 'अनंता' नामाच्या पानात जेवला ! ब्राह्मणांचा जळफळाट झाला.

ज्ञानदेव, नामदेव, सावता, गोरा कुंभार इ. संत मंडळी काशीयात्रेला गेली होती. यात्रेहून परत पंढरपूरला आली. साऱ्या संत मंडळींना एकत्र आलेले पाहून पंढरीनाथ व रुक्मिणी मनात हरखून गेली. आपल्या या लाडक्या भक्तांना विठ्ठलांनी भोजन देण्याचे ठरविले. त्यांनी ब्राह्मणाचा वेश धारण करून 'अनंत' हे नामाभिधान घेतले. या अनंताने सर्व संत मंडळींना आणि पंढरीतील ब्राह्मणांना भोजनाचे निमंत्रण केले. अनंतावरोबर नामदेवही होता.

पुष्कळ ब्राह्मणांना अचंबा वाटला. हा अनंता तर ओळखीचा दिसेना आणि आग्रहाचे निमंत्रण देत आहे. त्यांनी विचारले, 'तुम्ही येथे नवीन दिसता. कोठे असता, कोठून आला ?'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अनंता उत्तरला, ' तुम्ही ओळखलें नाही मला ? मी तर या सर्व संत मंडळींच्या परिचयाचा आहे, तेव्हा अवश्य यायचे, अनमान करू नका. '

स्वत: पांडुरंग स्वैपाकात मदत करू लागले. भोजनव्यवस्थेत कमी काय पडणार ? धूपाचा घमघमाट, रंगित रांगोळीची शोभा, चकमकीत पाट–भांडी, पंगतीचा थाट पाहून कोणीही थक्क होईल.

अनंता आणि सावता यांची मनोमन ओळख पटून ते गाला-तल्या गालात हसत होते. अनंताने सर्वांचे स्वागत करून भोजनास सुरुवात करण्याची विनंती केली. ज्ञानदेव, सोपान, सावता, नरहरी, चोखा, गोरा इ, संतमंडळी आणि निमंत्रित ब्राह्मण या सर्वांची पंगत शोभायमान होती.

सर्वांनी सुरुवात केल्यानंतर सावताने अनंतालाही जेवायला बसण्याचा आग्रह केला. अनंता वसला तो एकदम नामदेवाच्या ताटात !

ही गोष्ट इतरांच्या कोणाच्या लक्षात आली नाही, परंतु ब्राह्मणांच्या निरीक्षणातून ही गोष्ट सुटली नाही. अनंता ह्रा ब्राह्मण म्हणवितो आणि बेधडक नामदेवाच्या, शिप्याच्या पानात जेवतो ! ह्याला जात, धर्म, नीती–अनीति समजते की नाही. अशा टीकेला जोर चढला.

अनंता मात्र शांत राहिला. जाताना त्याने ब्राह्मणांना ' सर्व काही ठीक झालं ना ? आपण सर्व आल्याने मला खूप आनंद झाला ' असे म्हटले. या भाषणाने तर ब्राह्मण अधिकच चिडले आणि म्हणाले, ' हा काय तुम्ही अनाचार मांडलाय ? सोनार, शिपीं, कुंभार यांना तुम्ही ब्राह्मणांच्या पंगतीला बसविले ! आणि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुम्ही तर त्या नाम्याचे शिप्याचे उष्टेही खाल्ले ! हा भ्रष्टाचार आम्हाला कसा खपावा ?'

अनंताने हे सर्व ऐकून घेऊन त्याने स्मित केले आणि म्हणाला, 'तुम्ही सारे विद्वान, धर्म–अधर्म जाणणारे. आत्मा हा सगळ्यांचा सारखाच, अमक्याचा चांगला, तमक्याचा वाईट असे तुम्ही कसे म्हणू शकता ? तुम्हाला काय अधिकार ? मी बाटलो असे तुमचे म्हणणे ठीक आहे. तुमच्या धर्मशास्त्रानुसार मी शिक्षा भोगावयास तयार आहे. सांगा.' प्रायश्चित्त घेण्याच्या दृष्टीने अनंताने सर्व ब्राह्मणांना दुसरे दिवशी जेवावयास बोलाविले.

आदल्या दिवसाचाच सारा थाट. अनंत वाढत होता आणि काय आश्चर्य ? वाढता वाढता तो थबकला. त्याने पंढरीनाथाचे रूप धारण केले. कमरेवर हात, कस्तुरीचा टिळा, गळ्यात वैजयंती माळा, भारी पीतांबर नेसलेला आणि तोंडावर स्मित अशा तेजस्वी रूपात अनंतराव पंढरीनाथ बनले !

ब्राह्मणांनी देहभान विसरून पंढरीनाथाच्या पायावर डोके ठेवले ! सावता प्रसन्न चित्ताने घरी परतला,

३. पोट चिरून आत लपविले !

सावताने विठ्ठलाला आपले सर्वस्व वाहून टाकले. विठ्ठलाशिवाय त्याला काही दिसत नव्हते. तो अगदी साधा, निर्मळ मनाचा असून आपला मळा फुलविण्यात तो रमून जात असे.

'आमची माळियाची जात । शेत लावू बागाईत ।
आम्हा हाती मोटनाडा । पाणी जाते फुल झाडा ॥

शेवटचे चरण घोळून घोळून म्हणे. मळ्याशिवाय त्याला काही दिसत नसे. त्याचे काव्य, त्याचे अभंग मळ्याचेच.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कांदामुळा भाजी ! अवघी विठाबाई माझी ।
लसुण, मिरची, कोथिंबिरी । अवघा माझा हरी ।।
शांति शेवंती फुलली । प्रेम जाई जुई व्याली ।।
सावताने केला मळा । विठ्ठल देखियेला डोळा ।।
ऊस गाजर रताळू । अवघा झालासे गोपाळू ।
सावता म्हणे केला मळा । विठ्ठल पायी गोविला गळा ।।

अशा भक्ताची परीक्षा पाहण्याची लहर विठ्ठलाला आली आणि देव त्याचेकडे निघालें. ज्ञानदेव, नामदेव हेही संत त्याचे बरोबर निघाले. वाटेत सावताचे गाव अरणभेंडी लागले. देवांनी योजल्या-प्रमाणे, ज्ञानदेव, नामदेव यांना म्हणाले, ' मला तहान लागली आहे, मी पाणी पिऊन येतो. तोपर्यंत तुम्ही इथेच थांबा. '

विठ्ठल शिरले सावताच्या मळ्यात. सावता विठ्ठलाचे स्तुतिपर अभंग मोठमोठ्याने म्हणण्यात गुंग झाला; त्याची तंद्री लागली होती. इतक्यात ' मला वाचवा, मला वाचवा ' असे शब्द त्याच्या कानात घुमले. ' माझ्या मागे चोर लागले आहेत. तू विठ्ठलाचा भक्त ना, मला लपायला जागा दे. '

सावता माळी तर आश्चर्यचकित झाला. समोर पांडुरंग उभे ! सावताने साष्टांग नमस्कार घातला. अगदी बावरून गेला. विश्वाचा नियंता विश्वव्यापी परमेश्वर याने ' मला लपवा म्हणावे ' याचा अर्थ काय ? तो अगदी दिङ्मूढ होऊन गेला.

देव बोलले, ' सावता, एवढ्या मोठ्या सुंदर मळ्यात मला लपायला जागा नाही ?'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

' देवा, माझी परीक्षा बघण्याचा बेत केला आहात काय? ठीक आहे ? सावताने कसलाही विचार न करिता, निःशंकपणे हातातल्या सुऱ्याने आपले पोट चिरले ! आणि देवाला लपायला जागा दिली.



या घोर कृत्याने देव थोडे गांगरले. विश्वव्यापी विश्वंभराने सूक्ष्म रूप धारण करून ते पोटात निवांत बसले ! बसताना त्यांनी धोरणाने आपल्या शेल्याचे टोक बाहेरच लोंबकळत ठेवले.

बराच वेळ झाला तरी पाणी प्यायला गेलेले देव दिसेनात. ज्ञानदेव–नामदेव यांनी इकडे तिकडे शोधाशोधी केली, पण देव कुठेच दिसेना. सावता मात्र एका झाडाखाली ' विसरून देहभान, हरीरूप झाला तल्लीन. '

ज्ञानदेव नामदेव यांनी विचारलें, ' सावता, देव कुठे आहे ?', सावता उत्तरला, ' माझ्या पोटांत, खरोखर माझ्या पोटात !'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दोघांना वाटले, सावता वेडा झाला. ते सावताकडे निरखून बघत राहिले आणि त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. सावताच्या बेंबीखाली देवाच्या शेल्याचे टोक !

शेल्याचे टोक पाहून, खात्री होताच नामदेवाने तर सावतापुढे साष्टांग नमस्कार घातला आणि तो उद्गारला,

'धन्य तो देव आणिं धन्य तो भक्त !'

□□□

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वैश्य कुळाचा उद्धार करणारी

श्री संत कान्होपात्रा

(त्रोटक जीवनवृत्तांत – पंढरपुरापासून सात कोसांवर मंगळवेढे हे इतिहासप्रसिद्ध ठिकाण आहे. तेथे श्यामा नावाची एक वेश्या राहात असे. तिची मुलगी कान्होपात्रा. सौंदर्य आणि गोड गळा यामुळे तिच्यावर अनेक संकटे आली. पण परमेश्वरकृपेने ती त्यातून निसटली. म्हणतात ना? 'अरक्षितः तिष्ठति दैव रक्षितम् ।' लहानपणापासूनच तिचा ओढा ईश्वराकडे, विठ्ठलभजनात नेहमी दंग. शेवटी विठ्ठलानेच तिला आपल्या पायाशी कायमची ठेवून घेतली!)

१. थोर विचारांची वेश्या

कान्होपात्राची आई तिच्या सौंदर्यावर आणि गोड गळ्यावर अगदी खूष होती. आपल्या व्यवसायाला लागणारे हे गुण तिच्या ठिकाणी प्रकर्षाने दिसत होते. त्यामुळे उदरभरणाला लागणाऱ्या पैशाची तिला कधीच काळजी वाटत नसे. तिची आई तिला आपला व्यवसाय सोडून कसे चालेल, असे परोपरीने पटवून द्यायचा प्रयत्न करी. 'आपण धनिक गिऱ्हाईकांकडे आपलेपणाने बघितले पाहिजे. मी तर बेदरच्या बादशहाशी तुझे संधान बांधण्याची व्यवस्था करीत आहे, वशिले लावीत आहे.' असे म्हणे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मध्यंतरी कान्होपात्रा आपल्या प्रियकराशी मोकळेपणाने बोलत होती. प्रेमसंवाद व प्रियाराधन या गोष्टींना भर येत चालला होता, त्यात संकोच राहिला नव्हता.

बेदरच्या बादशहापेक्षा कान्होपात्रा आपल्याला श्रेष्ठ समजते म्हणून तिचा प्रियकर स्वत:ला धन्य समजत होता.

असा एकान्त चालू असता त्या प्रियकराचे वडील कान्होपात्राच्या घरी आले. बाप–लेक समोरासमोर ठाकल्यानंतर बापाने आपल्या मुलाची चांगलीच खरडपट्टी काढली. ते म्हणाले, 'कुलांगार कारट्या, माझ्या पोटी येऊन कुळाचा नावलौकिक चांगला गाजविलास !... आईची आठवण ठेविली नाहीस. सज्जनाचे संसार बुडविणाऱ्या ह्या कुलटच्या... तुझी लग्नाची बायको घरी तुझ्यासाठी धाय मोकलीत आहे, तिच्या करुण किंकाळ्या तुला ऐकू येत नाहीत...व्यापाराकरिता दिलेला पैसा इथे आणून ओतलास, शरम नाही वाटत ?'

हे वडिलांचे कठोर भाषण ऐकून कान्होपात्रा अगदी स्तिमित होऊन गेली. तिला आश्चर्याचा धक्का बसला. ती काकुळतीला येऊन बोलली, 'काय ऐकते मी हे ? हे विवाहित आहेत हे मला ठाऊक नव्हते. यांची गृहदेवता यांच्या वाटेकडे डोळे लावून बसलेली असणार. त्या सतीच्या संसाराचा विध्वंस करणारी मी चांडाळीण ठरणार. काय हे घोर कर्म !'

'महाराज, आपण उच्च कुळातले आहात. तुम्ही आता येथून जितक्या लवकर जाल तितके चांगले.'

'आई, तुला काही सांगण्याचा माझा अधिकार नाही, पण बोलू का ? यांचेकडून घेतलेले धन परत करावेस, असे मला वाटते माझ्या प्रेमाची विक्री नको !'

अशा थोर विचारांनी तिच्या मनात काहूर उठविले. विषण्ण मनाने ती एकटीच स्वस्थ पडून राहिली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२. वेश्येची मुलगी वारकरी बनली !

घडलेल्या घटनांचा विचार केल्यानंतर ती एका निश्चयाप्रत आली. आता तिचे मन शांत झाले होते. मनामध्ये पुढील मार्गाची आखणी झाली.

पंढरपूर मंगळवेढ्यापासून फार दूर नव्हते. एकादशीला अनेक वारकरी मंडळी विठ्ठलाच्या नावाचा गजर करीत पंढरीला जात, हे तिने पाहिले होते. लहानपणापासून ईश्वरभक्तीकडे तिचा ओढा होता. तेव्हा वारकरी मंडळीकडून पंढरपूरसंबंधी अधिक माहिती ती मिळवू लागली. आपण वेश्येची मुलगी, आपल्याला पंढरपूरला थारा मिळेल किंवा नाही असे विचार तिच्या मनात घोळू लागले. शेवटी

तिने वारकऱ्यांच्या एका दिंडीशी सलगी केली. त्यांच्या भजनातही ती भाग घेऊ लागली. दिंडीतल्या एका वृद्धाने तिची प्रेमाने विचारपूस करून तिच्या सर्व शंकांचे निरसन केले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कान्होपात्राला विठ्ठलाच्या भेटीची तळमळ लागली. पंढरपूरला जाण्याचे तिने निश्चित ठरविले. या निश्चयाने ती आनंदित झाली. घरी गेली. जुजबी सामान आणि आवडता वीणा घेऊन ती बाहेर पडणार इतक्यात तिच्या आईने विचारले, ‘ अगं हे काय ? कुठे निघालीस ?’

‘ माझा बेत निश्चित झाला आहे, मी पंढरीला निघाले.’

आईला नमस्कार करून ती घराबाहेर पडली. दिंडीच्या सोबतीने पंढरीची वाट ती चालू लागली.

वाटेत भक्तीपर अभंग रसाळपणे गाऊन तिने सर्वांची मने रिझविली आणि त्यांच्याशी सलगी वाढविली. कान्होपात्राच्या गोड गळ्यातील अभंगवाणी ऐकण्याकरिता लोक अतिशय उत्सुक असत. तिलाही आपल्या गोड गळ्याचे सार्थक होत आहे हे पाहून तिचे मन उल्हसित होई. तिच्या विठ्ठलभक्तीची खात्री सर्वांना पटली. त्या वारकऱ्यांनी तिला आदराने आणि कौतुकाने पांडुरंगाच्या महाद्वारापाशी आणले. सिथेच तिने विठ्ठलाचे प्रसन्न रूप पाहून लोटांगण घातले ! तिचा आनंद हृदयात मावेना, जीवनाची सार्थकता झाली या विचाराने ती हर्षोत्फुल्ल झाली.

कान्होपात्राची निस्सीम भक्ती, विठ्ठलभेटीची आर्तता, अभंगातील अवीट गोडी इत्यादी गोष्टींमुळे तिची ख्याती पंढरपूरच्या परिसरात पसरली.

३. मृत्यूने लाज राखली !

कान्होपात्राच्या अप्रतिम सौंदर्यावर भाळून तेथील समाजकंटकांनी तिला आपल्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न सुरू केला. तिचे नशीब थोर म्हणूनच ती या संकटातून मोकळी झाली. पण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्या दुष्ट लोकांनी आपले मनोगत साध्य झाले नाही म्हणून वेगळाच डाव टाकला. तिच्यावर सूड उगवण्याचा प्रयत्न केला.

कान्होपात्रा विठ्ठलापुढे उभी राहिली आणि तिने विठ्ठलाची आळवणी सुरू केली.

' पुरविली पाठ न सोडी खळ । अधम चांडाळ पापराशी ।।
वारिता नायके दुष्ट दुराचार । काय करू विचार पांडुरंगे ।।

......

विनवी कान्होपात्रा जोडोनिया हात । आता देह–अंतसमय आला ।।

त्या दुष्ट लोकांनी बेदरच्या बादशहापुढे कान्होपात्राच्या विलोभनीय सौंदर्याचे रसभरित वर्णन केले. या सौंदर्याचे खरे भोक्ते आपणच ! आपला कावा साध्य व्हावा म्हणून त्यांनी असेही सांगितले की ही नायकिणीची मुलगी ! करून सवरून भागली आणि आता देवपूजेला लागली. बादशहाने हे सर्व ऐकल्यावर त्याचे मन विचलित झाले. राजाच तो. पुढची सूत्रे त्याने सहज हालविली. त्या चांडाळांचा सूड उगवण्याचा हेतू साध्य झाला.

बादशहाने कान्होपात्राला घेऊन येण्याची आपल्या सेवकांना आज्ञा दिली.

कान्होपात्रा पुन्हा विवंचनेत पडली. तिने पांडुरंगापाशी धरणे धरले आणि आळवून आळवून, हृदय पिळवटून ती देवाला म्हणाली,

' पतित पावन म्हणसी आधी । तरी का उपाशी भक्तामागे ।।
' पतित तू पावना । म्हणविसी नारायणा ।।

......

तरी सांभाळी वचन । ब्रीद वागविशी जाण ।।
कान्होपात्रा शरण पायी ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बादशहाचे सेवक पंढरपुरात येऊन त्यांनी कान्होपात्राला त्याचा संदेश सांगितला. मुकाट्याने आली तर ठीक, नाही तर बळजबरीने घेऊन जाण्याचा त्या सेवकांचा विचार तिला कळला. काही दिवस त्यांनी पंढरपुरात राहून मौज केली. पण राहणार किती दिवस ? विलंब लागल्यास बादशहाचा राग होईल. म्हणून त्यांनी कान्होपात्राला त्वरित तयार होण्याचा दम भरला.

आता मात्र कान्होपात्राचा धीर सुटत चालला. मोठ्या प्रयत्नाने सांभाळलेल्या पावित्र्याचा चक्काचूर होणार भेसूर हे भविष्य तिला दिसू लागले.

हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले ।
मज लागी जाहले तैसे देवा ।।
तुजविण ठाव न दिसे त्रिभुवनी ।
धावे वो जननी विठाबाई ।।

असे काकुळतेचे उद्‌गार काढून तिने त्या सेवकाजवळ थोडी मुदत मागितली. त्यांनी एक दिवसाची मुदत दिली.

दुसरा दिवस उजाडताच ते देवळात आले. त्यांनी तिला दरडावून बाहेर येण्याचा हुकूम केला.

कान्होपात्राला ते यमदूतच वाटले ! देवाच्या पायावर पुन्हा स्पर्श करण्याकरिता ती गाभाऱ्यात गेली आणि तिने निर्वाणीचा आक्रोश सुरू केला.

‘ नको देवराया अंत पाहू आता ।
प्राण हा सर्वथा फुटो पाहे ।।
......
घेई कान्होपात्रेस हृदयात ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असे म्हणून तिने विठ्ठलाच्या पायाला घट्ट मिठी घातली, त्याचे पाय अश्रूंनी भिजविले आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिथल्या तेथेच विठ्ठलाकडे डोळे लावून कायमची ती ध्यानस्थ झाली ! ती विश्वाच्या विश्वनाथाकडे गेली ! यमयातनेतून सुटली. तिचे पावित्र्य अभंग राहिले. तिचे सोने झाले. ती खरी देवदासी झाली.

संतांच्या मेळाव्यात मानाचे पान मिळवून कान्होपात्रा अजरामर झाली !

□ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रपंच--परमार्थी सावधान असणारे

श्री संत एकनाथ

(त्रोटक जीवनवृत्तांत–एकनाथांचा जन्म शके १४७० मध्ये पैठणला झाला. त्यांच्या वडिलांचे नाव सूर्याजीपंत व आईचे नाव रुक्मिणीबाई असे होते. एकनाथांच्या जन्मकाळी मूळ नक्षत्र होते. आई-वडील लहानपणीच निर्वतल्यामुळे एकनाथांचा सांभाळ त्यांचे आजोबा--चक्रपाणी आजी यांनी केला. एकनाथ लहानपणापासूनच श्रद्धावान तसेच बुद्धिवानही होते. स्नानसंध्या, भजन, कीर्तन, पुराणे इत्यादींची त्यांना भारी आवड. सहाव्या वर्षी त्यांची मुंज झाली आणि विद्याभ्यासास सुरुवात झाली. त्यांची बुद्धि तीव्र असल्यामुळे गुरूने दिलेली संथा त्यांची लवकर पाठ होई. एकनाथांचे सारे लक्ष ईश्वरोपासनेकडेच लागलेले होते. पुढे चमत्कार असा की, त्यांना एक दृष्टांत झाला 'देवगिरीस जनार्दनपंत नावाचे एक सत्पुरुष दत्तोपासक आहेत. त्यांच्याकडे जाऊन त्यांचा उपदेश घ्यावा.' ही देववाणी ऐकून एकनाथांनी मनाचा निश्चय केला आणि एके दिवशी विठ्ठलाचे नाव घेऊन ते तडक देवगिरीला गेले. तेथे एकनाथांनी गुरूंची बारा वर्षे मनोभावे आणि विविध तऱ्हेने सेवा करून त्यांचा अनुग्रह घेतला. जनार्दनस्वामींच्याच कृपेने एकनाथांना श्रीदत्तात्रेयांचे प्रत्यक्ष दर्शन झाले आणि त्यांच्या आशिर्वादानुसार एकनाथ ग्रंथरचना करण्यास उद्युक्त झाले.

गुरूचा उपदेश घेतल्यानंतर एकनाथ पैठणास स्थायिक झाले. येथेच त्यांनी सारे आयुष्य भजन, कीर्तन करून आणि पुराणे सांगून लोकांना

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भक्तीद्वारा मोक्षप्राप्ती करून घेण्याचा सुलभ मार्ग दाखविण्याचे महान कार्य केले. वेदांतासारखा कठीण विषय सामान्य लोकांना नीट कळावा म्हणून एकनाथांनी भागवत या संस्कृत ग्रंथातील एकादश स्कंधावर सुबोध व्याख्याने आणि विस्तृत टीका करून मराठीत 'भागवत' हा ग्रंथ रचला. हा अतिशय लोकप्रिय असून वारकरी संप्रदायात याला ज्ञानेश्वरीप्रमाणेच फार महत्त्व आहे. तसेच भावार्थ रामायण, रुक्मिणीस्वयंवर इ. ग्रंथ त्यांनी लिहिले. एकनाथांनी स्फुट अभंगही पुष्कळ केले. त्यांच्या अभंगांची आणि ओव्यांची संख्या साठ-सत्तर हजारांवर सहज जाईल! शिवाय एकनाथांचे 'भारूड' सुप्रसिद्ध आहे.

एकनाथांच्या अंगी सहनशीलता, भूतदया, परोपकार, उच्चनीचावद्दल समबुद्धि इ. गुण प्रकर्षाने वास करीत होते. प्रपंच व परमार्थ यांचा सुंदर समन्वय एकनाथांनी साधला. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती उपकारे ॥' या उक्तींचे एकनाथ हे उत्तम उदाहरण होय.

एकनाथांना दोन मुली व एक मुलगा अशी अपत्ये झाली. त्यांचा मुलगा हरी हाच पुढे हरिपंडित म्हणून प्रसिद्धीस आला. एकनाथ शके १५२१ मध्ये फाल्गुन व. ६ स समाधिस्थ झाले.)

१. चूक दिडकीची आणि संधी सुवर्णाची!

कुशाग्रबुद्धि, सेवाभाव, निर्मळ वर्तन, धार्मिक आचरण इ. गुणांमुळे एकनाथ जनार्दनपंतांचा पट्टशिष्य बनला होता. एकनाथाने आपल्या विनयशील आणि सेवातत्पर वर्तनामुळे गुरूचा पूर्ण विश्वास संपादन केला होता. जनार्दनपंतांनी एकनाथावर हिशेब ठेवण्याचे जबाबदारीचे काम सोपविले होते. गुरूच्या सेवेत रेसभरहि अंतर पडू न देता एकनाथ नेमून दिलेली कामे मनोभावे करी. एके दिवशी सायंकाळी स्वामींनी दप्तराची तपासणी व्हावयाची आहे, तेव्हां हिशेब तयार ठेव' असे सांगितले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एकानाथाने नित्याची गुरुसेवा करून रात्री हिशेब तपासण्यास सुरुवात केली. नाथाचे अक्षर वळणदार होते. हिशेब तपासतांना जमाखर्चाच्या मेळात फक्त एका दिडकीची चूक दिसून येत होती. त्याने पुन:पुन्हा हिशेब तपासले तरी चूक काही सापडेना. सर्व बेरजा पुन्हा करून पाहिल्या, तसेच तेरीज, ताळेबंद अनेक वेळ करून पाहिले, चूक काही लक्षात येईना. मध्यरात्र उलटून गेली. एकनाथाचा जीव खालवर होऊ लागला. अनेक तऱ्हेचे विचार त्याच्या मनात थैमान घालू लागले.

उद्या आपण उत्तर काय देणार ? गुरूची आपल्यावर वक्रदृष्टि तर होणार नाही ना ? क्रोडो रुपयांची उलाढाल केली, पण आजची एक पैशाची चूक माझा घात करणार की काय ? माझ्या प्रामाणिकपणाला कलंक लागणार ! ' इत्यादि विचारांच्या गोंधळात त्याचे डोळे पाण्याने भरून आले.

तीन प्रहर रात्र होऊन गेली होती. जनार्दनपंतांना एकनाथ जवळपास दिसेना. म्हणून ते उठले, तो एकनाथ अद्याप इतका वेळ पावेतो हिशेब करीत बसलेला त्यांना दिसला. ते हळून त्याच्यामागे जाऊन काही काळ उभे राहिले. एकनाथ वह्यांची पाने चाळत आहे, आकड्यावर नजर फिरवीत आहे, इतक्यात एक आकडा हस्तदोषाने चुकीने मांडला गेलेला त्याच्या डोळ्यात भरला आणि दिडकीची चूक लक्षात आल्याबरोबर त्याने हर्षून मोठ्याने टाळी वाजवली ! आणि आनंदाच्या भरांत चटकन् उठून उभा राहिला ! ! जवळ पाहतो तो स्वामीजी ! एकनाथ फार खजील झाला.

एकनाथाच्या तोंडून सर्व वृत्तांत ऐकल्यावर स्वामींना धन्यता वाटली. त्यांनी एकनाथाला प्रेमाने आपल्याजवळ बसविले आणि सद्गदित अंत:करणाने ते म्हणाले, ' बा एकनाथा ! तुझी सेवा,

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भक्ति, तुझी एकाग्रता, बुद्धि, चातुर्य इ. गुण पाहून मी संतुष्ट झालो आहे. तुला उपदेश करून कानमंत्र देण्याला ही वेळ अत्युत्तम आहे. मी सांगतो ते नीट ऐक. एका दिडकीची चूक काढण्यात तू इतका तल्लीन होऊन गेला होतास की, मी तुझ्या जवळ बराच वेळ उभा होतो तरी तुझे चित्त बिलकुल विचलित

झाले नाही. त्याच एकाग्र चित्ताने द्वैतभावाची घातुक चूक लक्षात घे आणि मनातून ती काढून टाक. या विश्वात जी मायारूप मोठी चूक आहे, तिचे शोधन करण्यास लागणारी एकाग्रता तू धारण कर. जगात चाललेल्या मायेच्या खेळाचे योग्य आकलन करून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घेतलेस की, ज्याच्याकरिता तू एवढी जिवाची धडपड करीत आहेस तो ब्रह्मानंद फार दूर नाही. गृहस्थाश्रमात राहूनहि प्रपंच व परमार्थ ह्या दोन्ही गोष्टी साधता येतात आणि जीवन्मुक्त होता येते. यथाशक्ति दुःखितांचे दुःख कमी कर. अज्ञानी लोकांना सन्मार्ग दाखव. परोपकारांत सतत देह झिजवून जीविताची सार्थकता कर. तुझ्या गुरुसेवेचा काळ आज संपला. या तपाची परिपूर्णता प्रत्यक्ष दत्तदर्शनाने होईल आणि तेहि तुला लवकरच घडेल...'

वरील उपदेशामृताचे घुटके घेतांना एकनाथाचे अंतःकरण आनंदाने ओतप्रोत भरून गेले असल्यास नवल नाही. शेवटी गुरूंना साष्टांग दंडवत घालून कृतार्थ झाल्याचा सात्त्विक आनंद एकनाथाच्या चेहऱ्यावर दिसू लागला.

२. एकनाथ सेनापति बनतात !!

देवळावरील आपल्या देवघरात जनार्दनमहाराज समाधि लावून बसले होते आणि एकनाथ बाहेर पहारा करीत होते. एकाएकी अचानकपणे दौलताबाद शहराला शत्रूच्या सैन्याने वेढा दिल्यामुळे गडावर हलकल्लोळ उडाला. पातशहाकडून 'एकदम शत्रूवर चाल करून जावे' असा तातडीचा निरोप घेऊन एक स्वार जनार्दनपंतांकडे घाईघाईने आला. एकनाथांपुढे मोठा पेच निर्माण झाला. स्वामी चिंतनात गुंतलेले आणि त्यांच्या समाधीचा भंग होऊ नये ही इच्छा आणि पातशहाचा हुकूम तर तातडीचा. विचार करण्यास तर बिलकुल वेळ नाही. तोफांचे भयंकर आवाज कानी पडत होते. गडावर धावपळ सुरू झाली. एकनाथांनी मनाशी निर्णय घेतला. जनार्दनपंतांच्या पोषाखाकडे त्यांचे लक्ष गेले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लगेच पायांत तुमान चढविली, अंगात चिलखत सरसावले, डोक्यावर मंदिल फडकाविला, ढाल तलवार घेतली आणि मनांत म्हणाले, ' काय वाटेल ते होवो. यश येवो अगर न येवो, दोन्ही गोष्टी सारख्याच. यश आल्यास स्वामीजींच्या यशाच्या नौबती चहूंकडे झडतील आणि रणांगणी मरण आल्यास देहाचीं सार्थकता होईल. ' असा थोर विचार करून घोड्यावर स्वार होऊन ते गडावरून खाली उतरले.

खाली येऊन पाहतात तो शत्रूचा तोफखाना शहराचा तट उडवीत आहे असे दृश्य त्यांना दिसले. शहरातील लोक हवालदिल झाले आहेत. आपल्या पातशहाचे सैन्य खडे आणि ते सेनापतीच्या हुकुमाची वाट पहात आहे. एकनाथांनी शत्रूवर एकदम तुटून पडण्याबद्दल रणशिंग फुंकले. वेशीचे दरवाजे सताड उघडले गेले आणि सेनापति एकनाथांनी सर्व सैन्यानिशी शत्रूला धडक मारली. तोफांची गोळागोळी झाली. शस्त्रास्त्रांचा खणखणाट उडाला. चार घटका रणकंदन होऊन शत्रूला काढता पाय घ्यावा लागला !! जनार्दनवेषधारी एकनाथांनी शौर्याची कमाल केली आणि जनार्दनपंतांची चहूकडे वाहवा होऊ लागली !

मौज अशी की, जनार्दनपंत व एकनाथ यांच्यात बरेचसे साम्य होते आणि सर्व पोशाख जनार्दनपंतांचा ! अशा रणधुमाळीत सेनापतीच्या चेहऱ्याकडे निरखून बघण्यास वेळ कुणाला असतो? शिवाय एकनाथांनी जनार्दनपंतांची भूमिका इतक्या उत्कृष्ट रीतीने बजावली की कोणाच्याहि मनात कोणत्याहि तऱ्हेची शंका येण्यास कारण नव्हते.

जनार्दनस्वामींची समाधि उतरल्यावर ते बाहेर आले तो त्यांना एक चिठ्ठी पडलेली दिसली. त्यात पुढील मजकूर होता—' शत्रूची धडक. पातशहाकडून तातडीचा हुकूम. आपण ध्यानस्थ. हुकूमाची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अवज्ञा होऊ नये म्हणून हे साहस करीत आहे. क्षमा असावी...' हा मजकूर वाचल्यानंतर स्वामीजी अगदी थक्क होऊन गेले. आपल्या शिष्याची समयसूचकता आणि धाष्टर्य पाहून त्यांना धन्यता वाटली.

थोड्याच वेळात रणवीर एकनाथ गडावर आले आणि त्यांनी स्वामींना शिरसावंदन केले. दोघांची दृष्टादृष्ट झाली, पण दोघांच्याहि तोंडातून शब्द फुटेना ! त्यांचे अंत:करण भरून आले होते. नंतर स्वामींनी आपल्या शिष्याचे कौतुक करून त्याची पाठ थोपटली. शिष्याला यापेक्षा गौरवास्पद अशी दुसरी गोष्ट कोणती ?

३. तरी सुद्धा एकनाथ रागावले नाहीत !

एकनाथ नित्यनिमाने गंगेवर स्नानास जात, पण त्यांच्या वाटेवर उभा राहून एक यवन त्यांच्यावर पिचकारी टाकी ! पुन्हा नाथांनी गंगेवर जावे आणि शुद्ध व स्वच्छ होऊन यावे आणि यवनाने पुन्हा त्यांच्या अंगावर थुंकावे. एका सत्त्वशील माणसाला वाड्यापासून गंगेवर जाणे, तेथे स्नान करणे आणि परत फिरणे या सर्व गोष्टी पुन:पुन्हा करण्यास किती त्रास पडत असेल याची तो फिकीर कशाला करील ? शिवाय कुचेष्टा कोणाची व कां करावयाची हा विचार नाही. हे थुंकण्याचे प्रकार नेहमी होत आणि नाथांना अनेक वेळा गंगेवर स्नान करून यावे लागे. नाथ एकदाही त्याला चकार शब्द बोलले नाहीत. किंवा त्याच्यावर रागावले नाहीत. त्यांनी आपल्या मनाची शांति ढळू दिली नाही. उलट 'मनोनिग्रह करण्याची किती उत्कृष्ट संधि आहे !' असे त्यांनी मनात म्हणावे. एकदा या यवनाने कमालच केली. कोण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हरतो या जिद्दीने स्नान करून आलेल्या नाथांवर थुंकण्याचा आणि नाथांनी पुन्हा स्नान करून येण्याचा प्रकार एके दिवशी एकशे आठ वेळा घडला म्हणून सांगतात ! तरीसुद्धा एकनाथ रागावले नाहीत ! पण मौज अशी की, हा देखावा पाहण्यास लोकांची तोबा गर्दी ! पण हे दुष्कृत्य थांबविण्याचे धैर्य बघ्यांपैकी एका-

लाहि नसावे ना ? सरते शेवटी तो थुंकणाराच थकला आणि एकनाथ हे कोणीतरी साधुपुरुष असावेत असे त्याला वाटू लागले. कृतकर्माचा त्याला पश्चात्ताप झाला आणि त्याने त्यांची क्षमा मागितली !

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

या यवनाच्या अशा या कृत्यामुळे गंगास्नाने अनेक वेळा घडली हे महत् भाग्य समजले पाहिजे, अशी नाथांची विचारसरणी ! यालाच अलौकिकत्व म्हणावयाचे.

निंदक व छलक यांच्यासंबंधी गौरवपर उद्गार एकनाथ कसे काढतात ते पहा –

निंदा म्हणजे परमामृत । निंदा निर्द्वंद्व सुखस्वार्थ ।।
निंदक न पाहे निजस्वार्थ । अति समर्थ परोपकारी ।।

४. राग आणणाऱ्यास दोनशे रुपयांचे बक्षीस !

एका ब्राह्मणास आपल्या मुलाच्या मुंजीकरिता शेदोनशे रुपयांची गरज होती. पैठण हे प्रसिद्ध क्षेत्र असून तेथे पुष्कळ सुखवस्तू लोक राहतात असे ऐकल्यावरून तो ब्राह्मण पैठणास आला. रात्रीच्या वेळी तो गावात शिरल्यामुळे काही कुटाळ लोकांशीच त्याची प्रथम गाठ पडली. रात्रीची वेळ म्हणजे सर्व टवाळखोर लोक एकत्र जमून गावातील लोकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढीत बसण्याची वेळ. ही त्यांची एक करमणूकच. कुचेष्टेतून कोणतीहि प्रतिष्ठित व्यक्ति सुटणे कठीण. या ब्राह्मणाने आपली गरज सांगितल्यावर टवाळखोरांपैकी एकाला एक विलक्षण कल्पना सुचली. 'बामणबुवा ! तुम्हाला पैसे हवेत ना ?' तो म्हणाला, 'मग आम्ही सांगू ते कराल ?'

ब्राह्मण आशेने फुलला आणि म्हणाला, 'हो, हो. अवश्य करीन. काय करू ?'

'हे पहा, आमच्या गावात एक महासाधु आहे. त्याला राग कधी येत नाही. तो एकदम रागवेल असे जर तुम्ही काही कराल तर तुम्हाला आम्ही दोनशे रुपये बक्षीस देऊ !'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'ही तर सोपी गोष्ट आहे. मी सहज ती करीन.' ब्राह्मण बोलला. टवाळखोरांना करमणुकीची ही नवीन संधि मिळणार आहे म्हणून ते फार खुशीत आले. तेवढीच गंमत ! या लोकांनी त्या ब्राह्मणाला एकनाथांचे घर दाखविले आणि काय काय मौज होते हे बघण्याकरिता ते सारे लोक टपून बसले.

दुसरे दिवशी प्रात:काळी हा ब्राह्मण मोठ्या उमेदीने नाथांच्या घरात शिरला. एकनाथ हे या वेळी आपल्या देवघरात सोवळे नेसून पूजा करण्यात गुंतले होते. ब्राह्मणाला पूजेच्या पवित्र कार्याचे महत्त्व समजत होते, पण आपला हेतु सफल व्हावा म्हणून स्नान वगैरे न करता खांद्यावर पडशी आणि अंगावर तसेच मळके कपडे ठेवून तो ब्राह्मण सरळ देवघरात शिरला आणि एकनाथांच्या मांडीवर जाऊन बसला !

एकनाथ महाराज म्हणजे शांतीचे सागर ! चेहऱ्यावरील प्रसन्नता यत्किंचितही त्यांनी ढळू दिली नाही. थोर महात्मेच ते, ते



Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

थोडेच रागावणार ? उलट हास्यमुखाने ते म्हणाले, 'आपल्या भेटीने मला फार आनंद झाला. पुष्कळ लोक मला भेटायला येतात, पण इतक्या सलगीने क्वचितच कोणी भेटतो ! आपले प्रेम खरोखर विलक्षणच ! धन्य झालो मी आज !'

ब्राह्मण मनात खट्टू झाला. त्याचा हेतु सिद्धीस गेला नाही. पण करायचे काय ? दोनशे रुपयांच्या आशेने पुन्हा एकदा प्रयत्न करावयाचे त्याने ठरविले.

विटाळ झाल्यामुळे नाथांनी पुन्हा स्नान केले. पूजा, जपजाप्य उरकले तो दुपारच्या जेवणाची वेळ झाली. ब्राह्मणाचे पान नाथांनी आपल्या शेजारी घेतले. नाथांच्या पत्नी सर्व वाढप करून अन्नशुद्धि (तूप) वाढण्याकरिता जरा अधिक ओणव्या झाल्या इतक्यात त्या ब्राह्मणाने त्यांच्या पाठीवर टुणकन् उडी मारली ! बरेतर बरे त्या पडल्या नाहीत.

नाथ हसून म्हणतात, 'बरं झालं, तू ब्राह्मणास सावरलेस म्हणून ! नाही तर एखाद वेळी खाली पडला असता तो.'

नाथांचीच पत्नी ती. त्यांच्याइतकीच शांत. ती म्हणाली, 'वा, मी कसा त्याला पाडीन ? हरिपंडिताला (मुलाला) पाठीवर घेऊन काम करण्याची संवय आहे ना मला ! जसा तो, तसेच हे दुसरे बाळ !'

नाथांना आपल्या प्रेमळ पत्नीच्या उत्तराने धन्यता वाटली.

आता मात्र त्या ब्राह्मणाने हात टेकले. मनात तो अतिशय खजिल झाला, शरमला आणि नाथांच्या पायावर त्याने लोटांगण घातले. सर्व हकीगत ब्राह्मणाने सांगिल्यावर नाथ म्हणतात, 'अरेरे ! तुमचे बक्षीस बुडाले ! तुम्ही जर मला ही गोष्ट आधीच सांगितली असती तर मी तुमच्याकरिता खचित रागावलो असतो'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

५. महारांना श्राद्धाचे अन्न !

भूतदया हें...भांडवल संतां...' या उक्तीचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे एकनाथ महाराज. एकनाथांच्या घरी त्यांच्या वडिलांचे श्राद्ध होते. नेहमीप्रमाणे आदल्या दिवशी त्यांनी काही ब्राह्मणांना क्षण दिला होता. स्वयंपाकाची सिद्धता झाली आणि ते द्विजवर्यांची वाट पहात दारात उभे राहिले.

त्याच सुमारास नाथांच्या घराजवळून भुकेलेले असे काही हरिजन चालले होते. घरातील पक्वान्नाच्या पदार्थांचा घमघमाट व सुवास त्यांच्या नाकात भरला. त्यांच्या तोंडाला पाणी सुटले. पण बिचारे आपापसांत बोलत तसेच पुढे चालू लागले. 'पक्वान्नांचा काय घमघमाट सुटला आहे, पण आपल्याला थोडेच ते अन्न मिळणार ? बामण खरे नशिबवान. त्यांना रोज असले जेवण मिळते ! आपण कपाळकरंटे, आपले नशीबच खत्रूड.'

हा संवाद नाथांच्या कानी पडत होता आणि त्यांचा जीव खालवर होत होता, त्यांचे अंत:करण द्रवले ! चित्त व्याकुळ झाले ! त्यांनी मनात थोडा विचार केला आणि लागलीच चार पावले पुढे जाऊन नाथांनी त्या सर्वांना आनंदाने परत बोलावले आणि घरात जाऊन ते पत्नीस म्हणाले, 'अगं, ही मंडळी फार क्षुधित आहेत. स्वयंपाक तयार आहेच. यांना आपण घरातील अन्न वाढू या का ?'

नाथांची पत्नी तितकीच कनवाळू. आपल्या पतीप्रमाणे भूतमात्रावर दया करणे हेच तिचे व्रत. ती म्हणाली, 'त्यांची क्षुधाशांति आपण करू." त्यांच्या बायकामुलांनाहि घेऊन येण्यास त्यांना सांगावे. अन्न पुष्कळ आहे.'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सर्व महारांना यथेच्छ सुग्रास अन्न मिळाल्याने त्यांचे अंतरात्मे शांत झाले. नुसता वास मिळण्याची जेथे पंचाईत तेथे त्यांना पोटभर अन्न मिळाले ! बामणाचे भले चिंतून ती सर्व मंडळी घराकडे गेली.

नंतर नाथांच्या पत्नीने सडासंमार्जन करून अंगण स्वच्छ केले, सर्व भांडी घासून घेतली आणि पहिल्यापासून सगळा स्वयंपाक पुन्हा तयार केला.

क्षण दिलेल्या ब्राह्मणांना बोलावून आणण्यास उद्धवाला सांगितले. ब्राह्मणांना सर्व हकीकत कळलेली होतीच. त्यांनी उद्धवाला सरळ सांगितले –

'तुम्ही भ्रष्टाचार केला आहात. महारांना श्राद्धाचे अन्न प्रथम घालणाऱ्याच्या घरी आम्ही जेवायला येऊ ? कदापि येणार नाही ! तुम्ही बहिष्कृत आहात. तुम्हाला प्रथम प्रायश्चित्त घेतले पाहिजे !'

उद्धवाने हा निरोप नाथांना सांगितला. काही ब्राह्मण तर घरी येऊन नाथांना अद्वातद्वा बोलू लागले. एकनाथांनी सर्वांची बोलणी शांतपणे ऐकून घेतली आणि परोपरीने त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला, पण ब्राह्मणांची माथी अधिकच भडकली आणि जळफळत ते सर्व आपापल्या घरी निघून गेले.

एकनाथ मनात थोडे खिन्न झाले. श्रीखंड्या त्यांच्याजवळच उभा होता. त्याने 'काही काळजी करू नका' म्हणून सांगितले. तो घरात गेला. पाने वाढून तयार झाली. श्रीखंड्याने नाथांना माजघरात बोलाविले आणि 'सुस्वागतम्' असे म्हणावयास सांगून उदक सोडण्यास सांगितले. नाथांनी सुस्वागतम्' असे म्हणताच नाथांची पितरत्रयी आपापल्या पानावर उपस्थित ! ! प्रत्यक्ष पितर वाढलेल्या पानावर बसलेले पाहून नाथांना धन्यता

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वाटली. परम भक्तीने आणि प्रेमभराने त्यांची पूजा केली व स्वत: वाढप करून त्यांना संतुष्ट केले. कशी आहे मौज ! नाथांचे पितृतर्पण खरे खरे झाले ! ब्राह्मणांनी हा चमत्कार प्रत्यक्ष येऊन पाहिला. सारा ब्रह्मवृंद हा अद्‌भुत चमत्कार पाहून खजिल झाला आणि नाथांच्या असामान्यतेबद्दल त्यांना संशय उरला नाही. मग कसले ग्रामण्य ! आणि कसला बहिष्कार !

पण निंदकासंबंधी नाथमहाराज किती उदारतेने बोलतात ते पहा –

यालागीं निंदकचि तत्त्वता । साह्यसखा परमार्थी ॥
त्या निंदकातें निंदिता । दोषी सर्वथा स्वयें होय ॥

६. पत्रावळी खाली पत्रावळी !

एकनाथांचा एकुलता एक मुलगा हरिपंडित केवळ खुळेपणाने आपल्या वडिलांवर रुसून काशीस जाऊन राहिला होता. नाथांनी काशीस जाऊन त्याचे मन वळवून त्याला परत पैठणला आणले. पण त्याच्याकरिता नाथांनी दोन गोष्टी मान्य केल्या. एक म्हणजे त्यांनी प्राकृतातून पुराणे सांगणें थांबविणे आणि दुसरी, परान्न न घेणे.

पैठणात परत आल्यावर नाथांची रसाळ पुराणे बंद झाली आणि त्याऐवजी हरिपंडितांनी संस्कृतातून प्रवचने करण्यास सुरुवात केली. पण मौज अशी की, एकनाथांच्या पुराणाला वाड्यात बसायला जागा मिळण्याची मुष्कील, इतकी तोबा गर्दी ! पण हरिपंडितांच्या प्रवचनाला जे थोडे फार जमत त्यांना बसायला ऐसपैस जागा मिळू लागली ! पुढे पुढे तर हरिपंडितासच वक्ता आणि श्रोता या दोन्ही भूमिका कराव्या लागत ! हरिपंडिताला हा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

फरक लक्षात आला. त्याचा अहंभाव सुद्धा दुखावला. पण 'सुंभ जळले तरी पण पीळ जळत नाही' या म्हणीप्रमाणे त्याच्या ठिकाणचा अहंकाराचा पीळ मात्र कायम होता.

पैठणातील एका बाईने पूर्वी देवाला सहस्रब्राह्मणभोजन घालण्याचा नवस केला होता. पण दुर्दैवाने तिचा पति वारल्याने आणि पुढे दु:स्थिति प्राप्त झाल्याने तिला आपला नवस पुरा करता आला नाही. तरी पण तिच्या मनातील रुखरुख काही कमी होईना.

तिला मन:स्वास्थ्य लाभावे म्हणून एका विद्वान् शास्त्रीबुवांनी असा सल्ला दिला की, एका ब्रह्मनिष्ठ, सत्त्वशील आणि अत्यंत परोपकारी अशा ब्राह्मणास मनोभावे भोजन घातल्यास एक हजार ब्राह्मणांचे पुण्य लागते. त्या बाईपुढे अशा वर्णनाचा ब्राह्मण म्हणजे फक्त एकनाथच उभे राहात. ती मोठ्या उत्सुकतेने नाथांकडे गेली आणि त्यांना आपल्या घरी भोजनास येण्याची तिने आग्रहाची विनंती केली. पण नाथांना हरिपंडितास दिलेल्या वचनानुसार चटकन् होकार देता येईना. पण त्या बाईच्या अत्याग्रहामुळे आणि तिची असहाय्य स्थिति लक्षात घेऊन बापलेकांनी एक तोड काढली. ती अशी की, आमच्या घरचा शिधा घेऊन तेथे पाकसिद्धि करावयाची. आपली मनीषा पूर्ण होत आहे म्हणून त्या बाईला अतिशय आनंद झाला.

नाथ जेवावयास त्या बाईच्या घरी गेले. भोजनोत्तर नाथांनी हरिपंडितास पत्रावळ काढून टाकण्यास सांगितले. हरिपंडिताने पत्रावळ काढून टाकली आणि हात धुवून तो घरात येतो तो पूर्ववत् जागच्या जागी पत्रावळ त्याला दिसली! त्याला मोठे आश्चर्य वाटले, हा काय चमत्कार? दुसऱ्यांदा त्याने ती पत्रावळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काढून टाकली आणि आत येऊन पाहतो तो तेथे पुन्हा पत्रावळ आहेच ! तीहि त्याने काढून टाकली तरी पुन्हा तेथे पत्रावळ आहेच ! अशा रीतीने हरिपंडिताला एक हजार पत्रावळी काढून टाकाव्या लागल्या ! !

बाईला तर हा चमत्कार पाहून आपला नवस पूर्णपणे फिटल्याचे समाधान लाभले.

पण हरिपंडित मात्र मनात खूप खजिल झाला. आपल्या वडिलांचे अलौकिकत्व त्याच्या प्रत्ययास चांगल्या रीतीने आले. त्यांची योग्यता त्यास पूर्णपणे पटली. याचा परिणाम असा झाला की, त्याच्या अंगी असलेल्या अहंकाराचा पूर्ण निरास झाला. वडिलांची आज्ञा हीच शास्त्राज्ञा मानण्याचे त्याने ठरविले.

७. नाथ महाराच्या घरी जेवले !

पैठणांत राण्या नावाचा एक महार रहात असे. तो सदाचरणी व भाविक होता. त्याची बायकोहि त्याच्या प्रमाणेच. ती उभयता नाथांच्या पुराणास, कीर्तनास व भजनास नित्यनेमाने हजर असत. बाहेरूनच नामघोष करीत. एकनाथांवर त्यांची पूर्ण श्रद्धा, त्यांची सेवा करण्यात यांना आनंद वाटे.

' सर्व विश्वात हरि भरून उरला आहे. प्रत्येक प्राणिमात्रात व जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी हरि आहेच. हरिशिवाय रिते काही नाही...असे नाथांचे प्रवचन ऐकल्यावर हे महार जोडपे घरी गेले आणि विचार करू लागले, ' विश्वांत जर हरि भरून राहिला आहे तर तो आपल्याहि अन्तःकरणात आहेच, आपण जन्माने महार असलो म्हणून काय झाले ?'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काही दिवसांनंतर नाथांचे पुराण संपल्यावर राण्याने धीर करून नाथांना विचारले, 'महाराज! आपलं म्हणणं आम्ही ऐकलं. देव सर्वांच्यात आहे. मग तो आमच्यातहि आहे नव्हं का? मग आमच्या घरी एकदा पायधूळ टाकावी ना. फार दिवसांची इच्छा आहे आपण भोजनास यावं म्हणून. आम्ही सगळं अगदी निर्मळ करू बघा.'

राण्या व त्याची बायको फार स्वच्छतेने रहात. हातात खराटे घेतलेले असले तरी त्यांच्या मुखांत सदा विठ्ठलाचे नाव. आपले काम ते सचोटीने करीत. दुष्ट विचार ते कधीच मनात आणीत नसत. जातीने महार, पण शरीराने शुद्ध व मनाने निर्मळ. शुद्धा-चरण व ईश्वरभक्ति या गुणांत तर शेकडो ब्राह्मणांना त्यांनी मागे सारावे अशी त्यांची चालचलणूक.

राण्या महाराचे बोलणे ऐकून नाथांना आनंद वाटला. त्याच्या घरी जेवायला जाण्याचे त्यांनी मान्य केले!

ही गोष्ट साऱ्या गावाला कळली. 'काय हा भ्रष्टाचार! नाथांची धिंडच काढली पाहिजे. चांगले प्रायश्चित्त दिले पाहिजे,' इत्यादि उद्‌गार ढोंगीं, भोंदू, मत्सरी कर्मठांच्या मुखांतून बाहेर पडू लागले. एकनाथांना पकडण्याचे विचार त्यांनी सुरू केले!

ठरलेल्या दिवशी एकनाथ महाराज निर्विकार मनाने राण्या-कडे भोजनास गेले. नवराबायकोनी त्यांची पूजा केली. त्यांच्यापुढे आदराने लोटांगण घातले. नंतर मग रांगोळ्या घालून पाट-पाण्याची सिद्धता केली. नाथ प्रेमाने जेवावयास बसले आणि संतोषाने अन्नपदार्थांचे सेवन करू लागले. नवराबायकोला मोठी धन्यता वाटली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाथ महाराच्या घरात जेवण करीत असतानाच त्यांना पकडावे म्हणून काही लोक टपून बसले होते व काही मंडळी नाथ परत आपल्या घरात पळून जाऊ नयेत म्हणून त्यांच्या घराकडे धावली.



महाराच्या घरात नाथ जेवायला बसलेले डोळ्यांनी पहाताच काही मंडळी घरात शिरणार तोच नाथांच्या घराकडे गेलेली मंडळी येऊन सांगू लागली, 'अहो, नाथ तर आपल्या घरात झोपाळ्यावर बसून उद्धवाबरोबर गप्पागोष्टी करीत आहेत!! तुम्ही येथे कोणाला पकडणार?' हे ऐकून हिकडची मंडळी तर अगदी गारच झाली! आणि धावत धावत जाऊन नाथ खरोखरच आपल्या घरांत बसले आहेत, याची त्यांनी खात्री करून घेतली.

एकाच वेळी दोन ठिकाणी नाथ पाहून त्या सर्वांना आश्चर्य वाटले. पण खरे एकनाथ कोणते हे कोणालाच कळेना. सर्वांचे चेहरे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लज्जेनें खाली पडले. एकनाथ हे ईश्वराचे अवतार आणि ही सारी ईश्वराची लीला असे समजण्याशिवाय गत्यंतरच नव्हते. कसले पकडणे ! आणि कसले प्रायश्चित्त !

समाजकंटक व निंदक यांच्यासंबंधीने उदात्त विचार एकनाथांनी पुढील पद्यांत ग्रथित केले आहेत –

निंदक आमुची काशी। आमुची पातकें अवघी नाशीं ॥
निंदक आमुची गंगा। आमुचीं पातकें नेती भंगा ॥
निंदक आमुचा सखा। आमुची वस्त्रें धुतो फुका ॥

८. पैठणची फाल्गुन वद्य षष्ठी

नाथांच्या जीवनात फाल्गुन वद्य षष्ठीचे फार मोठे महत्त्व आहे. याच तिथीला पाच महत्त्वाच्या घटना घडल्या ही विशेष योगायोगाची गोष्ट आहे. त्या घटना अशा –

१. नाथांचे गुरु जनार्दनस्वामी यांचा जन्म.
२. जनार्दनस्वामींना दत्तदर्शन.
३. जनार्दनस्वामींचा नाथांवर अनुग्रह.
४. जनार्दनस्वामींचे देहावसान.
५. एकनाथमहाराजांचे देहावसान.

पैठणास हा षष्ठीचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर होतो. एकनाथ महाराजांनी प्रथम आपल्या गुरूच्या पुण्यतिथीचा दिवस म्हणून उत्सव करण्यास सुरुवात केली. पुढे मग एकनाथांच्या भक्तांनी त्यांची ही पुण्यतिथि म्हणून तो उत्सव पुढे चालू ठेविला.

□ □ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वैराग्याचा मूर्तिमंत पुतळा

श्री संत तुकाराम

(त्रोटक जीवनवृत्तांत– तुकारामांचा जन्म पुण्यापासून १८ मैलांवरील देहू गावी शके १५३० मध्ये झाला. यांच्या वडिलांचे नाव बोल्होबा व आईचे नाव कनकाई होते. यांना तीन मुलगे – सावजी, तुकाराम व कान्होबा. बोल्होबाकडे देहुगावची 'महाजनकी' असून थोडी सावकारी व शेतीवाडी होती. त्यावर कुटुंबाचा निर्वाह चांगल्या प्रकारे चाले. बोल्होबांची ईश्वर-भक्ति त्यांच्या मुलांत पुरेपूर उतरली. तुकारामांची दोन लग्ने झाली. पहिली बायको दुष्काळात मेली, दुसरी बायको जिजाबाई.

तुकारामांचे वडील वारल्यानंतर संसाराची सर्व जबाबदारी तुकारामांवर पडली. आरंभी तुकारामांनी संसाराचा गाडा नीटपणे हाकला. पण त्यांचे लक्ष विठ्ठलाकडे विशेष लागल्याने संसाराकडे दुर्लक्ष होऊ लागले. उत्पन्न घटत चालल्यामुळे कुटुंबाचे हाल होऊ लागले. त्यांच्या कुटुंबातील काही माणसे दुष्काळात मेल्यामुळे तुकारामांचे लक्ष संसारातून पार उडाले. त्यांचा सर्व काळ जवळच्या डोंगरावर बसून विठ्ठलाच्या चिंतनात जाऊ लागला. पुढे पुढे त्यांना खाणे–पिणेसुद्धा सुचेना. यामुळे जिजाबाई अतिशय खिन्न होई. तरी पण ती आपल्या नवऱ्याच्या खाण्यापिण्याची पतिव्रता-धर्माला अनुसरून नीट काळजी घेई.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुकाराम विठ्ठलभक्त असल्याने वडिलांच्या इच्छेनुसार पंढरीची वारी ते कधीच चुकवीत नसत. सतत भजन वा कीर्तन करण्यात त्यांना अतिशय सुख वाटे आणि त्यातच ते रंगून जात. त्यांनी हजारो अभंग रचले. त्यांचे अभंग अतिशय रसाळ, प्रेमळ व प्रासादिक आहेत. अभंग तुकारामांनीच रचावेत 'अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची' हे उद्‌गार अगदी यथार्थ आहेत त्यांच्या अभंगांची गोडी अवीट आहे. बहुजनसमाजाला भक्तिमार्गाचे महत्त्व त्यांनी पटवून दिले आणि संसारतापाने तापलेल्यांना मनःशांती मिळवून देण्यास भक्तिमार्गच कसा उपयोगी पडणार आहे, याचे सुंदर समर्थन त्यांनी आपल्या अभंगांतून केले आहे. सामान्य जनांचा भक्तिमार्गातच तरणोपाय आहे याचे विवरण करून वारकरी–संप्रदाय त्यांनी चांगलाच वाढीस लागला.

आरंभीच्या काळात त्यांना खूप हाल सोसावे लागले. समाजानेही त्यांना छळण्यास कमी केले नाही. पण त्यांची खरी योग्यता पटल्यावर कित्येक लोक त्यांच्या भजनी लागले. सहृदयता, सत्प्रवृत्ती, समता, परोपकार बुद्धि, मनाचा मोठेपणा आणि तितकीच प्रेमळता त्यांच्या ठिकाणी होती.

तुकाराम महाराजांना तीन मुली व तीन मुलगे अशी सहा अपत्ये झाली. शके १५७१ मध्ये म्हणजे वयाच्या ४१ व्या वर्षी ते वैकुंठवासी झाले.)

१. निघालें माझें दिवाळें, झालें देवाचें वाटोळें !

वडिलांच्या पश्चात् तुकारामांवर संसाराची सर्व जबाबदारी पडली. आरंभी वाण्याचा धंदाहि त्यांचा चांगला चालला होता. संसाराला लागणाऱ्या पैशाची मिळकत ठीक होत होती. पण तुकारामबुवांचे लक्ष या व्यवहारात रमेना. भजन–कीर्तन करावे, पंढरीची वारी करावी आणि मनाला तृप्ति द्यावी, असा त्यांचा कार्यक्रम सुरू झाला. पण याचा परिणाम दुकानदारीवर होऊ लागला. त्यांच्या दुकानातील गिऱ्हाईक कमी होऊ लागले. तेंव्हा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गावातील काही वयस्कर मंडळींनी तुकारामबुवांना अनेक प्रकारे समजाविण्याचा प्रयत्न केला. 'बाबारे, आमचे ऐक. आता भजन, कीर्तन यात जर तू लक्ष घातलेस तर तुला पैसा कसा मिळायचा? तुझा धंदा कसा चालणार? या सर्व गोष्टी तुला बाजूला ठेविल्या पाहिजेत. पंढरीची वारी पुढे नाही का करता येणार?...'

'म्हणजे तुमच म्हणणं, मी पंढरीची वारी सोडावी?' तुकारामाने विचारले.

'होय बाबा, पंढरीची वारी पुढे कर की, नाही कोण म्हणतो...'

'हे कठीण आहे. आपल्याच्यानं व्हायचं नाही ते. सातआठ पिढ्यांतून चालत आलेली पंढरीची वारी मला कशी सोडता येईल? पापाचा धनी होईन ना मी. वाईट दिवसांतच विठ्ठल आपली परीक्षा पाहतो. त्याचे पाय मी कसा सोडू?'

'हे तू आम्हाला शिकवतोस होय?'

'मी कोण आपल्याला शिकविणार? माझा अधिकार नाही तो. आपण सर्व भली माणसं. माझं म्हणणं म्या सांगितलं एवढंच. माझ्याच्यानं पंढरीची वारी मात्र सोडणं व्हायचं नाही.'

'बघ बाबा तुझा तू. बोल्होबाचा मुलगा, मोठा म्हणून आम्हा लोकांना वाटलं की, दोन गोष्टी सांगाव्यात. नाही ऐकलंस तर तुझी मर्जी.'

'बापांनो, रागावू नका मजवर. मी आपला फार फार आभारी आहे.'

सगळे लोक रागावून निघून गेले. आपलं बोलणं हा पोरगा ऐकत नाही म्हणून रागाचं उट्टं काढण्याकरिता त्याला अनेक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रकारे सतावण्याला त्यांनी सुरुवात केली. परिणाम असा की, दुकानातलं गिऱ्हाईक पार हटलं. मिळकत पूज्य, देणेकरी पैसे आणून देईनात, घेणेकरी तगादा लावू लागले. इतकेच नव्हे तर एक दिवस घेणेकरी दुकानातून सामान बाहेर काढू लागले!

टवाळखोरांना तेवढीच झाली गंमत बघायला. त्यांतला एक बोललाच, 'काय महाराज ; काय झालं ? ऐकायचं नाही गावातले लोक सांगतात ते. मग असंच वाटोळं व्हायचं.'

'माझं काय वाटोळं व्हायचं ?' तुकारामांनी विचारले.

'मग कोणाचं ?'

'निघालं माझं दिवाळं. झालं देवाचं वाटोळं!' बुवा बोलले.

दुकानातलं सगळं सामान बाहेर निघालेलं पाहून जिजाईनं कपाळाला हात लावला. ती रागावली, चरफडली. नवऱ्याशी भांडू लागली, पण उपयोग काय ?

तुकारामबुवा शांतपणे आवलीची (बायकोची) समजूत घालू लागले.' अगं, पैसा मिळणं वा न मिळणं या गोष्टी दैवाधीन आहेत. आलिया भोगासी असावे सादर देवावरी भार टाकूनिया.'

जिजाबाईने कितीही त्रागा केला, नवऱ्याला बोलली, तरी ती पतिव्रता होती. धीराची बायको होती. आपल्या वडिलांकडून भांडवल आणून पुन्हा तुकारामांना धंद्याला लावण्याचा तिने चंग बांधला. तिने त्यांच्याकरिता दोनशे रुपये उभे केले. तुकारामांनी मिठाच्या गोणी भरल्या आणि व्यापाराकरिता गेले. दोनशेचे अडीचशे झाले ! तुकारामबुवा परत घराकडे निघाले. वाटेत एका गावात मुक्काम केला. रात्रीच्या वेळी तेथील देवळात बुवांनी भजनाला सुरुवात केली. सुश्राव्य भजन ऐकून गावांतील बरेचसे लोक भजनाला जमले. तेवढाच मनाला विरंगुळा म्हणून कित्येक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दु:खीकष्टी लोक देवळात गोळा झाले. भजनानंतर एक अतिशय दीन, दारिद्र्याने गांजलेला, दुष्काळाने पीडिलेला ब्राह्मण पुढे आला आणि त्याने बुवांच्या पायांवर लोटांगणं घातली आणि दु:खदायक कहाणी सांगितली आणि त्याच्या डोळ्यांतून अश्रूंच्या धारा सुरू झाल्या. कळवळ्याने बोलला 'काय करू आता ? पोरांना काय घालू ? सावकाराने कर्जापायी उभे पीक घेतले !'

तुकारामांना अतिशय गहिंवरून आले. त्यांनी विचारले, 'सावकाराचं किती देणं होतं ? त्याचे पैसे दिले तर पीक देईल का परत ?

'न द्यायला काय झालं, पैसे दिल्यावर ?'

तुकारामांनी आपल्या जवळचे सारे पैसे त्या ब्राह्मणाला देऊन टाकले ! नफा गेला, भांडवल गेले ! तुकारामबुवा रिक्त हस्ते घरी परत आले !

घरी आल्यावर जिजाबाईने केवढा कडकडाट केला असेल याची कल्पनाच केलेली बरी.

२. दिवाळे निघालें, छान झाले ! दुष्काळानें पीडा केली, फारच छान !!

तुकोबांच्या दुकानाचे दिवाळे निघाले आणि लागोलाग दुष्काळाचा वणवा पेटून त्यांच्या कुटुंबाला चांगलीच झळ लागली. या सर्व भीषण परिस्थितीचे तुकाराममहाराजांनी एक प्रकारे स्वागतच केले ! संसाराबावत ते उदासीन होतेच, आणि आता तर त्यांचे मन संसारातून पार उडाले.

आई, बाप, वायको, मुलगा – प्रेमळ माणसे मृत्युमुखी पडली. तुकोबांच्या मनाची काय स्थिती झाली असेल याची कल्पनाहि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करवत नाही. त्यांचे अंतःकरण चिरून गेल्यासारखे झाल्यास नवल नाही.

वैराग्याने त्यांचे मन काबीज केले. पूर्ण विरक्त बनून द्रव्यहानि, अपमान, अवहेलना, दुष्काळ, कुटुंबातील मृत्यूचे थैमान यासंबंधी तुकोबा काय म्हणतात ते पहा –

बाप मेला न कळतां । नव्हती संसाराची चिंता ॥
विठो तुझें माझें राज्य । नाही दुसऱ्याचें काज ॥
बाईल मेली, मुक्त झाली । दैवें माया सोडविली ॥
पोर मेलें, बरें जालें । देवें मायाविरहित केलें ॥
माता गेली मजदेखतां । तुका म्हणे हरली चिंता ॥
बरें झालें देवा निघाले दिवाळे ।
बरी यां दुष्काळें पीडा केली ॥
...
बरें झालें देवा जगी पावलों अपमान ।
बरें गेलें धन ढोरें गुरें ॥
...
दुष्काळे आटिलें द्रव्य नेला मान ।
स्त्री एक अन्न अन्न करितां मेली ॥
...

घट्ट मन करून ते म्हणतात, ' देव एकेक मायापाश तोडत गेला. जग मला निंदत आहे. पदोपदी माझा अपमान करीत आहे. लोक तर मला वेडा म्हणतात. वेडच व्हाव झालं ! म्हणजे भजनसुखाला निश्चितपणा तरी येईल. संसाराच्या तापाने तापून गेलो, अगदी होरपळून गेलो. म्हणूनच देवा ! तुझें पाय आठवले. आता हे पाय कधी सोडणार नाही.

न मिळो खावया ...
परि राहो चित्तीं नारायण ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

३. खतपत्रें बुडविलीं ! आशाबीजे नष्ट झाली !?

तुकारामांना भोवतालच्या एकंदर परिस्थितीने इतके गांजून टाकले की, चित्तवृत्ति शांत करण्याकरिता त्यांना एकान्ताची तीव्र तळमळ भासू लागली. तुकोबा घरांतून बाहेर पडले ते तडक जवळच्या भामनाथाच्या डोंगरावर गेले. तेथे त्यांना एक गुहा दिसली. गुहेत त्यांनी शंभु महादेव पाहिले. जवळच पाण्याची टाकी दिसली. झाडी गर्द होतीच. तुकोबांनी ही जागा पसंत केली आणि तेथेंच मुक्काम करावयाचे त्यांनी ठरविले. शंभु-महादेवापुढे लोटांगण घालून सारा भार देवावर टाकला.

पंधरा दिवस तुकोबा तेथे राहिले. मन शांत केले आणि ईश्वराच्या चिंतनात व नामस्मरणांत त्यांनी हा सगळा काळ घालविला. तुकोबांची येथे इतकी तन्द्री लागली की, त्यांना स्वतःच्या देहाचे भानसुद्धा राहिले नाही. ब्रह्मानंदी लागली टाळी, कोण देहाते सांभाळी अशी त्यांची स्थिती झाली. या पंधरा दिवसांत त्यांच्या भोवती अनेक लहान मोठ्या प्राण्यांनी धिंगाणा घातला, पण त्यांना देहाची जाणीवच नसल्यामुळें त्यांचे अस्तित्व बुवांना भासलेसुद्धा नाही. निर्वाणीचे आसन घालून ते ध्यानस्थ बसले होते ना ! मग देहाची पर्वा काय ?

या काळात त्यांना निराकार विठोबाचा साक्षात्कार झाला. मन अगदी शांत व स्थिर झाले. अन्त:करण सात्त्विक समाधानाने भरून गेले. हृदयांतील ईश्वराची साक्ष पटली. ईश्वर सर्वव्यापी आहे याची जाणीव झाली, सर्वाभूती ईश्वर ही वृत्ति बळाकली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

इकडे पंधरा दिवसपर्यंत तुकोबांचा पत्ता नाही म्हणून जिजाबाईने चहूंकडे शोधाशोधीची पराकाष्ठा केली. तिने अन्नपाणी वर्ज्य केले. तिच्या जिवाची तळमळ वाढत गेली. तिने आपल्या धाकटचा दीराला म्हणजे कान्होबाला त्यांच्या शोधार्थ पाठविले.

शोधता शोधता कान्होबाला भामनाथावरील एका गुहेत आपल्या भावाचे दर्शन झाले. कान्होबांनी आग्रह करून तुकोबांना घरी आणले. जिजाबाईस अत्यंत आनंद झाला. तिने आपल्या पतीची टोचून बोलण्याबद्दल क्षमा मागितली. तुकोबा म्हणाले, 'अग ऽ मी तुझ्यावर का रागावून गेलो होतो ? मुळीच नाही. मी देवाच्या भेटीला गेलो होतो.'

'मग भेटला का देव ?' तिने विचारले.

'अगं, देव दूर नव्हता. माझ्या हृदयातच तो होता ! आत्ता मला त्याची जाणीव झाली.'

दोघांनी मग संतोषाने भाकरी खाल्ली.

नंतर मग तुकोबांनी घरांतील कागदपत्रे गोळा केली. त्यांत गहाणखते, खरेदीखते इ. महत्त्वाचे दस्त–ऐवज होते. हे सर्व दस्तऐवज इंद्रायणीत बुडवून टाकण्याकरिता ते नदीकडे निघाले !

इतक्यात कान्होबा तेथे आले आणि त्यांनी विचारले, 'दादा, काय करता आहात ?'

'अरे, ही खतपत्रे इंद्रायणीच्या डोहात बुडवून टाकतो.'

'दादा, असं का करता ? राहिनात ती आपल्याजवळ ?'

तुकोबा म्हणाले, 'कान्होबा ! असं आहे, दुष्काळ भयंकर ! लोकांना जीव जगविणं कठीण. आजचा दिवस गेला, उद्याचा कसा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0: In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जाईल ही दारुण चिंता ! ! अशा परिस्थितीत कोणाला देणं देता येणार आहे ? मग कशाला आपण त्याची आशा बाळगावयाची ? आणि आपल्या कुळांच्या जिवाला तांत कशाला ? त्यांनाहि निश्चित करू.'

कान्होबाला भावाचे म्हणणे थोडे पटत होते. पण तो पडला व्यवहारी मनुष्य. तो म्हणाला, 'दादा तुम्ही झाला आहात साधु. मला प्रपंच चालवायचा आहे. सावकारी दोघांची ना ? माझा हक्क आहे ना ?'

'अर्थात्.'

'मग तुमच्या वाटयाची खतपत्रे बुडविण्याचा तुम्हाला हक्क आहे. पण एवढा पैका मला बुडवून कसे चालेल ? फार तर मी त्यांना तगादा लावणार नाही.'

'ठीक आहे.' असे म्हणून तुकोबांनी कान्होबाला त्या खतपत्रांचे दोन ढीग करण्यास सांगून कोणताहि एक उचलण्यास त्याला सुचविले.

कान्होबाने आपला वाटा उचलल्यावर दुसरा ढीग तुकोबांनी इंद्रायणीवर नेला. त्याचे एक गाठोडे करून त्यावर एक मोठा दगड बांधला आणि इंद्रायणीत ते उतरले. गंगेची प्रार्थना करून ते म्हणाले, 'गंगामाई, जीव आशेत गुंतून पडायला नको. मोह-पाशांतून मुक्त होण्याकरिता तुला हे अर्पण असो –' असे म्हणून त्यांनी तो जड बोजा खोल प्रवाहात सोडून दिला ! !

४. मत्सरी मंबाजी, उपकारी तुकाराम

देहू गावात तुकोबांच्या घराच्या मागील बाजूस मंबाजी नावाचा एक साधु राहात असे. साधु असला तरी त्याचे वैभव मोठे होते.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याची मोठी बाग, बागेत एक देऊळ, देवळासमोर त्याचे आसन. जटा वाढविलेल्या, कपाळावर शेंदूर फासलेला, अंगावर भस्माचे पट्टे, गळ्यात रुद्राक्षांच्या माळा अशा थाटात या बुवांचा कार्यक्रम चाले. दुरून दिसायला साधु म्हणून पुष्कळ लोक त्याच्या दर्शना-करता येत. त्याच्या अंगात देव येतो अशा भोळ्या समजुतीने गरीब बिचाऱ्या बाया—बापड्या, नाडलेली माणसे, भोळसर भक्त यांची सतत या मठाकडे जा-ये सुरू असे. कुणाला ताईत, कुणाला गंडे, कुणाला भस्म देऊन अशा लोकांना तो फसवी. अज्ञ लोक फसत. पण येथे फुकटात गांजा ओढण्याकरिता मिळतो म्हणून पुष्कळ ढोंगी भक्त कुटाळक्या करण्याकरिता मठात गर्दी करत. लोकांची निंदा करून आपले महत्त्व वाढवावयाचे हा यांचा मुख्य धंदा, पण हा धंदा असा किती दिवस चालणार ?

इकडे तुकाराममहाराजांची भजने, कीर्तने लोकांना मोहित करू लागली. तुकोबा काय ? विरक्त, निरिच्छ, सदाचारी, परोप-कारी, यांचे नामसंकीर्तन सतत चाले. विठ्ठलमंदिरात लोकांची गर्दी!

याचा परिणाम असा की, मंबाजीबुवांचा मठ ओस पडू लागला, त्यांच्याकडे कोणीच जाईना. मंबाजीच्या मनात मत्सराने घर केले आणि तुकोबांच्या नालस्तीला सुरुवात झाली.

मंबाजीने म्हणावे, 'या तुक्याचे हल्ली फारच प्रस्थ माजत चाललं आहे.' दुसऱ्याने दुजोरा देऊन म्हणावे, 'नाही तर काय ? कीर्तन म्हणजे काय ? नाचणे, टाळ कुटणे आणि मोठमोठ्याने किंचाळणे ?'

'या तुक्याचा बंदोबस्त केलाच पाहिजे.' असा विचार करून मंबाजी संधीची वाट पहात होता.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुकारामबुवांच्या विठ्ठलमंदिराच्या प्रदक्षिणेची वाट आणि मंबाजीच्या बागेची हद्द यांमध्ये मंबाजीने चांगला कूड घालून काही काटेरी झाडे लावली होती. एकदा असे घडले की, तुकारामाच्या म्हशीने कुडाला धक्का मारून ती मंबाजीच्या बागेत शिरली आणि निम्मी बाग तिने तुडवून टाकली. प्रदक्षिणेच्या वाटेत काटे पसरले गेले.

दुसऱ्या दिवशी तुकोबा विठ्ठलाचे दर्शन घेऊन प्रदक्षिणा घालायला जातात तो त्यांना वाट बंद दिसली. लोकांची गैरसोय होऊ नये त्यांनी म्हणून वाटेतील काटेरी काठ्या काढून टाकल्या आणि देवळात जाऊन आपल्या भजनास सुरुवात केली.

मंबाजीला ही गोष्ट कळली. तो चवतळला, सैतान बनला. हातांत एक काटेरी फोक घेऊन देवळात शिरला. तोंडाने शिव्याची लाखोली चालूच होती.

'ए ढोंग्या, काठ्या कोणी उपटल्या ?'

'मी. लोकांना प्रदक्षिणेची वाट मोकळी करून ठेवली.' तुकोबा शांतपणे उद्गारले.

'बेशरम ! लाज नाही वाटत ? कुणाला उर्मट उत्तरे देतोस?'

'साधुमहाराज ! मी खरे ते सांगितले. सत्यच बोलावे माणसाने.'

'मला उपदेश करतोस ?' मंबाजीच्या रागाचा पारा वर चढला आणि हातातील फोकाने त्याने तुकारामांना बडविण्यास सुरुवात केली. काट्यांनी त्यांचे अंग रक्तबंबाळ झाले. तरीही त्याचे समाधान होईना, तो बडवीतच राहिला. हात दुखले तेव्हा तो थांबला ! त्याने यथेच्छ बुवांना बडविले.

तोंडाने विठ्ठलाचा जयघोष करीत तुकोबांनी सर्व मार मुकाट्याने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सहन केला. 'सहन करण्याची ताकद दे,' हीच विठ्ठलाजवळ त्यांची प्रार्थना.

बघे लोक असंख्य. पण मंबाजीचा हात आवडायला कोणीच धजेना ! !

तुकोबांच्या शांतीची आणि सहनशक्तीची परीक्षा पाहण्यासाठी मंबाजीरूपी कंस विठ्ठलानेच तयार केला होता. सज्जनांचा भलेपणा दुर्जनांशिवाय जगाला कसा कळणार ?

तुकोबांची ही अवस्था पाहून एका पोराच्या मनात कळवळा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

उत्पन्न झाला. धावत जाऊन त्याने जिजाबाईला बातमी दिली. हातांतले काम टाकून ती माउली गर्जतच देवळात आली. तिला पाहताच मंबाजीने मागच्या मागेच पाय काढता घेतला.

तुकोबा खांबाला टेकून विव्हळत, पण भजनात दंग ! जिजाईला सर्व हकीकत कळल्यावर तिने लोकांची चांगलीच हजेरी घेतली. 'मेल्यांनो ! तुम्ही काय करीत होता ? इतकं त्यानं मारलन् आणि तुम्ही काय मजा बघत होता ? हात पकडून बोंबलेपर्यंत पिरगळला का नाही त्या ढोंग्याचा ? लोकांना बुडवून नुसता माजला आहे. बघतेच त्याच्याकडे आता. चांगली खेटराने पूजा करते त्याची.'

जिजाईने तुकोबांना उठविले, घरी नेले. औषधपाणी करून त्यांना झोपविले आणि ती घराबाहेर पडली.

'कुठं चाललीस ?' बुवांनी विचारले.

'चालले मंबाजीबुवांची पूजा करायला.' ती उद्गारली.

'नको जाऊस. मी सांगतो ते ऐक जरा' विनवून तुकोबा बोलले. पण हे ऐकायला जिजाई होती कुठे तिथे. ती धावली मठाकडे.

जिजाईला मठात आलेली पाहताच मंबाजी खोलीत गेला आणि आतून कडी लावून बसला ! जिजाबाईची निराशा झाली. तिला शेवटी त्याची वाक्पुष्पांनीच पूजा करावी लागली.

तुकारामांना बरे वाटत नव्हते तरी तसेच उठून ते संध्याकाळी मंबाजीकडे गेले व त्याला साष्टांग दंडवत घालून त्याचे हातपाय रगडीत बसले ! शिवाय त्याच्या मनाला लागेल असे काही एक न बोलता तुकोबा म्हणाले, 'सर्व दोष माझा आहे. आपल्याला फार श्रम पडले. वाईट वाटते. क्षमा असावी ! ! !'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

५. अभंगांच्या वह्या डोहात बुडविल्या !

पुण्यापासून ईशान्येकडे नऊ मैलांवर वाघोली या गावी रामेश्वरभट या नावाचे एक महाविद्वान् ब्राह्मण राहात असत. ते सच्छील, कर्मनिष्ठ आणि म्हणून मोठे धर्माधिकारी होते. मंबाजीने तुकारामाविरुद्ध स्वत:ला काहीच इलाज करता येत नव्हता म्हणून त्यांच्या संबंधीची आगळीक रामेश्वरभटांपर्यंत पोहोचविली. रामेश्वरभटांनी आपले वजन खर्च करून पाटलाकरवी तुकारामाने देहू गाव सोडून जाण्याचा हुकूम त्याच्यावर बजावण्याची व्यवस्था केली. या हुकूमाने तुकाराम महाराज अतिशय खिन्न झाले. ते म्हणतात –

काय खावें आता कोणीकडे जावें ।
गावांत रहावें कवण्या परी ।।
कोपला पाटील गांवांतले लोक ।
आतां मज भीक कोण घाली ।।

अशा बिकट परिस्थितीतून मार्ग काढण्याकरिता तुकोबा रामेश्वरभटांची प्रत्यक्ष भेट घेण्याकरिता वाघोलीस गेले. त्यांच्यापुढे दंडवत घालून तुकोबा म्हणाले, 'मी देहूचा तुकाराम वाणी. आपल्या मार्गदर्शनाची याचना करण्याकरिता आलो आहे.' असे म्हणून भक्तिभावाने नामगजर करून तुकोबांनी कीर्तन करण्यास सुरुवात केली ! स्फूर्तिदेवता त्यांना तत्काळ प्रसन्न झाली आणि त्यांच्या मुखातून रसाळ, प्रासादिक अभंगवाणी अखंडपणे स्रवू लागली. एकंदर वातावरण प्रसन्नतेने आणि पावित्र्याने भारून गेले होते. रसाळ कीर्तन ऐकता ऐकता खुद्द

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रामेश्वरभटांच्या चित्ताची चलबिचल झाली. पण स्वतःला म्हणजे स्वतःच्या मोठेपणाला सावरून घेऊन ते म्हणाले, 'तुझ्या अभंगात श्रुतीचा अर्थ उमटतो. तुला श्रुत्यर्थ बोलण्याचा अधिकार नाही.'

तुकोबा विनवून म्हणाले, 'मी यःकश्चित पामर, म्या पामराने काय बोलावे? पांडुरंगाने आज्ञा केल्यावरून मी हे कवित्व करीत आलो. म्हणून मी नम्रपणे विनवितो की, मी कोण बोलणार? बोलविता धनी वेगळाची. खरोखर त्या विश्वंभरे बोलविले.'

रामेश्वरभटांच्या अंगी त्यांचा अधिकार जागा झाला आणि अधिकाराच्या जोरावर त्यांनी फर्माविले, 'आजपासून तू कवित्व करू नकोस!'

'आपली आज्ञा शिरसावंद्य मान्य करतो. पण आजवर केलेल्या अभंगांचे काय करू?'

क्रोधाविष्ट होऊन रामेश्वरभट उद्‍गारले, 'इंद्रायणीत बुडवून टाक!'

तुकोबांना वाईट वाटले. ते खिन्न झाले. पण करणार काय? आज्ञा मानली पाहिजे. शब्द दिला आहे.

देहूला परत आल्यानंतर अभंगांच्या सर्व वह्या त्यांनी एकत्र केल्या. खाली व वर जड दगड घालून गाठोडे तयार केले! चालले नदीवर बोचके घेऊन!!

वाटेत अनेकांनी त्यांना ते न बुडविण्याबद्दल विनविले. पण तसेच ते पुढे चालले. इंद्रायणी डोहाजवळ येताच ते सारे अभंग डोक्यावर घेऊन डोहात शिरले. डोळ्यांतून अश्रुधारा वहात होत्या. जीव व्याकूळ झाला. शेवटी त्यांनी मन घट्ट केले, विठ्ठलाचा धावा केला आणि ईश्वराची इच्छा म्हणून अभंगांचे बोचके डोहात बुडविले!!!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

उदासवाणे होऊन तुकाराम परत फिरले. लोकांनी दुरुत्तरे केली. तुकोबांनी मनाशी विचार केला, 'मी काय साधले ? लोकांनी फजिती केली, संसारावर मी पाणी सोडले. आता जगायचं कशाला?

हरीची इच्छा. देवा, आता एकच गोष्ट, तुमची जोडी तरी करीन किंवा जीव तरी सोडीन' असे म्हणून देवळासमोरील तुळशी-वृंदावनाशेजारी एका दगडावर त्यांनी आसन ठोकले !

जिजाईने परोपरीने घरी चलण्याची विनवणी केली, पण तुकोबांनी निर्धारच केलेला. ते जागचे हलेनात. तीही विचारी त्यांच्या सन्निध राहू लागली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुकाराममहाराज ईश्वराचा सतत धावा करीत आणि मनातील व्यथा विठ्ठलाला सांगत. अन्नपाण्याशिवाय एका दगडावर बसून राहिले. एक दिवस गेला, दुसरा संपला, तिसरा उगवून मावळला, चौथा, पाचवा... अन् तेरावा दिवस उगवला. तेरा दिवस देव भक्ताची कसोटी पाहात होते. भक्त शुद्धीत तरी कुठे होते? व्याकुळ होऊन ईश्वराचा धावा चालू होता. शेवटी शेवटी ब्रह्मानंदात गुंग. तेरा दिवस अन्नपाणी नाही, हालचालही नाही!

दुष्टांनी विचार केला. 'तुकाराम आता बहुतेक संपला! काही वाईट झाले नाही.'

दुष्ट कळवळले, 'अरेरे, देवाहुनीहि थोर!'

वस्तुत: कोणालाच काही कळले नाही, खऱ्या भक्तापासून देव दूर नसतो ते.

चौदाव्या दिवशी पांडुरंगाने आपल्या प्रेमळ भक्ताला तंद्रीतून जागे केले आणि सगुण रूपात दर्शन घडविले!! अहाहा! पांडुरंगाची मूर्ती पाहून तुकोबांना परमावधीचा आनंद झाला. ते म्हणतात. 'जन्माचे सार्थक झाले. धन्य धन्य मी पांडुरंगा!'

देवांनी सांगितले, 'ते बघ काय आहे ते! आणि काय चमत्कार! वह्या तरंगतांना दिसल्या!! तुकोबांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू घळाघळा ओघळू लागले. लोकांची अन्त:करणे आनंदातिशयाने भरून गेली. चारचौघांनी तात्काळ पाण्यात उड्या टाकून अभंगाचा ठेवा पाण्यावाहेर आणला. कोरडाचा कोरडा!! भक्त मंडळींचा आनंद गगनात मावेना. विठ्ठलाच्या नामगजरात सर्व मंडळी बेहोष होऊन गेली.

कुटिलांची तोडे काळी पडली हे काय सांगायला पाहिजे?

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

६. रामेश्वरभटांचा अहंकार झडला

रामेश्वरभट पुण्यातील नागनाथाच्या दर्शनाकरिता वाघोलीहून निघाले. नागनाथ हे एक जागृत दैवत असून या देवतेवर त्यांचा दृढ विश्वास होता. वाटेत एका विहिरीवर त्यांनी स्नान केले. पण काय चमत्कार! स्नानानंतर एकाएकी त्यांच्या अंगाचा दाह सुरू झाला! सर्व वैद्यकीय उपाय झाले, पण भडका काही थांबेना. तो असह्य होऊ लागला. कोणी म्हणत, 'तुकारामाचा छळ केल्याचे हे प्रायश्चित्त.' पण त्यांना हे कसे पटणार? भडका थांबेना. इलाज सुचेना.

नंतर ते आळंदीला गेले आणि अंगाचा दाह शमावा म्हणून ज्ञानदेव महाराजांच्या चरणी सेवा करीत बसले. ज्ञानोबांना त्यांनी साकडे घातले. थोड्याफार पुण्याईच्या जोरावर ज्ञानोबा त्यांच्या स्वप्नात येऊन त्यांना म्हणाले, 'बाबारे! तू कितीही विद्वान् असलास, कितीही कर्मठपणे वागलास तरी विठ्ठलाच्या सद्भक्तास छळण्याचा तुला काही अधिकार आहे? हेच का ज्ञान तू मिळविलेस? तुकारामाचा तू निष्कारण छळ मांडलास. त्या संताच्या छळामुळेच तुला हे प्रायश्चित्त मिळत आहे, तेव्हा तुला त्या संतांच्याच चरणी शुद्ध मनाने शरण गेले पाहिजे.'

रामेश्वरभटांना खरा पश्चात्ताप होऊन ते तुकारामाची भेट घेण्याकरिता देहूला गेले. तेथे गेल्यावर त्यांना अभंगांच्या वह्यांची हकीकत कळली. बुवांच्या योग्यतेची पूर्ण खात्री पटल्यामुळे त्यांना नम्रपणे आणि शुद्ध मनाने त्यांनी साष्टांग प्रणिपात घातला. आणि क्षमेची याचना केली.

'अहो हे काय? माझा अधिकार नाही हा, मला लाजवू नका?' बुवा बोलले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'नव्हे, नव्हे. माझ्या अपराधाची शिक्षा मला भोगलीच पाहिजे.' रामेश्वरभटांनी उत्तर दिले.

'अहो कसला अपराध आणि कसली शिक्षा ? आपला अधिकार फार मोठा आहे. आपली योग्यता मी जाणतो.'

रामेश्वरभटांनी निरहंकारी बनून कोणतेही किल्मिश मनात न ठेवता सर्व वृत्तांत तुकोबांना निवेदन केला.

तुकोबा क्षमा व शांतीचे सागरच. ते म्हणाले,

'चित्त शुद्ध, तरी शत्रु मित्र होती ।...
विष तें अमृत, आघात ते हित ।...
दु:ख तें देईल, सर्वसुखफळ ।
शीतल होतील अग्निज्वाळा ॥

रामेश्वरांच्या अंगाचा दाह पूर्ण शांत झाला. तुकोबांचे ते शिष्य बनले. एवढेच नव्हे तर कीर्तनप्रसंगी त्यांच्या मागे ते टाळ धरीत !

७. शिवाजीच शिवाजी !

तुकाराममहाराजांची कीर्ती चहूंकडे पसरली. शिवाजी राजांनाही वाटले की, आपल्या हातून त्यांची काहीतरी सेवा व्हावी आणि त्यांचे दर्शन् घडावे. पण राज्यस्थापनेच्या आणि ते संरक्षणाच्या महान कार्यात त्यांना फुरसत मिळणे कठीणच. म्हणून त्यांनी आपल्या काही खास सेवकांबरोबर तुकाराम महाराजाकरिता पालखी, घोडा, जवाहीर, ताट भरून मोहरा इत्यादींचा नजराणा पाठविला आणि त्यांना घेऊन येण्यास सांगितले.

'आम्ही शिवाजीराजांकडून आलो आहोत, आपल्याला घेऊन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जाण्याकरिता. त्यांनी आपल्याला नजराणाही पाठविला आहे. त्याचा स्वीकार व्हावा.' सेवक म्हणाले.

'शिवाजी राजांचे महान् कार्य चालू आहे. त्यांच्याकडून तुम्ही आलात, आनंद वाटला. थोडी विश्रांती घ्यावी.' असे म्हणून तुकोबांनी त्यांना गूळपाणी वगैरे दिले.

थोड्या वेळाने सेवकांनी नजराणा त्यांच्यापुढे ठेविला.

'बाबांनो ! याचा मला काय उपयोग ?'

'सोनें आणि माती । आम्हां समान हें चित्तीं ॥'

पालखी आणली आहात तुम्ही, छान पालखीत बसून मी हिंडू म्हणता ? माझा अवतार, माझा पोषाख पाहिलात ना तुम्ही ?

रोडके हातपाय दिसे अवकळा ।
काय तो सोहळा दर्शनाचा ॥

आणि आमचे दर्शन घेऊन काय फायदा ? त्यांना म्हणावे, पंढरीरायाचे दर्शन घ्या. विठ्ठलाचे नाव घेत रहा. तेणेच आम्ही सुखी...

तुकाराममहाराजांच्या निरिच्छपणाचे आणि प्रखर वैराग्य-वृत्तीचे त्या सेवकांना फार नवल वाटले. सर्व नजराणा घेऊन ती मंडळी परतली आणि त्यांनी शिवाजी महाराजांना संदेश कळविला.

तुकाराममहाराजाचे दर्शन घेण्याकरिता आपणच स्वतः जावे असा शिवरायांनी विचार केला आणि पुण्याजवळील लोहगावी ते गेले. शिवाजीराजांनी तुकोबांची गाठ घेऊन मोठ्या आदराने आणि नम्रभावाने त्यांच्या पायांवर डोके ठेविले. बुवांनी प्रेमाने त्यांना आलिंगन देऊन विचारपूस केली. तुकाराम महाराजांचे कीर्तन ऐकण्याकरिता शिवाजीराजांनी त्या रात्री तेथेच मुक्काम केला. रात्रीचे कीर्तन ऐकून शिवरायांचे मन भारावून गेले. त्यांची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वृत्ती पालटली आणि वेगळेच विचार त्यांच्या मनात उद्भवू लागले. त्यांना लोहगावी तुकोबांचे कीर्तन ऐकण्याचा छंद जडला. रात्री कीर्तन ऐकावे आणि पहाटेस पुण्याला परतावे असा त्यांचा कार्यक्रम ठरूनच गेल्यासारखा झाला.

शिवबाच्या अशा वागणुकीमुळे स्वराज्याचे महान् मंगल कार्य सोडून ते संतसमागमातच दंग होतात की काय, अशी जिजाबाईंच्या मनात भीती उभी राहिली आणि म्हणूनच त्या स्वतः कीर्तनाला हजर राहू लागल्या. या वेळी बुवांनी परमार्थावर लक्ष खिळवून क्षात्रधर्म आणि राजधर्म या संबंधीची कर्तव्ये कशी पार पाडता येतात, याचे सुंदर निरूपण करून शिवबांना त्यांनी कर्तव्यसन्मुख केले.

शिवबाच्या या कीर्तनकार्यक्रमाची खबर लागताच शिवबांना पकडण्यासाठी- टेहळणीवर असलेल्या हजार पठाणांनीं पाळत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ठेवून मंदिराला वेढा दिला. ! शिवबांना ही गोष्ट कळली. थोडे चिंतातूर झाले ते. त्यांनी तुकोबांकडे टक लावून पाहिले. दृष्टादृष्टीने सर्व व्यवहार एकमेकांना कळला. तुकोबांना वाटले, ' राजा आपल्या कीर्तनाला मनोभावे येऊन बसला असता राजावर संकट यावे ही गोष्ट बरी नाही. स्वराज्याचा संस्थापक, गोब्राह्मणप्रतिपालक, हिंदुधर्माचा संरक्षक आणि अशावर संकट ? छे ! छे ! छे !' असे मनात म्हणून पांडुरंगाचे चिंतन करून तुकोबांनी त्याच्या नावाचा गगनभेदी गजर सुरू केला. त्यातच लोक बाहेर पडू लागले, पण काय चमत्कार ? जो मनुष्य बाहेर पडेल तो 'शिवाजी !' पठाणांना सारे शिवाजीच दिसू लागले. असे हजार 'शिवाजी' बाहेर पडले !! चहूकडे शिवाजीच शिवाजी !! पकडायचे कोणाला ही विवंचना प्रत्येक पठाणाला पडली आणि अशा धावपळीत खरे शिवाजीराजे केव्हा आणि कसे बाहेर पडून पसार झाले हे कळले देखील नाही कोणाला. तुकोबांच्या पुण्यप्रतापाने आणि शिवबांच्या सावधगिरीने त्यांच्यावर आलेले विघ्न टळले.

८. होन अदृश्य झाला !

तुकारामांच्या एका शिष्याने आपला काशीस जाण्याचा बेत त्यांना सांगितला आणि हस्ते परहस्ते थोड्या मदतीची अपेक्षा केली. तुकोबांनी आपल्या बैठकीखालून एक होन काढून दिला आणि म्हणाले, ' हा होन मोडून तुला लागणारे सामान तू घेऊन जा. फक्त एक गोष्ट लक्षात ठेव की, त्यातील एक दिडकी शिल्लक ठेवीत जा. दुसरे दिवशी या दिडकीचा पुन्हा होन होईल ! असे करीत राहिलास म्हणजे तुला काही कमी पडावयाचे नाही. निश्चित जा.'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तो गृहस्थ घरी गेला आणि या चमत्काराची प्रचीती बघण्याकरिता त्याने होन मोडला. एक दिडकी शिल्लक ठेवून बाकी पैशांतून लागणारे सामान विकत आणले. दुसरा दिवस उजाडताच त्या दिडकीचा खरोखर होन झाल्याचे त्याच्या दृष्टोत्पत्तीस आले. त्याला अतिशय आनंद झाला आणि बुवांच्या सामर्थ्याची प्रचीती आली.

तुकाराममहाराजांचा आशीर्वाद घेण्याकरिता तो ब्राह्मण त्यांच्याकडे गेला. बुवांनी होनाची गोष्ट कोणाजवळही बोलू नकोस असे सांगून त्याच्या बरोबर भागीरथी, काशीविश्वेश्वर व विष्णुपद यांच्या प्रार्थनेचे तीन अभंगही दिले. 'तुझी इच्छा पूर्ण होईल.' असा आशीर्वाद देऊन त्यास वाट धरण्यास सांगितले.

दिलेल्या होनाच्या आधारावर त्याची सर्व यात्रा निर्विघ्नपणे पार पडली. गुरुमाउलीच्या कृपाप्रसादाने आपली मनीषा पूर्ण झाल्याबद्दल त्याचे मन अगदी उल्हसित झाले. यात्रेची सर्व हकीकत सांगण्याकरिता त्याने बुवांची ताबडतोब गाठ घेतली. त्यांना नम्रपणे वंदन करून सर्व वृत्तान्त सांगितला. पण होनाचा लोभ सुटेना, म्हणून त्याने होन हरवल्याचे खोटेच सांगितले.

'काही हरकत नाही, हरवू दे.' तुकोबा हसत उद्गारले. घरी गेल्यावर तो होन अेकदा पहावा म्हणून धोतराची गाठ सोडून पाहू लागला तो होन दिसेना ! होन अदृश्य झाला ! पण त्याचे मन चरकले. खोटे बोलल्याचा हा परिणाम म्हणून तो तत्काल बुवांकडे गेला आणि पश्चात्तापपूर्वक त्याने क्षमा मागितली. बुवांच्या सिद्धिसामर्थ्याचा चांगलाच पडताळा आला. 'लोभाच्या पोटी पाप' म्हणतात. ते अगदी खरे आहे.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

९. तुकोबा चालले विमानातून

तुकोबांनी मनाचा निर्धार केला. ते एककल्ली वनू लागले· मनात आले की, चालले भंडाऱ्या डोंगरावर. तेथे तासन् तास चिंतनात आणि अभंगकीर्तनात दंग. अशा वेळी त्यांना कशाचीही शुद्ध नसावयाची. दृष्टि वर लागायची, वैकुंठ दिसायचा, आपले आपणच आनंदात मग्न असावयाचे. वृत्ती तल्लीन होऊन जायची. इहलोकचे भान हरपून जायचे, असा सततचा वैकुंठवास म्हणून वृत्ती उल्हसित व्हायची. 'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळा' या दिव्य दृश्याच्या दर्शनाने चित्त रंगून गेले. जन्ममरणाच्या फेऱ्यांतून कायमचे मुक्त झाल्याची खात्री वाटू लागली. 'साकरेचा नव्हे ऊस। आम्हा कैसा गर्भवास ?॥' जेथून आलो तेथेच जावयाचे. तेथे सगळा आनंदच आनंद !

आनंदाचे डोहीं आनंद तरंग।
आनंदचि अंग आनंदाचे ॥

अशा रीतीने तुकोबांची वैकुंठाला जाण्याची तळमळ वाढू लागली. त्यांनी बायकोला, मुलाला, मुलीला विचारले, "मी जाणार आहे वैकुंठाला, येणार का तुम्ही माझ्याबरोबर ?'

बायको म्हणाली, 'अहो मी कसली येते. मला वेळ तरी आहे का ? माझी म्हैस व्यायची आहे ना ?'

मुलगा बोलला, 'अजून माझी आंघोळ तरी कुठं झाली आहे?'

मुलीने सांगितले, 'मी कशी येऊ ? मामंजींनी मला होळीचा सण संपताच घरी बोलावलं आहे.'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'पहा वरं, नाही तर म्हणाल कीं आम्हाला का नाही विचारलं म्हणून.' — तुकोबा बोलले.

थोडक्यात, प्रत्येकाने काहीतरी सांगून बुवांबरोबर वैकुंठाला जाण्यास नकार दिला.

'बाबा आपली गंमत करताहेत, कोण नेताहे त्यांना वैकुंठाला?' असे प्रत्येकाला वाटले.

फाल्गुन वद्य द्वितीयेचा दिवस उजाडला. सकाळपासून त्यांच्या जिवाची तळमळ वाढत होती. दुपारी आपल्या भजनी-मंडळासह तुकोबा गोपाळपुऱ्यात गेले. तुकोबांनी या वेळी नामसंकीर्तन भक्तीची पराकाष्ठा केली. भक्तमंडळ प्रेमामृताच्या आकंठ भोजनानें अगदी तृप्त झाले. तुकोबा स्वत:लाच विसरून गेले. त्यांची दृष्टी वर लागली. महामंगल क्षणाची आतुरतेने ते वाट पहात होते.

त्याची पथें माझें लागलेसें चित्त । वाट पाहे नित्य माहेराची ॥
तुका म्हणे आता येतील न्यावया । अंगें आपुलिया मायबाप ॥

कोण हा दाण्डगा आत्मविश्वास ! क्षणाक्षणाने उत्कंठा वाढू लागली. सर्व प्रेमी जनांचा शेवटचा निरोप घेतला. चुकल्या-माकल्याबद्दल सर्वांची क्षमा मागितली आणि म्हणाले,

'आम्ही जातो आमुच्या गावां ।
आमुचा रामराम घ्यावा ॥'

असे म्हणताक्षणीच त्यांना श्री विष्णूचे आगमन दिसू लागले !

पैल आले हरि । शंखचक्र शोभे करी ॥
गरुड येतो फडात्कारें । 'ना भी ना भी' म्हणे त्वरें ॥
मुगुट कुंडलाच्या दीप्ति । तेजें लोपला गभस्ती ।
चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ॥
तुका झालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठपीठ ॥"

इतके बोलतात तो तुकाराममहाराज दिसेनासे झाले ! गुप्त झाले !! श्रीविष्णूंसह सदेह वैकुंठाला गेले !!!

तीन शतके होऊन गेली तरी त्यांच्या कीर्तीचा सुगंध महाराष्ट्रात सर्वत्र दरवळत आहे आणि तसाच तो दरवळत राहणार.

□ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

महाराष्ट्रात नवचैतन्य निर्माण करणारे

श्री संत रामदास

(त्रोटक जीवनवृत्तांत – श्रीसमर्थ रामदासांचा जन्म शके १५३० मध्ये रामनवमीच्या मुहूर्तावर जांब गावी झाला. त्यांचे पाळण्यातले नाव नारायण असे होते. नारायणाच्या थोरल्या भावाचे नाव गंगाधर होते. यांचे वडील सूर्याजीपंत व आई राणूबाई. नारायण लहानपणापासूनच निकोप व सुदृढ होता. लहानपणापासूनच त्याचा ओढा वैराग्याकडे असे. कथा, कीर्तन, पुराणे यांची त्याला फार आवड. नारायणाची पाचव्या वर्षी मुंज झाल्यानंतर थोड्याच दिवसांनी त्याचे वडील वारले. नारायणाची बुद्धी फार तीव्र होती. पाठांतर लवकर होई. आठवे वर्षी त्याच्या लग्नाचा विचार चालू झाला. पण लग्न न लागताच नारायण लग्नमंडपातून पळून गेला. जांब गावाहून गोदावरीच्या काठाकाठाने नासिकजवळच्या पंचवटीस आला. तेथे त्याने बारा वर्षे 'श्रीराम जय राम जय जय राम' या मंत्राचे पुरश्चरण (तप) केले. नारायण रामभक्त असल्याने लोक त्याला रामदास असे म्हणू लागले. या रामदासाने पुढील बारा वर्षे तीर्थयात्रेत घालविली. या काळात त्यांनी एकंदर सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचे नीट अवलोकन केले. महाराष्ट्रांत यावेळी चोहीकडे मांद्य व नैराश्य यांचे वातावरण पसरले होते. रामदासांनी आपल्या उपदेशाने लोकांत नवचैतन्य निर्माण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

केले. त्यांना धीट बनविले. पुढे शिवाजी महाराजांच्या आग्रहावरून त्यांनी परळीच्या किल्ल्यावर वास्तव्य करण्याचे ठरविले. याच किल्ल्याला सज्जनगड म्हणतात. रामदासांच्या अलौकिक कर्तृत्वामुळे त्यांना 'समर्थ रामदास' असे म्हणण्यात येऊ लागले. शिवाजीमहाराज समर्थ रामदासांची अनेक वेळा भेट घेत. शिवबांची इतकी भक्ति समर्थांवर जडली की, महाराजांनी राज्यत्याग करून समर्थांची सेवा करण्यात काळ घालविण्याचे ठरविले. पण समर्थांनी त्यांना तसे करू दिले नाही. समर्थांचा सल्ला शिवबा शिरसावंद्य मानीत.

तीर्थयात्रा केल्यानंतर रामदास आपल्या आईस भेटण्याकरिता जांब येथे आले. बराच काळ लोटलेला असल्यामुळे नारायणाची (रामदासांची) ओळख पटण्यास थोडा अवधी लागला. नारायण भेटल्यामुळे आईला व थोरल्या बंधूंना अतिशय आनंद झाला. रामदास आपल्या बंधूंना 'श्रेष्ठ' असे म्हणत. त्यांची योग्यताही तशीच होती. 'श्रेष्ठांच्या' पश्चात् त्यांच्या मुलांची काळजी रामदासांनीच वाहिली.

शिवाजीमहाराजांनी स्वराज्याची स्थापना केली, ते वाढविले. या सर्व गोष्टी रामदासांना प्रत्यक्ष पहावयास मिळाल्याने त्यांना फार आनंद होई. गोब्राह्मणप्रतिपालक म्हणून शिवाजीची ख्याती सर्वत्र पसरली. शिवाजीच्या कर्तृत्वामुळे रामदासांना मोठी धन्यता वाटे. शिवाजी राजांच्या मृत्युनंतर थोड्याच दिवसांनी म्हणजे शके १६०३ माघ व. ९ ला श्रीसमर्थ रामदासांनी आपले अवतारकार्य संपवून मानवी देहाचे सार्थक केले. समर्थांचा 'दासबोध' हा एक महान् ग्रंथ आहे. समाजातील सर्व थरांच्या लोकांना या ग्रंथाने व्यावहारिक भूमिकेवरून मार्गदर्शन केले आहे. या ग्रंथांतील शिकवण सर्वांना उपयोगी पडणारी आहे.)

१. नारायण खरोखरचा 'सावधान' झाला !

थोरल्या मुलाचे लग्न झाल्यावर नारायणाचेही लग्न उरकून घ्यावे म्हणून राणूबाई वधू पाहू लागल्या. शेवटी एक मुलगी निश्चित करण्यात आली. पण नारायणाला लग्नच करावयाचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नव्हते. त्याच्या आईने त्याला पुष्कळ समजुतीच्या गोष्टी सांगितल्या. शेवटी आईने निक्षून विचारले, 'आईची आज्ञा तुला ऐकावयाची आहे की नाही ?'

नारायणाने उत्तर दिले, 'आई, तुझी आज्ञा मी ऐकणार नाही असे कधीतरी होईल का ? पण तुझी आज्ञा सांग ना.'

आई मनात आनंदून म्हणाली, 'नारायणा, माझी इच्छा आहे की, अंतरपाट धरून 'सावधान' म्हणेपर्यंत तू काही गडबड करू नकोस.'

आईच्या मनात आशा फुलली. लग्नाची तयारी जोरात सुरू झाली. नारायणानेही मनाची तयारी करून ठेविली. लग्नतिथीच्या पूर्वीचे सर्व कार्यक्रम यथाविधी उरकण्यात आले. लग्नघटिका भरण्याच्या सुमारास दोघांमध्ये अंतरपाट धरण्यात आला. ब्राह्मणांनी 'सावधान' म्हणून मंगलाष्टके म्हणण्यास तारस्वराने सुरुवात केली.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'सावधान' म्हणजे काय हो?' नारायणाने ब्राह्मणांना विचारले.

'आता तुमच्या पायात संसाराची बेडी पडणार! तेव्हां तुम्हाला सावध रहावे लागणार. संसाराची जबाबदारी तुम्हाला घ्यावी लागणार म्हणून 'सावधान' असा इशारा आहे.' ब्राह्मणांनी उत्तर दिले.

'बरे केलेत, ते सांगितले म्हणून.' नारायण म्हणाला आणि त्याने खरोखरीच सावधगिरी बाळगली. दुसराही विचार त्याने केला. आईला दिलेल्या वचनाचा शब्दश: अर्थ त्याने मनात लावला आणि वचन मोडण्याचेही पाप आपल्याला लागणार नाही अशी मनाशी खूणगाठ बांधली.

ब्राह्मणांनी पुन: पुन्हा 'सावधान, सावधान' म्हणताच नारायणाने धूम ठोकली आणि तो वाट फुटेल तिकडे पळत सुटला! नवरा मुलगा पळाला!! लग्नसमारंभात गोंधळ उडाला. जो तो आपल्यापरीने त्याला शोधण्याचा प्रयत्न करीत होता. पण सारे प्रयत्न निष्फळ! लग्न लागले नाही. लग्नघरात खिन्नतेचे साम्राज्य पसरले. राणूबाई मनात अतिशय कष्टी झाली, शोकाकुल झाली. पण करणार काय? तिची समजूत कोण आणि कशी घालणार?

नारायणाचे वय या वेळी अवघे अकरा वर्षांचे होते! एवढ्या वयात त्याने केवढा विचार केला!!

२. नारायण 'रामदास' कसे झाले?

लग्नमंडपातून नारायण जो पळाला तो गोदावरीच्या काठा-काठाने पंचवटीस येऊन पोहोचला. वय अकरा वर्षांचे, बरोबर माहीतगार कोणी नाही, प्रखर आत्मविश्वास आणि स्वावलंबन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

यावर सारी भिस्त. या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे नारायणाच्या धडाडी वृत्तीचा आचंबा वाटतो. एवढ्या वयात ईश्वरोपासनेची लागलेली तळमळ पाम्हिली म्हणजे मन थक्क होऊन जाते, मती गुंग होते.

पंचवटीस आल्यावर त्याने प्रथमतः प्रभुरामचंद्राचे दर्शन घेतले आणि हेच आपले उपास्यदैवत त्याने ठरविले. येथून जवळच असलेल्या टाकळी या खेडेगावातील एका गुहेत त्याने वास्तव्य करण्याचे ठरविले आणि येथेच पुरश्चरणास सुरुवात केली. 'श्रीराम जयराम जयजयराम' या त्रयोदशी अक्षरांचा मंत्र जपण्यास सुरुवात केली. तेरा कोटी जप करण्याचा त्याने संकल्प केला. प्रातःकाळी उठावे, स्नानसंध्या उरकावी आणि नंतर गंगेच्या पाण्यात उभे राहून दोनप्रहरपर्यंत जप करीत राहावे. असा त्याचा नित्याचा कार्यक्रम असे. पाण्यात उभे असताना त्याला तेथील मासे डसत, पण त्याची पर्वा त्याने कधीच केली नाही. पुरश्चरण झाल्यावर मधुकरी मागावी, त्याचा नैवेद्य रामचंद्राला दाखवावा आणि जरूरीपुरते अन्नसेवन करावे. संध्याकाळी श्रीरामचंद्राचे भजन करावे. अशा रीतीने बारा वर्षे नारायणबुवांनी पुरश्चरण केले, या कडक तपश्चर्येच्या जोरावर त्यांनीं श्रीरामाला वश करून घेतले. श्रीरामाच्या कृपेचे अधिष्ठान त्यांनी मिळविले. त्यांच्या वाणीला तेज चढले. शब्दाला किंमत आली. आशीर्वाद मोलाचे ठरू लागले. ऋद्धी व सिद्धी या दोन देवता त्यांच्यापुढे हात जोडून उभ्या राहिल्या.

विरक्त वृत्तीने राहून तपश्चर्येत सारा वेळ खर्च करणारे आणि रामाचे सेवक म्हणून नारायण हे त्यांचे नाव मागे पडून लोक त्यांना 'रामदास' म्हणू लागले. अशा रीतीने नारायण रामदास बनले!

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

३. आशीर्वाद याच जन्माचा आहे !

टाकळीपासून दोन मैलांवर दशपंचक म्हणून एक गाव आहे. तेथे गिरिधरपंत कुलकर्णी नावाचा एक मातब्बर तरुण ब्राह्मण राहात असे. पोटी संतान नसल्याने त्याची चिंता वाढत जाऊन पुढे त्याला क्षयरोगाने पछाडले. औषधोपचार पुष्कळ झाले, पण ते सारे निष्फळ ठरले आणि त्यातच त्याचा अंत झाला. त्याची बायको महापतिव्रता. तिने सहगमन करण्याचे ठरविले. टाकळी येथील संगमाजवळ अंत्यविधीकरिता ते प्रेत आणण्यात आले.

अर्थातच त्याची स्त्री कपाळास मळवट भरून आणि सौभाग्यालंकार लेवून प्रेतामागून चालत होती. सहगमनाची सर्व व्यवस्था झाल्यावर त्याच वेळी रामदासस्वामी तेथे आल्याने त्यांना वंदन करण्याकरिता ती त्यांच्याजवळ गेली आणि तिने त्यांना मोठ्या आदराने आणि भक्तिभावाने नमस्कार केला. सुवासिनी स्त्री नमस्कार करीत आहे असे पाहून नेहमीच्या रीतिरिवाजाप्रमाणे स्वामींनी तिला ‘अष्टपुत्रा सौभाग्यवती भव’ – असा आशीर्वाद दिला. आशीर्वाद ऐकताच तिने त्याही परिस्थितीत थोडे स्मित करून विचारले, ‘या जन्मी तर आता शक्य नाही ! पण पुढील कोणत्या जन्मी आपला आशीर्वाद फलदायी ठरणार ?’ हा प्रश्न ऐकून स्वामीजी बुचकळ्यात पडले. पण थोड्याच वेळात सारा प्रकार त्यांच्या लक्षात आला की, या बाईचा पती मृत असून ती सती जाण्याकरिता येथे आलेली आहे !

स्वामींनी विचार केला की, आपला आशीर्वाद फोल ठरता कामा नये. नाही तर आपल्या शब्दाला महत्त्व ते काय राहणार ? म्हणूनच त्यांनी मनातल्या मनात प्रभू रामचंद्राचे चिंतन करून

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रार्थना केली, 'हे प्रभो, तुझ्याशिवाय मला या पेचांतून दुसरे कोण मुक्त करणार ? भक्तांचा सखा तू माझी उपेक्षा कशी करशील?' असे म्हणून ते प्रेताजवळ गेले. भगवंताचे नाव घेऊन त्या प्रेतावर त्यांनी गंगोदक शिंपडले आणि त्याला उद्देशून ते म्हणाले, 'अजून किती वेळ निजणार रे बाबा ? ऊठ की आता.' असे म्हणताच ते प्रेत तत्काळ सजीव झाले आणि 'राम राम' म्हणत त्याने जागेपण दाखविले ! ! ताटीवरील बन्ध तोडताच गिरिधरपंत उठून उभे राहिले. स्वामींना त्यांनी मनोभावे लवून नमस्कार केला.

त्या पतिव्रतेकडे पाहून स्वामी बोलले, 'बाई, आशीर्वाद याच जन्मीचा आहे ! सुखाने नांदा बरं. तुम्हाला आठ अपत्ये तर होतीलच पण आणखी दोन अधिक होतील !'

या दांपत्याला यथाकाल दहा पुत्र झाले आणि यांच्या घराण्यास

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'दशपुत्रे' हे आडनाव रूढ झाले ! कुलकर्ण्यांचे दशपुत्रे झाले ! !

यांनी आपला पहिला पुत्र उद्धव स्वामींच्या सेवेकरिता दिला. स्वामींच्या प्रमुख शिष्यांत याची गणना होते.

४. अंबाजीचा कल्याण झाला !

अंबाजीच्या वडिलांनी संन्यास घेतल्यामुळे तो कोल्हापूर येथे आपल्या मामाच्या घरी राहावयास गेला. तेथे समर्थांचा मुक्काम होता. समर्थांनी या मुलाच्या हालचालीकडे बारकाईने लक्ष ठेविले. त्यांच्या मनात तो भरला आणि त्याच्या आईजवळ त्यांनी त्याची मागणी केली. अंबाजीस घेऊन समर्थ मसूर या गावी आले. तेथे त्यांनी अंबाजीची परीक्षा घेतली. समर्थांनी अंबाजीस बोलावून सांगितले, ' बाळ, ही कुऱ्हाड घे आणि या झाडाची ती फांदी तोड. '

अंबाजीने समर्थांना नमस्कार केला आणि कुऱ्हाड घेऊन तो सरसर झाडावर चढला. तो फांदी तोडायला बसल्यावर समर्थ सांगतात, ' अरे, तू शेंड्याकडे बसून ती फांदी तोड. '

अंबाजीने गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानून मागलापुढला विचार काहीएक न करता शेंड्याकडे बसून तो फांदी तोडू लागला ! अर्थात् याचा जो काय परिणाम व्हावयाचा तो झाला. फांदी तुटताच फांदीसह तो खालच्या विहिरीत पडला ! समर्थांनी तिकडे काही वेळ बुद्धयाच लक्ष दिले नाही.

इकडे त्याच्या आईचा म्हणजे आक्काचा जीव खालवर होऊ लागला. पण समर्थांना सांगणार कोण ? शेवटी धीर करून तिने समर्थांना मुलाला वर काढण्यासंबंधी विनविले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

' अंबाजी मेला काय ?' समर्थ विचारतात.

' बराच वेळ झाला. त्याची काही हालचाल दिसत नाही !' चिंताक्रांत होऊन आक्का म्हणाली.

समर्थ विहिरीजवळ गेले आणि आत डोकावून अंबाजीस म्हणाले, ' कायरे बाबा, कसं काय आहे ?'

' आपल्या कृपेने कल्याण आहे, ' अंबाजी बोलला.

' मग वर ये ना. ' समर्थांनी आज्ञा केली.

वर आल्यावर समर्थांना त्याने साष्टांग नमस्कार घातला. एवढ्या लहान वयात अंबाजीची गुरुनिष्ठा कसास लागली. विहिरीत असताना अंबाजीने ' कल्याण ' म्हटल्यावरून समर्थांनी त्यास कल्याण म्हणण्यास सुरुवात केली. साखर वाटून हा नामकरण विधी समर्थांनी केला. अशा रीतीने अंबाजी ' कल्याण ' झाला, पुढे कल्याणस्वामी बनले ! आणि समर्थांचे पट्टशिष्यत्व त्यांनी मिळविले ! ! समर्थांच्या करटावर इलाज करणारे हेच ते कल्याणस्वामी.

५. मूर्ति हलेनात !

रामनवमीच्या उत्सवाकरिता एक स्वतंत्र मंदिर बांधून त्यात श्रीरामाच्या मूर्तीची स्थापना करावी असे समर्थांच्या मनात येताच त्यांनी एका उत्तम मूर्तिकारास बोलावून त्यास चार मूर्ती करण्यास सांगितले. त्याने एक वर्षाची मुदत मागून घेतली.

मध्यंतरी अशी एक घटना घडली की समर्थ कऱ्हाडहून निघून रहिमतपूर जवळील अंगापूरच्या रानात आले आणि तेथे ध्यानस्थ बसले असता त्यांना एक दृष्टान्त झाला. तो असा की—

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

'श्रीरामनवमीच्या उत्सवाकरिता ज्या ध्यानाची मूर्ती तुम्हास हवी आहे तशी मूर्ति या कृष्णेच्या डोहात आहे.' समर्थांनी लागलीच डोहात उडी मारली. त्यांना तेथे दोन मूर्ती मिळाल्या. एक प्रभू रामचंद्राची व दुसरी महिषासुरमर्दिनीची. समर्थांना खूप आनंद झाला. त्यांनी त्या मूर्ती आपल्या झोळीत घातल्या व ते चाफळास निघाले.

पण हा सर्व प्रकार तेथील जवळपासच्या गुराख्यांनी पाहिलेला होता. त्या गुराख्यांनी गावात जाऊन ही बातमी पसरवली. अंगापूरच्या लोकांनी समर्थांना गाठून मूर्तींची मागणी केली. समर्थांनी अर्थातच 'ठीक आहे. घेऊन चला; म्हणून त्या मूर्ती झोळीतून काढून खाली ठेविल्या आणि ते पुढे चालू लागले.

गावकऱ्यांनी ठरविले की, या मूर्ती वाजतगाजत गावात घेऊन जाऊन त्यांची यथायोग्य रीतीने स्थापना करावी. मिरवणुकीची सगळी तयारी केली. गाडा सजवून आणला आणि मूर्ती उचलू लागले. पण काय चमत्कार? मूर्ती जागच्या हलेनातच! त्या इतक्या जड झाल्या की पन्नास जवान लोकांनाही त्या हलेनात!! हा काही विलक्षण प्रकार आहे असे समजून त्यांतील काही लोक चाफळला गेले आणि समर्थांना त्या मूर्ती घेऊन जाण्यास सांगितले. समर्थांनी काहीं शिष्य पाठवून त्या आणवल्या आणि त्यांनी त्यांची स्थापना केली.

६. समर्थांकरिता वाघिणीचे दूध!

समर्थ रामदासांची प्रकृती बिघडून त्यांना पोटदुखीची व्यथा जडली. पोटदुखीने ते कित्येक वेळा व्याकुळ होत आणि दुःख असह्य होई. या रोगावर त्यांना औषध माहीत होते, पण ते मिळविणे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अतिशय कठीण होते. हे औषध म्हणजे वाघिणीचे दूध ! पण हे कोण आणणार ? वाघिणीचे दूध मिळविणे ही गोष्ट सोपी नाही. वाघाचे नाव काढताच लोकांची घाबरगुंडी होते हे आपण पाहातोच. मग वाघिणीला पकडायचे, तिच्या स्तनाला हात घालावयाचा आणि दूध पिळावयाचे !! हे साहसी कृत्य कोण करणार ?

असा विचार समर्थ करीत आहेत तोच शिवाजी महाराजांची स्वारी समर्थांच्या दर्शनास आली. महाराजांनी विचारले, 'आपण फार व्याकुळ दिसता, कोणती व्यथा आपल्याला पीडा देत आहे?'

समर्थांनी आपली व्यथा सांतितली आणि त्यावर माहीत असलेले औषधही सांगितले. आणि ते म्हणाले, 'बाबारे, हे वाघिणीचे दूध कोण मिळवणार ?'

'हे दूध मिळविणे खरोखर कठीण आहे, सोपी गोष्ट नाही.' महाराज उद्‌गारले.

विव्हळत्या स्थितीतच दोघांचे संभाषण अनेक विषयांवर झाले आणि समर्थांचा आशिर्वाद घेऊन महाराज तेथून निघाले. समर्थांची अवस्था पाहून महाराजांनाही वाईट वाटले आणि ते मनात म्हणाले, 'मला वाघिणीचे दूध मिळवता आले तर ? माझ्या हातून समर्थांची मोठी सेवा घडेल, स्वतःला मी धन्य समजेन. पाहूया एखादी वाघीण दिसली तर.' असे विचार मनांत घोळवीत महाराज गडावरुन खाली उतरले. बरोबरच्या मंडळींना परत पाठवून ते एकटेच वाघिणीच्या शोधार्थ रानात शिरले.

समर्थ रामदासांनी अंतर्ज्ञानाने शिवाजीच्या मनातील विचार जाणले आणि 'धन्य माझा शिवबा !' असे धन्योद्‌गार त्यांच्या मुखातून बाहेर पडले. शिष्याच्या अंत:करणात गुरुविषयी नितांत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आदर आणि गुरूच्या अंत:करणात सच्छिष्याबद्दल अकृत्रिम प्रेम ! अशी गुरुशिष्याची जोडी खरोखरच विरळा. समर्थांनी आपल्या शिष्याची तीव्र मनीषा पुरी करण्याचे ठरविले.

इकडे शिवाजी महाराज रानात शिरले ती वेळ संध्याकाळची होती. सूर्य अस्तास जात होता. पक्षी घरट्याकडे परत फिरत होते. अंधार वाढत चालला. हिंस्र प्राण्यांची हालचाल सुरू झाली. इतक्यात एका जाळीतील वाघिणीची हालचाल शिवाजी महाराजाच्या दृष्टीस पडली; तिची पिले स्तनपान करीत होती, महाराजांनी हे दृश्य पाहताच त्यांना आनंद झाला, पण सामना वाघिणीशी आहे हे जाणून ते त्वरित सावध झाले; घोड्यावरून ते खाली उतरले, म्यानातून तलवार त्यांनी उपसली आणि पाठमोऱ्या उभ्या असलेल्या वाघिणीच्या दिशेने सावधपणे आणि धिटाईने आपली पावले टाकण्यास सुरुवात केली. काही पावले

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जाताच वाघिणीची व महाराजांची दृष्टादृष्ट झाली. वाघिणीचे अक्राळविक्राळ स्वरूप पाहून सामान्य माणसाची बोबडीच वळली असती. महाराजांनी आपली तळपती तलवार सरसावली. वाघीणही ती तळपती तलवार पाहून कदाचित मनात चरकली असेल. महाराज तिच्या अगदी जवळ गेले आणि तिचा कान आपल्या हातात बळकट धरला. पिल्लाला काखेत दाबून धरले, शेला खाली पसरला आणि पाहिजे तेवढे दूध पिळून घेतले ! ! पिल्लांना नंतर मोकळे सोडले, शेल्यात दूध घेऊन जरा बाजूला सरले आणि आपली कृष्णा घोडी आजूबाजूला पाहू लागले.

इतक्यात मोठा चमत्कार त्यांना दिसला. वाघिणीच्या ठिकाणी प्रत्यक्ष समर्थांची मूर्ती त्यांना दिसली ! !

शिवबांनी सर्व प्रकार ओळखला. त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले आणि समर्थांच्या जवळ जाऊन त्यांनी मोठ्या आदराने त्यांना अभिवादन केले.

समर्थांनी शिवबाला प्रेमाने आलिंगन देऊन त्याची पाठ थोपटली आणि ते उद्‌गारले, ‘ खरोखर धन्य आहे तुझी, माझ्याकरिता तू आपला जीव धोक्यात घालीत होतास. पण असे करीत जाऊ नकोस. लाखो लोकांचा तू पोशिंदा आहेस. शिवाय मराठी राज्याची सर्व मदार तुझ्यावर आहे हे ध्यानात ठेव.’

७. समर्थांच्या झोळीत राज्याचे दान !

शिवाजी महाराजांचे गुरू श्रीसमर्थ रामदास. रामदासस्वामींना शिवबाच्या कर्तृत्वाचा फार मोठा अभिमान आणि आनंद वाटे. त्यांनी शिवबाला अनेक बाबतींत आणि अनेक विषयांसंबंधी योग्य

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मार्गदर्शन केले. शिवबाही तितकेच थोर. आपल्या गुरूचा शब्द त्यांनी कधीच खाली पडू दिला नाही. त्यांची सेवा करण्यात आणि त्यांचा अनुग्रह घेण्यास शिवबा जितके आतुर तितक्याच उत्कंठेने स्वामींनी त्यांना परावृत्त करावे आणि राजधर्माच्या कर्तव्याला सन्मुख करावे. एकाने धार्मिक जागृतीचे कार्य केले, तर दुसऱ्याने गुलामगिरीच्या जड शृंखला तोडून राजकीय क्षेत्रात महान् कामगिरी केली! कोणत्याही सत्कार्याला अधिष्ठान पाहिजे परमेश्वराचे. शिवबा आणि समर्थ ही गुरुशिष्यांची जोडी खरोखर अपूर्वच म्हटली पाहिजे. तीर्थक्षेत्रे हिंडता हिंडता समर्थांनी एकंदर लोकांच्या स्थितीचे बारकाईने निरीक्षण केले होते. सामाजिक दुःस्थिती पाहून समर्थांचे मन कळवळून येई. गुलामगिरीचे जोखड दूर करून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवण्यात शिवबाने फार धिटाई केली होती. दोघांची कार्यक्षेत्रे एकमेकाला पूरकच अशीच होती. महान् कार्याला आरंभ करतांना शिवबांनी समर्थांच्या चरणी जावयाचे आणि स्वामींनी आशीर्वाद देऊन त्याला कार्यप्रवृत्त करावयाचे.

शिवबांनी अनेक वेळा 'मजकडून काही तरी सेवा घ्यावी' म्हणून आवर्जून म्हणावे आणि स्वामींनी 'तुझा स्वराज्याचा उद्योग ही आमची सेवाच आहे' असे उत्तर द्यावे.

एकदा शिवाजी महाराजांचा मुक्काम साताऱ्यात आणि याच वेळी समर्थांचा मुक्काम माहुलीला होता. दुपारचे वेळी स्वामीजी आपल्या शिष्यांसह भिक्षा मागत मागत राजवाड्यात आले. आपल्या खड्या स्वरात 'उपासनेला दृढ चालवावे। भूदेव संतासि सदा लवावे।'... हा श्लोक म्हणून 'जय जय रघुवीर समर्थ' अशी घोषणा केली. शिवाजीराजांनी त्यांच्या झोळीत एक चिठ्ठी टाकली आणि आदरपूर्वक वंदन करून ते उभे राहिले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

‘ शिवबा, माझ्या झोळीत धान्य न टाकता ही चिठ्ठी कसली टाकली आहेस ?’ समर्थांनी विचारले.

‘ महाराज ! आपण झोळी पुढे केलीत आणि त्यात मी भिक्षा घातली ’ शिवबाने उत्तर दिले.

‘ उद्धवा, ती चिठ्ठी वाच पाहू. ’

उद्धव चिठ्ठी वाचूं लागला. ‘ आजपर्यंत जेवढे राज्य मी मिळविले ते सर्व स्वामीस अर्पण असो. ’

स्वामी म्हणतात, ‘ शिवबा ! ही राज्याची भिक्षा मला घालून तू काय करणार ?’

‘ आपल्याजवळ सतत राहून आपली सेवा करणार !’ शिवबा उत्तरले.

ठीक आहे. तुझी इच्छा. चल आमच्याबरोबर. ’ असे म्हणून भिक्षेची झोळी नवीन भिक्षेकऱ्याच्या खांद्यावर टाकली. दहापाच घरे भिक्षा मागून पाण्याच्या ठिकाणी मुक्काम केला. मिळालेल्या पिठाच्या पानग्या बनवून सर्वांनी खाल्ल्या..

‘ आमच्याबरोबर येण्याने काय सुख लागते ते समजले ?’ स्वामींनी विचारले.

‘याच सुखाकरिता मी आसुसलेला आहे.’ शिवबाने उत्तर दिले.

हे उत्तर ऐकून स्वामींचे अंत:करण प्रेमातिशयाने भरून आले ! त्यांना फार संतोष वाटला. नंतर ते आज्ञेच्या स्वरात म्हणाले,

‘ शिवबा हे राज्य आम्ही का चालवणार ? ते तू सांभाळ आणि चालीव, ते चांगल्या रीतीने सांभाळण्यातच आमची सेवा आहे. स्वराज्य नुसते मिळवून चालणार नाही. त्याचा नीट सांभाळ करून प्रजेला सर्वतोपरी सुख लागेल असा कारभार होणे अवश्य आहे. क्षत्रियांनी पराक्रम करून राज्याला बळकटी आणावी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आणि सच्छील ब्राह्मणांनी तपःसामर्थ्याच्या जोरावर राज्याचे व राजाचे हित सतत चिंतावे, ब्राह्मणांना वैभवाची लालसा लागली आणि क्षत्रियांनी ब्राह्मण होण्याची हाव वाळगली की राज्याचा डोलारा केव्हा कोलमडेल याचा नियम नाही...'

आपली आज्ञा मला मान्य आहे. पण माझी एक विनंती आपण मान्य करावीच. आपल्या पादुका मला द्याव्यात म्हणजे मला वरं वाटेल त्यांच्या नावाने मी राज्य चालवीन आणि स्वामित्वाची खूण म्हणून मराठी राज्याचे निशाण भगव्या रंगाचे ठेवण्यास अनुमती द्यावी.'

स्वामीनी या दोन्ही गोष्टीस मान्यता दिली. शिवाजी महाराजांनाही आनंद वाटला. या वेळेपासून मराठ्यांचा झेंडा भगव्या रंगाचा झाला.

८. तिच्या मुखी पाणी कोण घाली ?

आम्ही काय कुणाचे खातो । तो राम आम्हांला देतो ।।

□ □

पाषाणाचे पोटी बैसला दर्दुर । तयामुखी चारा कोण घाली ।।

स्वराज्याचा विस्तार आणि भरभराट होत असतांना त्याच्या संरक्षणाचीही तितकीच खबरदारी घेणे जरूर असते. जुन्या किल्ल्यांची दुरुस्ती आणि नवीन किल्ल्यांची बांधणी याकडे शिवाजीमहाराजांचे लक्ष असे. या धोरणाला अनुसरून त्यांनी करवीर प्रांतात सामानगड या नावाचा किल्ला बांधण्यास सुरुवात केली. किल्ल्याच्या तटापुढे एक स्वयंभु स्थान होते. त्या ठिकाणी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

किल्ल्यावरून जाता यावे म्हणून रस्त्याचे काम सुरू होते. कामाची पाहाणी करण्याकरिता खुद्द महाराज त्या ठिकाणी गेले. हजारो माणसे तेथे काम करीत असलेली पाहून 'किती लोकांचा मी पोशिंदा आहे !' असा अहंकाराचा विचार महाराजांच्या मनाला चाटून गेला.

समर्थांना ही गोष्ट अंतर्ज्ञानाने समजली. शिवबाच्या मनात असा विचार येणे योग्य नाही. त्याच्या अंगी दुर्गुणाचा लेशही असू नये ही स्वामींची तळमळ. अंगी अहंकार चढला की मनुष्य घसरगुंडीला लागलाच म्हणून समजावे. तेव्हा वेळीच शिवबाला सावध करावे या हेतूने समर्थ अकस्मात गडावर अवतरले ! सर्वांची धावपळ सुरू झाली. लोकांना आश्चर्य वाटले. शिवाजी महाराज पुढे होऊन त्यांनी समर्थांना लवून अभिवादन केले आणि विचारले, 'आज अचानकपणे इकडे येणे झाले ?'

समर्थ म्हणाले, 'सहज आलो तुझ्या या किल्ल्याचा कारखाना पाहण्यास.' शिवबांना आनंद झाला आणि दोघे हिंडता हिंडता वाटेत एक मोठा धोंडा तसाच ठेवलेला त्यांना दिसला. 'हा असा मध्येच का ?' स्वामींनी विचारले.

'सगळा रस्ता तयार झाल्यावर हा मोठा दगड फोडावा असा विचार आहे,' शिवबांनी उत्तर दिले.

'छे ! छे ! हाताबरोबर करून टाकणे चांगले, पुढे ते होत नाही.' असे स्वामीजी बोलल्यावरून शिवबांनी पाथरवाट बोलावून तो दगड फोडून रस्ता मोकळा करण्यास आज्ञा केली. दगड फोडण्याचे काम चालू असता हे दोघे तेथेच उभे होते. स्वामींनी दगड फोडणाऱ्याला तो कसा फोडावयाचा याबद्दल सूचना दिल्या. शेवटी नारळाएवढा दगड राहिल्यावर त्याला नारळाप्रमाणेच त्याची दोन शकले काळजीपूर्वक करण्यास सांगितले. दोन शकले

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होताच नारळाप्रमाणे आतील भाग पोकळ असून त्यात पाणी व त्यातच एक जिवंत बेडकी दिसली !!! महाराजांनी, स्वामींनी व इतर सर्वांनी हा चमत्कार पाहून आश्चर्य व्यक्त केले.

स्वामी महाराजांना उद्देशून म्हणाले, ' शिवबा, काय ही तुझी करामत ? पहा, या दगडात छोटासा खळगा, बेडकीकरिता पाणी, तिच्या पोषणाची काय सुंदर व्यवस्था केली आहेस ? तुझ्याशिवाय ही दुसरा कोण करू शकणार ?'

हे उपरोधिक भाषण ऐकून शिवबा मनात चरकलेच. काहीतरी आपले चुकले आहे असे समजून शिवबांनी स्वामींना हात जोडून विनंती केली, ' महाराज, मी अजाण आहे. माझ्या हातून अपराध

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

झाला असल्यास मला क्षमा असावी.' हे बोलताना महाराजांचा गळा दाटून आला.

शिवबाची ही स्थिती पाहून स्वामींनाही दया आली. त्याच्या अंगात शिरलेले अहंकाराचे वारे निघून गेलेले पाहून स्वामींना संतोष वाटला.

ते म्हणाले, ' बाबारे, आपण केवळ कारणीभूत. परमेश्वर आपल्या हातून लाखो माणसांना अन्न देववितो, एवढेच. तुझ्या मनात मीपणाचा भाव निर्माण झाला. तो केव्हाही हितावह नाही, ही गोष्ट समजविण्याकरिताच मी येथे आलो होतो. माझे काम झाले. मी जातो आता.'

पण शिवबांनी त्यांना भोजनाचा आग्रह केल्यावरून स्वामीजी आनंदाने थांबले.

९. हिवताप छाटीत कोंडला !

समर्थ एकदा हिवतापाने आजारी पडले. याच वेळी शिवाजी महाराज त्यांच्या दर्शनास आले. दोघांच्या भेटी म्हणजे महत्त्वाच्या विषयाची चर्चा. समर्थांनी उपदेशाच्या दोन गोष्टी सांगाव्यात, मार्गदर्शन करावे आणि महाराजांनी देहाचे कान करून तिकडे लक्ष द्यावे.

आजच्या भेटीपुरती तरी हिवतापाचीं उपाधी, नको, मनमोकळेपणाने शिवबाशी बोलता यावे म्हणून समर्थांनी आपली छाटी काढली, त्यात हिवताप भरला आणि ती आपल्या उशाशीच ठेवून दिली. ती छाटी अर्थात् हिव भरल्याप्रमाणे धडधडत होती ! !

शिवबांनी हे आश्चर्यकारक दृश्य पाहून जवळच असलेल्या कल्याणस्वामींना विचारले, ' हे काय ?'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कल्याणस्वामी म्हणाले, 'समर्थांना चार–पाच दिवस हिवताप येतो आहे. पण आपल्याशी बोलण्यात त्याचा व्यत्यय येऊ नये म्हणून हिवताप समर्थांनी छातीत कोंडून ठेविला आहे आणि त्यामुळेच ती हुडहुडी भरल्यासारखी कापत आहे!'

समर्थांना उद्देशून शिवबांनी विचारले, 'आपल्या ठिकाणी एवढे सामर्थ्य असताना ही शारीरिक उपाधी कशी?'

'शिवबा, कर्मभोग कोणालाही चुकविता येणार नाही. तो भोगलाच पाहिजे. तो भोगून संपवायचा असतो.' समर्थांनी उत्तर दिले.

१०. समर्थांचे गोड करट !

समर्थांना आपले अवतारकार्य संपले असे वाटू लागले. शेवटी शेवटी त्यांचे वास्तव्य सज्जनगडावरच असे. त्यांना कशाचीच कमतरता नसे. शिष्यगणही बराच मोठा होता. समर्थांच्या पंक्तीला दोनशे शिष्यांची हजेरी लागे. अर्थात् सर्वच शिष्य सारख्याच योग्यतेचे असणे शक्य नाही. तरी पण प्रत्येकजण आपली निष्ठा श्रेष्ठ असे दाखवीत असे.

समर्थांच्या मनात एकदा शिष्यांची परीक्षा पाहण्याचे आले. त्यांनी एक युक्ती योजली.

महाराजांकडून त्यांना उत्तमपैकी गोमंतकी आंबे भेट म्हणून आले होते. त्यांपैकी एक त्यांनी आपल्या पायाच्या पोटरीस बांधून त्यावरून फडके बांधले. पोटरीला करट झाले आहे अशी उत्तम बतावणी करून ते विव्हळू लागले. वेदना असह्य होत आहेत असे भासवून मोठ्याने ओरडू लागले. ती वेळ मध्यरात्रीची होती. समर्थांचे कण्हणे ऐकून सर्व शिष्य तत्परतेने त्यांच्याभोवती जमा झाले आणि 'काय होत आहे?' अशी पृच्छा करू लागले.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

समर्थ विव्हळून सांगतात, 'काय करावे वेदना असह्य होत आहेत. पोटरीला एक करट झाले आणि ते रात्री आंब्याएवढे मोठे झाले. ठणका फार लागला आहे.'

शिष्यांनी विचारले, 'यावर इलाज नाही का काही ?'

'आहे, पण तो सांगून काय उपयोग ? करणार कोण ?' समर्थ म्हणाले. 'अस का म्हणता आपण ? आम्ही एवढे असतांना आपल्याला चिंता कां ? उपाय सांगा, आम्ही तो करण्याची पराकाष्ठा करू. प्राणाचीहि पर्वा करणार नाही.'

'तुमचा आग्रह आहे तर सांगतो. उपाय जहाल आहे. हे करट कोणीतरी मनुष्याने अगदी चोखून चोखून त्याची सूज कमी करावयाची. या उपायाने मी वाचेन, पण यात धोका असा की, चोखणारा कदाचित् मरेल !'

हा इलाज ऐकताच एकेकाने मुकाट्याने काढता पाय घेतला ! ! शिष्य जाऊ लागलेले पहाताच समर्थ गमतीने पण मोठमोठ्याने विव्हळू लागले.

इतक्यात परगावला गेलेले कल्याणस्वामी तेथे हजर. त्यांना नेहमीची गडबड; धांदल काहीच दिसेना. सगळी मंडळी अगदी स्तब्ध. स्वामींचे कण्हणे मात्र त्यांना ऐकू येऊ लागले. लगेच ते स्वामीजींकडे गेले. साष्टांग प्रणिपात करून त्यांनी दुःखाचे कारण विचारले. समर्थ म्हणाले, 'अरे, किती वेळा सांगू ? सांगून काय उपयोग ? इलाज सांगा, इलाज सांगितला, एक जण तरी करायला तयार आहे का ? सारे गप्प !'

'महाराज ! असे का म्हणता ? माझी परीक्षा तर पाहा. आपल्याला ज्याने उतार पडेल ते करायला मी सिद्ध आहे. आपल्यापुढे माझ्या क्षुद्र जीवाची पर्वा मला नाही ! यापेक्षा आपली खात्री कशी करू ?'

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

समर्थांनी आपल्याला होणारे दुःख व त्यावरील इलाज सांगितला. 'हात्तीच्या ! एवढेच ना ? त्यात काय मोठेसे ? मी चोखतो ते करट !!'

'कल्याण, जरा बेताबेताने चोख. मला त्रास होता कामा नये.'

'महाराज ! काही काळजी करू नका. आपल्याला सोसवेल अशा बेतानेच मी चोखीन.' असे म्हणून कल्याणस्वामी करट चोखू लागले !! त्यांना ते करट आंब्याच्या मधुर रसाप्रमाणे गोड गोड लागू लागले ! आणि म्हणतात, 'अशी कितीही करटे झाली तरी ती मी आनंदाने चोखीन. याने का मी मरणार ?'

हे शब्द ऐकताच समर्थ खूष झाले आणि मोठ्याने हसू लागले ! पोटरीला बांधलेला आंबा सोडून तो कल्याणाला खाण्यास दिला.

इतर शिष्य तेथल्या तेथेच थिजले आणि अवाक् बनले !

हा प्रसंग साधून समर्थांनी शिष्यांना मोलाचा उपदेश केला.

११. दासबोध – एक अद्वितीय ग्रंथ

ज्ञानदेवांची ज्ञानेश्वरी हा एक अपूर्व ग्रंथ मानला जातो. त्याचप्रमाणे समर्थ रामदासांचा दासबोध याचेही वैशिष्ट्य आगळेच आहे. या ग्रंथांत वेदान्तविषयक चर्चा आहे, पारमार्थिकांना मार्गदर्शन आहे, संसारी लोकांना प्रपंच उत्तम तऱ्हेने करून ऐहिक जीवनाची सफलता कशी साध्य करून घेता येईल याचे सुंदर विवरण आहे. थोडक्यात या ग्रंथातील विवेचन समाजातील सर्व थरांच्या लोकांना उपयोगी पडणारे आहे. लहान–थोर, गरीब–श्रीमंत, संसारी–संन्यासी, ब्राह्मण–शूद्र, व्यापारी–शेतकरी, कारखानदार–धनी–नोकर, राजा–प्रजा, स्त्री–पुरुष इ. सर्वांना आपापली कर्तव्ये

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

यथायोग्य रीतीने कशी पार पाडावीत या संबंधीचे उत्कृष्ट विवेचन करणारा आणि सर्वांना योग्य मार्गदर्शन करणारा असा 'दासबोध' हा एकच ग्रंथ आहे.

समर्थ रामदासांचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन कोणता आहे हे या ग्रंथात पहावयास सापडते. या ग्रंथाचे महत्त्वपूर्ण वैशिष्टच असे की, यात केवळ वेदान्तविषयक आणि गूढात्मक चर्चा नाही, नुसता भक्तिमार्गाचा डांगोरा पिटलेला नाही, नैराश्याचे वातावरण नाही; यात राजकारण आहे, धार्मिक जागृती आहे, भूतदया आहे, समता आहे. उत्साहजनक प्रेरणा आहे, थोडक्यात, सर्व काही आहे आणि त्यांतल्या त्यात शेकडा नव्याण्णव लोक जे प्रपंचात गुंतलेले आहेत, त्यांना **प्रपंच नेटका करून परमार्थ कसा साधावा** याचे उत्कृष्ट मार्गदर्शन आहे. ईश्वरनिष्ठा कर्तव्यपरायणता आणि मानवता यांवर विशेष भर देऊन समर्थांनी संसारी लोकांना भवसागर तरून जाण्याचा आदेश दिला आहे.

तसेच महाराष्ट्रात नव-चैतन्य ओतून लोकांना कार्यप्रवण त्यांनी केले आहे. ते म्हणतात –

मराठा तितुका मेळवावा
आणि-महाराष्ट्रधर्म वाढवावा ।।
महाराष्ट्र–धर्माची मुख्य तीन वैशिष्टचे पुढील ओवीत पहा–
मुख्य हरिकथा निरूपण । दुसरे ते राजकारण ।
तिसरे ते सावधपण । सर्व विषयीं ।।
आणि काही स्फुट विचार पहा –
कष्टेविण फळ नाही । कष्टेविण राज्य नाही ।।
केल्याविण होत नाही । साध्य जनीं ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जो दुसऱ्यावरी विश्वासला।
त्याचा कार्यभाग बुडाला।
जो आपणचि कष्टत गेला।
तोचि भला ॥

* * *

आधी प्रपंच करावा नेटका
मग लागावें परमार्थ विवेका ॥

□ □ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विठ्ठलाला समजाविणारे

श्री संत भानुदास

(त्रोटक पूर्ववृत्त – भानुदासांचा जन्म शके १३७० चे सुमारास झाला. भानुदास हे एकनाथांचे पणजोबा. भानुदासांचा मुलगा चक्रपाणी. चक्रपाणीचा मुलगा सूर्यनारायण. सूर्यनारायणाचा मुलगा एकनाथ.

भानुदासाची नुकतीच मुंज झाली होती. त्याचे वडील त्याला एकदा रागे भरले. भानुदास खिन्न होऊन एका देवळात जाऊन राहिला. हे देऊळ सूर्याचे असून जमिनीत जरा खोल होते. भानुदासांच्या वडिलांनी मुलाचा पुष्कळ तपास केला पण उपयोग झाला नाही. ते खिन्न व दुःखी झाले

भानुदासाने दररोज सूर्याची पूजा करावी असे आठवडाभर चालले. एकदा एका मनुष्याने भानुदासास पाहिले व त्याच्या वडिलांना येऊन सांगितले. मग भानुदासाच्या वडिलांनी मुलाला त्या सूर्यमंदिरातून घरी आणले. सूर्यदेवाची आपल्या मुलावर कृपा झाली, म्हणून त्याला 'भानुदास' असे म्हणू लागले.

भानुदास पक्के विठ्ठलभक्त होते. आपला वेळ देवाची पूजा, भजन कीर्तन यांत घालवीत. ते प्रत्येक आषाढी व कार्तिकी एकादशीस पंढरपुरास जात असत.)

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१. विठ्ठल मूर्तीचे आकर्षण

त्या काळी विजयनगर येथे श्रीकृष्णराज हा राज्य करीत होता. एकदा तो पंढरपुरास आला. विठ्ठलमूर्ती पाहून तो फार संतुष्ट झाला. ही नयनमनोहर मूर्ती विजयनगरास न्यावी असे त्याला वाटले. विठ्ठलाची सुंदर मूर्ती विजयनगरास न्यावयाची असे त्याने ठरविले. तोच ध्यास त्याला लागला. राजाला स्वप्नात दृष्टांत झाला, 'भक्त पुंडलिकाची भक्ती पाहून मी येथे वास्तव्य केले आहे. येथे माझे अनेक भक्त आहेत. आता तू मला विजयनगरास नेत असशील तर माझी एक अट आहे. ब्राह्मणांनी शुचिर्भूत होऊन सोवळ्याने मला उचलावे. वाटेत कोठेही मला खाली ठेवू नये.'

त्याने आपल्या प्रधानास बोलावून त्याला दृष्टांत सांगितला. राजाने त्याला विचारले, 'विठ्ठलाची मूर्ती या अटीप्रमाणे आपल्या राजधानीस कशी न्यावयाची ?'

प्रधान म्हणाला, 'वाटेवरील गावांतून ठिकठिकाणी ब्राह्मण उभे करू. त्यांच्याकडून पांडुरंगाची मूर्ती खाली न ठेवता विजय-नगरास नेऊ.' त्याप्रमाणे सर्व तयारी झाल्याचे प्रधानाने राजाला कळविले.

मग राजाच्या आज्ञेने ब्राह्मणांनी मूर्ती उचलली व विजया-नगरास चालविली, त्या वेळी बडव्यांनी व पांडुरंगाच्या भक्तांनी मूर्ती नेऊ नये म्हणून राजाला विनविले, पण राजाने कोणाचे ऐकले नाही.

मूर्ती विजयानगरास पोहोचली. राजाने विठ्ठलमूर्तीची स्थापना मोठ्या थाटामाटाने केली.

विठ्ठलाने राजास स्वप्नात पुन्हा दृष्टांत दिला. 'राजा, मी तुझ्या इच्छेप्रमाणे विजयनगरास आलो. आता न्यायाने राज्य

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कर. कोणावरही अन्याय करू नकोस. तुझ्याकडून विनाकारण कोणाचा छळ झाला, तर मी येथे न रहाता पंढरपुरास परत जाईन.'

रोज सकाळी पुजारी मूर्तीची षोडशोपचारे पूजा करी व रात्री शेजारती होई. राजाने मूर्तीवर अनेक बहुमूल्य अलंकार व वस्त्रे घातली होती. चोर दागिने चोरून नेतील, म्हणून देवघरास कड्याकुलुपे घालून व पहारे बसवून राजाने पक्का बंदोवस्त केला होता.. विठ्ठल जणू काय बंदिवासातच पडला. थाटमाट, वैभव पुष्कळ होते, पण त्यात भक्तीचा जिव्हाळा नव्हता.

२. पंढरपूर पोरके झाले !

इकडे आषाढी एकादशीस पंढरपुरात संतमंडळी व हजारो लोक जमा झाले, पण मंदिरात विठ्ठलाची मूर्ती नाहीं, हे पाहून ते सर्व उदास झाले. त्यांचे चैतन्य नाहीसे झाले. पंढरपुरातील विठ्ठलाचे मंदिर सुने वाटू लागले.

कोणीतरी विजयनगरास जाऊन विठ्ठलमूर्ती परत आणावी, अशी एका संताने सूचना केली.

शेवटीं भानुदास पुढे होऊन म्हणाले, 'तुमचीं आज्ञा असेल तर मी विजयनगरास जाऊन विठ्ठलमूर्ती परत आणतो.'

मग भानुदास विजयनगरास जाऊन पोहोचले. तेथे गेल्यावर त्यांनी विठ्ठलमूर्तीचा तपास केला. तेव्हा त्यांना कळले की, एका मंदिरात विठ्ठलमूर्ती बंदोवस्तात ठेवली आहे.

रात्री शेजारतीनंतर मंदिरात जाऊन विठ्ठलाचे दर्शन घ्यावे, असे भानुदासांनी ठरविले. रात्री ११ वाजता भानुदास मंदिराजवळ आले. पुजारी व पहारेकरी गाढ झोपी गेले होते. मंदिराच्या दरवाजाला मोठे कुलूप होते. आता दर्शन कसे घडणार ?

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असा भानुदास विचार करू लागले. तेव्हा काय चमत्कार झाला ! भानुदासांनी दार लोटले, ते एकदम उघडले व भानुदासांचा विठ्ठलाच्या मूर्तीजवळ प्रवेश झाला. भानुदासांनी पादसेवनपूर्वक विठ्ठलाचे दर्शन घेतले.

' ते म्हणाले, ' विठ्ठला, पंढरपूरचा संतसमागम सोडून तुला या बंदिशाळेत गोडी वाटते ना ?'

मग पांडुरंगाने आपल्या गळ्यातील फुलांचा हार भानुदासांच्या गळ्यात घातला. त्याबरोबर विठ्ठलाच्या गळ्यातील एक रत्नहार भानुदासांच्या गळ्यात पडला, पण ही गोष्ट भानुदासांच्या लक्षात आली नाही. मग भानुदास तेथून निघाले.

कड्याकुलपे वगैरे बंदोवस्त पहिल्यासारखाच होता.

सकाळी राजा मंदिरात आला. विठ्ठलाच्या गळ्यात रत्नहार नाही, हे त्याच्या लक्षात आले. त्याने पहारेकऱ्यांना जाब विचारला, पण त्यांना काही सांगता येईना.

मग राजाने रत्नहाराचा शोध घेण्याकरता नगरात सर्वत्र शिपाई पाठविले. नदीच्या वाळवंटात भानुदास नामस्मरण करीत बसले होते. तेथे शिपाई आले. त्यांनी भानुदासांच्या गळ्यात रत्नहार पाहिला. मग त्यांनी भानुदासांना कैद करून राजापुढे आणून उभे केले.

मुद्देमालासकट चोर पकडलेला पाहून राजाने जास्त विचार केला नाही. त्याने भानुदासांना सुळी देण्याची शिक्षा दिली.

नोकरांनी भानुदासांना सुळी देण्याच्या स्थानाकडे चालविले. भानुदास मनात म्हणाले, मी तुला पंढरपुरास नेण्याकरता आलो. माझ्या गळ्यात आपला रत्नहार घालून मला चोर ठरविलेस. राजाने सुळी देण्याची शिक्षा दिली. ठीक आहे, जे भोगणे असेल

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ते भोगलेच पाहिजे. मी कोणत्या कामाकरिता आलो आणि हे काय झाले ?

३. सुळाचे वृक्षात रूपांतर !

भानुदास वधस्थानाजवळ आलें, इतक्यात काय चमत्कार झाला ! सुळाच्या खांबाचा पुष्पफलयुक्त वृक्ष झाला. राजदूत आश्चर्यचकित झाले.

हे राजाला समजताच तो भानुदासांकडे आला. आपल्या हातून अन्याय झाला असे त्याला वाटले. तो म्हणाला, ‘ महाराज, मला आपण क्षमा करावी. ’

राजाला विठ्ठलाचा दृष्टांत झाला, ‘ राजा, मी आता भानुदासांबरोबर पंढरपुरास जाणार. मला अडवू नको. तुझ्या हातून अन्याय झाला आहे. मी येथे राहाणार नाही. तू माझे रूप आठवून तुझ्या राजधानीत सुखरूप राहा. ’

ही वार्ता पंढरपुरात कळली. तेव्हा हजारो लोक, संतमंडळ विठ्ठलमूर्तीला सामोरे गेले. सग वाजत–गाजत पालखीतून विठ्ठलमूर्तीची मोठी मिरवणूक निघाली. ‘ जय हरि विठ्ठल, जय जय विठ्ठल ’ या नामघोषाने सारे पंढरपूर निनादून गेले.

□ □

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संतांची अमृतवाणी

ज्ञानेश्वर

संतांचे वाङ्मय म्हणजे 'सारस्वताचा महासागर' किंवा 'सोनियाच्या खाणी'च होत. त्यांचे ओझरते दर्शन घ्या —

(१) भक्तांची लक्षणे व वैशिष्टचे सांगताना ज्ञानेश्वर-महाराजांनी दृष्टांत कसे योजले आहेत ते पहा —

जो यथालाभें तोखे । अलाभें न पारुखे ।
पाऊसेंवीण न सुके । समुद्रु जसा ।।

जो खांडावया घावो घाली । कां लावणी जयानें केली ।
दोघां एकचि साउली । वृक्षु दे जैसा ।।

जो सर्व भूतांच्या ठायीं । द्वेषाते नेणेंचि काहीं ।
आपपरू नाहीं । चैतन्या जैसा ।।

गाईची तृषा हरूं । व्याघ्रा विष होऊनि मारूं ।
ऐसे नेणेंचि गा करूं । तोय जैसे ।।

(२) आत्म्यांचे स्थानांतर —

जैसे जीर्ण वस्त्र सांडिजे । मग नूतन वेढिजे ।
तैसे देहांतरातें स्वीकारिजे । चैतन्यनाथें ।।

(३) जीवाविषयी —

उपजें तें नाशें । नाशलें पुनरपि दिसे ।
हें घटिकायंत्र जैसें । परिभ्रमें गा ।।

(४) ईश्वराच्या नामाचा महिमा —

नामांचिया सहस्रवरी । नावा इया अवधारी ।
सजूनियां संसारी । तारू जाहलों ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामदेव

नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावूं जगीं ।।
सर्व बाजूंनी माझाई । वाचे विठ्ठल रखुमाई ।।
परेहुनि परतें घर । तेंथें राहूं निरंतर ।।
कासवीचीं पिलें राहाति निराळी । दृष्टि पान्हावली सुधामय ।।
तैसा जवळूनि असेन मी दूरी । दृष्टि मजवरी असो द्यावी ।।
माझें मागणें तें किती । दाता लक्ष्मीचा पति ।।
देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो ।।
चरण न सोडी सर्वथा । तुझी आण पंढरींनाथा ।।
अमृताहूनि गोड नाम तुझें देवा ।
मन माझें केशवा कां बा ने घे ।।
पंढरीचा वास चंद्रभागे स्नान । आणिक दर्शन विठोबाचें ।।
हेंचि घडो मज जन्मजन्मांतरीं । मागणें श्रीहरी नाहीं दुजें ।।
माझा भाव तुझें चरणी । तुझें रूप माझें ध्यानीं ।।
त्वां तोडिली माझी माया । मीं दडलों तुझ्या पायां ।।
पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा ।
पतितपावन न होसि म्हणूनी जातों माघारा ।।
विठ्ठल माऊली कृपेची साऊली ।
आठवितां घाली प्रेम पान्हा ।।
न सांगतां सर्व जाणे तान्ह भूक । जवळी व्यापक न विसंबे ।।
बोलू ऐसे बोल । जेणें बोलें विठ्ठल डोले ।
प्रेम सर्वांगाचे ठायीं । वाचे विठ्ठल रखुमाई ।।
घालींन लोटांगण वंदीन चरण । डोळयांनी पाहीन रूप तुझें ।।
प्रेमें ओवाळीन अनंत पूजिन । भावें ओवाळीन म्हणे नामा ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एकनाथ

(१) आशा-निराशा यांचे वर्णन पहा –

आशा उपजली अनंतासी । नीच वामनत्व आले त्यासी ।
आशा दीन केलें देवांसी । कथा कायसी इतरांची ।।
आशा तेथ नाहीं सुख । आशेपाशीं परम दुःख ।।...
निराशा देखोनि पळे दुःख । निराशेमाजीं नित्यसुख ।।...
निराशा तीर्थाचें तीर्थ । निराशा मुमुक्षूचा अर्थ ।
निराशेपाशी परमार्थ । असे तिष्ठत निरंतर ।।

(२) संग्रहवृत्ति हानिकारक कशी तें पहा –

निघोनि नाना संकटस्थानांसी । मधुसंग्रहो करी मधुमाशी ।
तो संग्रहोचि करी घातासी । मधु न्यावयासी जे येती ।।
कां झाडितां मोहळासी । नाशु होतसे माशियांसी ।
संग्रहाची जाती ऐसी । जीव घातासी करवितु ।।

(३) कुंभारीण माशीचें उदाहरण घेउन ध्यानाचे महत्त्व –

भिंगुरटी कीटकीतें धरी । कोंडी भिंतीमाजिले घरी ।
ते मरण भयें ध्यान करीं । निरंतरी भ्रमरीचें ।।
तेणें तीव्रध्यानें ती कीटी । होऊनि ठाके भिंगुरटी ।
गगना चढे उठाउठी । प्रत्यक्ष देखिजे ।।

(४) नरदेहाचें वैशिष्टच –

देव वांच्छिती मनुष्यपण । देवाचे स्तवन नरदेहा ।
पावोनिया मनुष्यपणा । जो न साधी ब्रह्मज्ञाना ।
तो दाढीचा मेंढा जाणा ।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुकाराम

नीचपण वरवें देवा । न चले कोणाचाही हेवा ।।
महापुरें झाडें जाती । तेथें लव्हाळी राहती ।।
येती सिंधूच्या लहरी । नम्र होतां जाती वरी ।।
तुका म्हणे हेंचि फळ । पाय धरिल्या न चले बळ ।।

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति । देह कष्टविती उपकारें ।।
भूतांची दया हें भांडवल संता । आपुल्या ममता नाहीं देहीं ।।
तुका म्हणे सुख पराचिया सुखें । अमृत हें मुखें स्रवतसे ।।

दुर्बुद्धि ते मना । कदा नुपजो नारायणा ।।

मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास । कठीण वज्रासहि भेदूं ऐसे ।।
आलिया भोगासी असावें सादर । देवावरी भार घालूनिया ।।
कां रे नाठवीसी कृपाळू देवासी । पोसीतो जगासी एकलाची ।।
तेणें तुझी काय नाही केली चिंता । राहे त्या अनंता आठवूनी ।।
तुका म्हणे त्याचें नांव विश्वंभर । करा निरंतर ध्यान त्याचे ।।
न मिळो खावया न वाढो संतान । परि हा नारायण कृपा करो ।।
विटंबो शरीर होत कां विपत्ति । परि राहो चित्तीं नारायण ।।

घेई घेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचें ।।
मना तेथें धांव घेई । राहीं विठोबाचें पायीं ।।
डोळे तुम्ही घ्यारे सुख । पाहा विठोबाचे मख ।।
तुम्ही आइका रे कान । माझे विठोबाचे गुण ।।
तुका म्हणे जीवा । नको सांडू या केशवा ।।
जे कां रंजलें गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।।
साघु तोचि ओळखावा । देव तेथेंची जाणावा ।।
शुद्ध बीजा पोटीं । फळें रसाळ गोमटीं ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुखीं अमृताची वाणी । देह वेंचावा कारणीं ॥
क्षमा शस्त्र जया नराचिया हातीं । दुष्ट तयाप्रति काय करी ॥
बोले तैसा चाले । त्याचीं वंदीन पाऊलें ॥

रामदास

मना चंदनाचे परी त्वां झिजावें । परी अंतरीं सज्जनां नी ववावें ।
कीर्तिं पाहतां सुख नाहीं । सुख पाहतां कीर्ति नाहीं ।
उपासनेला दृढ चालवावें । भूदेव संतांसि सदा लवावें ॥
सत्कर्मयोगें वय घालवावें । सर्वांमुखीं मंगल बोलवावें ॥
सामर्थ्य आहे चळवळींचें । जो जो करील तयाचें ।
परंतु तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥

वेष असावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा ।
मरावें परि कीर्तिरूपें उरावें ।
क्रियेवीण वाचाळता व्यर्थ आहे ।
राखावीं बहुतांचीं अंतरें । भाग्य येतें तदनंतरें ॥

जनीं सर्व सुखी असा कोण आहे ।
विचारी मना तूंचि शोधोनि पाहे ॥
मना त्वांचि रे पूर्व संचित केलें ।
तयासारिखें भोगणें प्राप्त झालें ।
मना सज्जना भक्ति पंथेचि जावें ।
तरी श्रीहरि पाविजे तो स्वभावें ।
अनुदिनिं अनुतापें तापलों रामराया ।
परम दिन दयाळा नीरसीं मोहमाया ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जनाबाई

काया ही पंढरी । आत्मा हा विठ्ठल ।
नांदतो केवळ पांडुरंग ।
येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ॥
भीमा आणि चंद्रभागा । तुझे चरणीची गंगा ॥
जनी म्हणे जोड झाली विठोबाची ।
दासी नामयाची म्हणोनिया ॥
नाही केली तुझी सेवा । दुःख वाटतसे जीवा ॥
क्षमा करावी देवराया । दासी जनी लागे पाया ॥

गोरा कुंभार

देवा तुझा मी कुंभार । नाशी पापाचे डोंगर ॥
वंदावे कवणासी निंदावे कवणासी ।
लिंपण गगनासी कैसे लिंपे॥
का गे केशिराजा मोकलीले माते ।
शरण मी कोणाते जाऊ आता ।
अनाथांचा नाथ दीनांचा कैवारी ।
पाव झडकरी आपुल्या दासा ॥

चांगदेव

नाशवंत देह पंचतत्त्व मोळी ॥ वायाचि वाहडुळी उडोनि जाये
मुक्ताई जीवन चांगया दिधले ॥ निर्गुणी साधिले घर कैसे ॥

चोखामेळा

जोहार मायबाप जोहार । तुमच्या महाराचा मी महार ॥
बहु भुकेला जाहलो । तुमच्या उष्टयासाठी आलों ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कोण तो सोवळा कोण ओवळा । दोहींच्या आगळा विठू माझा ॥
ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा । काय भुललासी वरलिया सोंगा ॥
नदी डोंगी पर जळ नव्हे डोंगा । काय भुलसासी वरलिया सोंगा ॥
धाव घाली विठू आता चालू नको मंद ।
बडवे मज मारिती । ऐसा काय तरी अपराध ॥

नरहरि सोनार

पहा पहा तुम्ही डोळा । माझा भोळा शंकर ॥
ज्याचे देणे अवघ्या सम । नाही विषम कोणासी ॥
माझे प्रेम तुझे पायी । राहो ऐसे करी काही ।
सोनार नरहर न देखे द्वैत । अवघा मूर्तिमंत एकरूप ॥

सावतामाळी

प्रपंची असून । परमाथ साधावा ॥ वाचे आठवावा । पांडुरंग ॥
शांति शेवंती फुलली प्रेमे जाईजुई व्याली ॥
सावता केला मळा । विठ्ठल देखियेला डोळा ॥
भेटीचानि सुखे मनच होते मुके । ते रूप देखे परि बोलवेना ॥

कान्होपात्रा

दीन पतिता अन्यायी । शरण आले विठाबाई ॥
मी तो यातिहीन । न कळे काही आचरण ॥
मज अधिकार नाही । भेट देई विठाबाई ॥
ठाव देई चरणापाशी । तुझी कान्होपात्रा दासी ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझ्या जिवाचे जीवन । तो विठ्ठल निधान ॥
जीवपुष्प तवचरणा । अर्पित कान्हा, भक्तिविना नाही वासना ॥
माझे माहेर पंढरी । सुखे नांदू भीमा तिरी ॥
येथें आहे मायबाप । हरें ताप दरुशने ॥

भानुदास

१

बसुनि अधिष्ठान रामनाम ध्यान । यापरी साधन नेणे काही ॥
एकविध भाव दृढता हे मन । यापरि साधन आन नाही ॥
परद्रव्य परदारा यांचा तो विटाळ । यावीण निर्मळ तप नाही ॥
भानुदास म्हणे रामनाम गुढी । लाविली चोखडी कलियुगी ॥

२

न मागता काही न करिता सेवा । आलासी गा देवा पंढरिये ।
तू गा मायबाप विश्वासी तारक । तुवा पुंडलीक सुखी केला ।
चोरिता गोधने आलासी बा पायी । पुंडलीक काही न बोलेचि ।
चिन्मयाचा दीप साक्षित्वासी आला । भानुदास त्याला नाम जाले ॥

३

ऐसियासी कृपा करावी त्वरित । पुरवी मनोरथ सर्व माझे ।
काकुळती कवणा येऊ तुजवीण । दुःख निवारण कोण करी ।
त्रैलोक्य पालन करिसी सर्व काळ । त्याहुनी आगळ हेचि काय ।
तुझिया पायांचा मजला आधार । कवी तू निष्ठुर जाहलासी ।
आमुचे अन्याय न धरावे चित्ती । सर्व कृपामूर्ती पोटी घाली ।
कर्म धर्म माझे उत्तम आचरण । न पाहे पावन करी मज ।
भानुदास म्हणे कृपेचे पोसणे । परी नारायणे संभाळावे ॥

* * *

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आरती श्रीज्ञानदेवाची

आरती ज्ञानराजा । महाकैवल्यतेजा। सेविती साधुसंत । मनु वेधला माझा ॥ आरती ज्ञानराजा ॥ धृ० ॥ लोपलें ज्ञान जगीं ॥ हित नेणती कोणी ॥ अवतार पांडुरंग ॥ नाव ठेविलें ज्ञानी ॥ आ० ॥ १ ॥ कनकाचे ताट करीं । उभ्या गोपिकानारी ॥ नारद तुंबरु हो । सामगायन करीं । आ० ॥ २ ॥ प्रकट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केले । रामा जनार्दनीं । पायीं मस्तकचि ठेलें ॥ आ० ज्ञानराजा । महा० ॥ ३ ॥

आरती श्रीएकनाथाची

आरती एकनाथा ॥ महाराजा समर्था ॥ त्रिभुवनी तूंचि थोर ॥ जगद्गुरु जगन्नाथा ॥ धृ० ॥ एकनाथ नाम सार ॥ वेदशास्त्रांचे गूज ॥ संसार दुःख नासे ॥ महामंत्राचे बीज ॥ आरती० ॥ १ ॥ एकनाथ नाम घेतां ॥ सुख वाटलें चित्ता ॥ अनंत गोपाळदास ॥ धणी न पुरे गातां ॥ आरती० ॥ २ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आरती श्रीनामदेवाची

आरती नामदेवा ।। भक्ति भूषणाचा ठेवा ।। पंचारती ओवाळीतों ।। घ्यावी माझी ही सेवा ।। धृ० ।। पाहूनियां तव भक्ति ।। आनंदले रुक्मिणीपति ।। गुज बोधियले एकांती ।। दिला कृपेचा ठेवा ।। १ ।। तुझे गुण वर्णवेना ।। उतराई होतां दिसेना ।। श्रीराम लागे चरणा ।। वर कृपेचा द्यावा ।। आरती० ।। २ ।।

आरती श्रीतुकारामाची

आरती तुकारामा । स्वामी सद्गुरुधामा ।। सच्चिदानंदमूर्ती ।। पाय दाखवीं आम्हां ।। धृ० ।। राघवें सागरांत । पाषाण तारीले ।। तैसे हे तुकोबाचे ।। अभंग उदकीं रक्षिले ।। आरती ० ।। १ ।। तुकीना तुळनेसी । ब्रह्म तुकासी आलें ।। म्हणोनी रामेश्वरें । चरणीं मस्तक ठेविलें ।। आरती तुकारामा ० ।। २ ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आरती श्रीपांडुरंगाची

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा ।। वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ।। पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा । चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा । जयदेव जयदेव जय पांडुरंगा ।। रखुमाईवल्लभा राइच्या वल्लभा पावें जिवलगा ।। जय० ।। १ ।। तुळसीमाळा गळां कर ठेवुनी कटीं ।। कांसे पीतांबर कस्तुरि लल्लाटीं ।। देव सुरवर नित्य येती भेटी ।। गरुड हनुमंत पुढें उभे रहाती ।। जय० ।। २ ।। धन्य वेणुनाद अणुक्षेत्रपाळा ।। सुवर्णाची कमळे वनमाळा गळां ।। राईरखुमाबाई राणीया सकळां । ओवाळिती राजा विठोबा सावळा ।। जय० ।। ३ ।। ओवाळूं आरत्या कुर्वंड्या घेती ।। चंद्रभागेमाजी सोडूनिया देती ।। दिंड्या पताका वैष्णव नाचती ।। पंढरीचा महिमा वर्णावा किती ।। जय० ।। ४ ।। आषाढी कार्तिकीं भक्तजन येती । चंद्रभागेमाजीं स्नानें जे करिती ।। दर्शन हेळामात्रे तयां होय मुक्ती । केशवासी नामदेव, माधवासी नामदेव भावें ओवाळिती ।। जयदेव ।। ५ ।।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रार्थना

घालीन लोटांगण वंदीन चरण ।। डोळ्यांनीं पाहीन रूप तुझें ।। प्रेमें आलिंगीन आनंदें पूजीन ।। भावें ओवाळीन म्हणें नामा ।।-------------

मंत्रपुष्पांजली

ॐ यज्ञेन यज्ञमयजन्त देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् । तेहनाकं महिमानः सचंत यत्र पूर्वे साध्याः सन्ति देवाः । ॐ राजाधिराजाय प्रसह्यसाहिने नमो वयं वैश्रवणाय कुर्महे । स मे कामान् कामकामाय मह्यं । कामेश्वरो वैश्रवणो ददातु । कुबेराय वैश्रवणाय महाराजाय नमः । ॐ स्वस्ति । साम्राज्यं, भौज्यं, स्वाराज्यं, वैराज्यं, पारमेष्ठ्यं, राज्यं, माहाराज्यमाधिपत्यमयं समन्तपर्या ईस्यात् सार्वभौमः सार्वायुष आंतादापरार्धात् । पृथिव्यै समुद्रापर्यंताया एकराळिती । तदप्येषःश्लोकोऽभिगीतो मरुतः परिवेष्टारो मरुत्तस्यावसन् गृहे । अविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवाः सभासद इति ।।

—

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri



Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi